# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ- वाणिज्य शिक्षक मंडळ, नागपूर

अंक ८ वा/ वर्ष २०१४

## चर्चासत्र आठवे २०१४

श्री नरेन्द्र तिडके, कला व वाणिज्य महाविद्यालय, गडमंदिर रोड, रामटेक, जि. नागपूर













Scanned by CamScanner

# स्मरणिका संपादक मंडळ



डॉ. रजनी हुद्दा
संपादक



डॉ. रश्मी दुरगकर



प्रा. योगराज डोर्लीकर



प्रा. मनीष तबाखे



प्रा. चंद्रकांत जुळे



प्रा. नामदेव घोळसे



प्रा. चेतन हिंगणेकर



प्रा. भरत काळे



प्रा. अशोक गायधनी

Scanned by CamScanner

# केंद्रीय कार्यकारिणी



अध्यक्ष
डॉ. हसनअली हुद्दा



संस्थापक सचिव
प्रा. राजाभाऊ दुरगकर



उपाध्यक्ष
डॉ. अरुणा सोनेगांवकर



कोषाध्यक्ष
डॉ. माधुरी लेले



सहसचिव
प्रा. अशोक गव्हाणकर



सदस्य
सौ. सुमित्रा मरस्कूले



सदस्य
प्रा. विठ्ठल गिरडकर



सदस्य
प्रा. विजय बालपांडे



सदस्य
प्रा. मधुकर बोरकर



अध्यक्ष
प्रा. रत्नाकर बोमिडवार
गडचिरोली जिल्हा



अध्यक्ष
प्रा. विजय मसराम
चंद्रपुर जिल्हा



अध्यक्ष
प्रा. अशोक चेटुले
भंडारा जिल्हा



Scanned by CamScanner



डॉ. दत्तात्रय सोनेगावकर

# भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप

## अध्यक्षीय भाषण

भारताची बदलती अर्थव्यवस्था हा जागतिक अभ्यासाचा एक केंद्र बिंदू झाला आहे. स्वातंत्र्यानंतर या देशाने केलेला आर्थिक विकास जरी अनेकांच्या अपेक्षा पूर्ण करणारा नसला तरी देशाने केलेल्या आजवरच्या आर्थिक विकासाच्या परिणाम स्वरूप आज देशाने आर्थिक उड्डानावस्था प्राप्त केली आहे हे नाकारता येणार नाही. या संदर्भात चर्चासत्राचा अध्यक्ष या नात्याने भारताची अर्थव्यवस्था कशी बदलत गेली. याचे विवेचन आपणा समोर मांडतांना आनंद होत आहे. यातूनच चर्चेकरीता अनेक मुद्दे निर्माण होतील. ज्याची चर्चा येणाऱ्या काळात आपण करणार आहोत.

सोळाव्या शतकापूर्वी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत आणि विशेष म्हणजे स्थीर होती. कृषी, कुटीर आणि लघू उद्योग क्षेत्रातील विदेशी व्यापारात भारताचा वाटा २५ टक्के पेक्षा जास्त होता. त्यावेळी लोकसंख्या ही केवळ ५० लक्षा पेक्षाही कमी असावी असा अंदाज आहे. भारतात लोकसंख्या गणनेला विधिविहीत सुरूवात १८७६ पासून झाली, १९०१ मध्ये ती ११ कोटी इतकी होती. २०११ पर्यंत ती ११२ कोटी इतकी वाढली होती.

लोकसंख्या व आर्थिक विकास हा कोणत्यांही अर्थव्यवस्थेचा अभ्यासाचा आधार समजला जातो. १६ व्या शतकापूर्वी भारत हा खंडप्राय देश होता. आजचा भारत त्या काळात विविध भागात क्षेत्रनिहाय वसाहतीच्या स्वरूपात विस्तारलेला होता. पूर्वेकडील राज्ये ही वेगळया स्वरूपात होती तर भारताची व्याप्ती आजचा पाकिस्तान, बांगलादेश व इराणच्या सीमेपर्यंत होती. प्राचीन कालीन अर्थव्यवस्था ही सरंजामशाही तत्वावर आधारलेली होती. या व्यवस्थेचा आधार म्हणजे केवळ हुकुमाबरोबर चालणारी प्रशासकीय व आर्थिक व्यवस्था होय. जनकल्याण सामंतवादात कधीही साधल्या गेले नाही. प्रत्येक खंडाचा किंवा एका प्रदेशाचा हुकुम देणारा राजा व त्याची प्रजा असे समीकरण असल्यामुळे विकास प्रेरीत अर्थव्यवस्था किंवा समाजातील न्याय व्यवस्था, सामाजिक व वैयक्तिक संरक्षण हे त्या काळातील उपेक्षीत प्रश्न होते.

अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने रामायण ते महाभारत असा प्रवास तपासला किंवा त्याचा अभ्यास केला तरी आपणास असे दिसून येते की गरिबीचा मूलभूत प्रश्न व सामाजिक विषमता ही त्याही काळात होती. कृष्णाचा मित्र सुदामा हा गरीब होता. यावरून अर्थशास्त्रीय विश्लेषणाअंती असे दिसून येते की संसाधनाची आवंटण मर्यादा एका विशिष्ट समूहातील समाज व्यवस्थेकडे झालेली होती, व त्यातूनच हजारो वर्षापासूनचे सामाजिक विषमतेचे बीजारोपण या व्यवस्थेचा शेवटी आधार व शोषीत समाज व्यवस्था निर्माण होण्यामध्ये झाले असे म्हणता येईल.

मागील १०० वर्षाचा अनेक देशांचा आर्थिक व सामाजिक व्यवस्थेचा आधार तसेच विकास प्रणालीची प्रक्रिया तपासली असता आपणास औद्योगिक क्रांतीच्या पर्वापर्यन्त सर्व ठिकाणी राजकीय व्यवस्थेचा आधार, प्रशासनातील मूलभूत स्वतंत्रता व नैतिक मूल्यांचा अभाव असलेला दिसून येतो. अर्थातच सर्वच ठिकाणचे मानवी जीवन हे एका विशिष्ट रेखांकीत समीकरणातून संक्रमीत होत गेलेले दिसून येते. प्रदेशनिहाय व राष्ट्रनिहाय त्यांच्या सामाजिक, भौगोलिक, राजकीय व आर्थिकतेचा परिणाम नैसर्गिक संसाधनाच्या उपलब्धतेनुसार थोड्या फार प्रमाणात भिन्न असेलही असे असले तरी संपूर्ण समान व्यवस्थेतील मनुष्य जीवनाचे वैशिष्ट्ये जवळपास एकसारखीच होती.

आजच्या सुसंस्कृत व विकसीत इंग्लंडकडे आपण जेव्हा बघतो तेव्हा तेथील प्रगतीचा आलेख व आर्थिक विकास यांचे संशोधन केले असता असे दिसून येते की, वर्तमान इंग्लंडला हे वैभव पाहण्याकरीता जवळपास २००० वर्ष खर्ची करावी



Scanned by CamScanner

लागलीत याशिवाय जगातल्या प्रत्येक देशावर त्यांचे राज्य होते म्हणूनच म. गांधी यांनी म्हटले होते की, १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. आता येत्या ५० वर्षात ब्रिटीश हुकुमत जगातून समाप्त होईल. इग्लंड मधील औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण जगातील समाज व्यवस्थेला एक नविन स्वरूप प्राप्त होण्यास आरंभ झाला. या औद्योगिक क्रांतीतून नविन संशोधन, यंत्र व तंत्रज्ञानाचा विकास, उत्पादन घटकाचे मागणी पूरवठा समीकरण, वित्तीय प्रणालीतील आवंटन, नविन बाजारपेठेचा विकास व संशोधन आणि अस्तित्वात असलेल्या बाजारपेठेचे नविनीकरण तसेच उपभोग्य व भांडवली वस्तूच्या उत्पादनाला चालना व नवनविन उपभोग्य गरजांच्या संरचनेतील बदल व त्यामुळे मागणी व पुरवठा निर्देशांकातील बदलाने बाजारपेठेतील क्रय विक्रय प्रणालीचा विस्तार व उत्पादन घटकांना पुरवठा निर्देशांकातील सकारात्मक विचलनामुळे रोजगार निर्माण करून देण्यात यश प्राप्त झाले म्हणून 'सें'च्या म्हणण्यानुसार प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करतो या परंपरागत अर्थशास्त्रज्ञाच्या मतास अल्पसा का होईना असा पुरावा समोर ठेवता येतो. अर्थातच नंतरच्या किन्स प्रणीत अर्थशास्त्रीय विचाराच्या मांडणीत यात सुधारणा झालेली दिसून येते.

औद्योगिक क्रांतीच्या काळानंतर इंग्लंडमध्ये दुसरा महत्वाचा व जगातील आर्थिक व्यवहारांना नविन चालना देणारा प्रयोग १७७६ साली Wealth of Nation च्या माध्यमातून झाला. जगाची दैनंदिन आर्थिक प्रक्रिया व क्षेत्रनिहाय बदल या द्वारे जगा समोर प्रथम मांडण्यात आले. परंपरेने चालत आलेला सांमतवाद व भांडवल वादाचा विषय त्याचप्रमाणे समाजवादी समाज संरचनेची आवश्यकता या अनेक पैलूंच्या संदर्भातील आशय Wealth of Nation च्या माध्यमातून अधोरेखित व्हायला सुरूवात झाली. अर्थशास्त्र विषयाची चौकट समाज व्यवस्थेच्या विकासाकरीता व अर्थव्यवस्थेत सर्वांना भागीदारी व सर्वांचा समावेश याचे महत्व व रहस्य प्रथमच यातून स्पष्ट होण्यास आरंभ झाला.

राष्ट्रवाद हा उदारमतवादी अभिजात अर्थशास्त्राचा स्थायी भाव मानला जातो. स्मिथने राष्ट्राच्या संपत्तीचा विचार व विवेचन केले. देशाच्या नावाखाली व्यापारी वर्ग राष्ट्राच्या नाही तर केवळ स्वतःच्या संपत्तीत वाढ करतात. हा व्यापारवादाच्या विरोधात स्मिथचा महत्वाचा मुद्दा होता. माल्थसच्या राजकीय तत्वज्ञानाचे वर्णन जेम्स बोनरने उपयुक्ततावाद अधिक राष्ट्रवाद या प्रकारे केले ते एकूणच अभिजात अर्थशास्त्राला लागू पडते. आर्थिक नीतीच्या विचारात राष्ट्राचे अस्तित्व संपन्नता व प्रभुत्व यांना त्यांनी सर्वोतोपरी मानले. उदारमतवादाचे समर्थक उदारमतवाद संपूर्ण जगात हितकारक असल्याचे स्पष्ट करतात. मात्र याचा अर्थ राष्ट्रवादाला विरोध असा होत नाही. स्वहितातून समाजहित व त्यांच्या मूलतत्वाचा अर्थ येथे स्वदेशहितातून विश्वहित असा होतो. हेच आज सर्व राष्ट्रांनी मुक्त केलेल्या अर्थव्यवस्थेतून दिसून येते. याचा अर्थ जागतिकीकरणाअंतर्गत व्यापार विषयक व आंतरराष्ट्रीय व्यापाराशी निगडीत असलेला दिसून येतो.

१९८० नंतर जगातील राष्ट्रांची अर्थव्यवस्था अनिर्बंध होण्यास सुरूवात झाली. यामध्ये जागतिक व्यापार संघटना व तिच्या अंतर्गत कार्य करणाऱ्या विविध शाखा आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियंत्रण करीत आहे. आज भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाटा ३.५ टक्के पेक्षा जास्त नाही. भारताच्या संपन्नतेचे अनेक इतिहासकालीन पुरावे आज उपलब्ध आहे. औद्योगिक क्रांतीपर्यन्त युरोपीय देशात भारतातील निर्यात महत्तम होती. १७७५ च्या दशकात भारताची निर्यात तिच्या आयतीच्या कितीतरी पट अधिक होती. आयात मूल्य देण्याकरीता ब्रिटनला भारतात सोन्याची निर्यात करावी लागत असे.

१९ व्या शतकाच्या आरंभापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी व उद्योगाचे उत्तम समायोजन होते. ब्रिटीश इतिहासकार एच. विल्सन यांनी कबूल केले आहे की भारतीय अर्थव्यवस्था उध्वस्त करण्याचे कार्य ब्रिटीशांनी केले. त्या काळात भारतात भांडवलशाहीच्या स्वयंचलीत विकासाची क्षमता होती. मात्र या वाढीकरीता व विकासाकरीता आवश्यक असलेले वातावरण ब्रिटीश साम्राज्यवादाने संपुष्टात आणले.

इंग्लडमधील औद्योगिक क्रांतीनंतर भारतीय उद्योग जे त्यापूर्वी यूरोपमध्ये निर्माणी मालाची निर्यात करीत होते ते स्पर्धेत पुढे राहिले नाही परंतु ब्रिटीशांना समान अटींवर समाधान नव्हते. अनेक निर्बंध घालून त्यांनी कार्यक्षम तंत्राचा वापर प्रतिबंधित केला. भारतीय कारखाने बंद पाडले. औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात ब्रिटीशांनी एकाधिकार प्राप्त केला. भारतीय उत्पादकांना ब्रिटीश कारखान्यात कामगार म्हणून काम करायला भाग पाडले. भारतीय स्पर्धकांना केवळ मागे ठेवण्याकरीता हे एक शस्त्र



Scanned by CamScanner

वापरल्या गेले. स्पर्धेच्या आर्थिक नियमाच्या प्रत्यावर्ति स्वरूपातील कार्यवाहीनेही ब्रिटीशांचे उद्दिष्ट साध्य झाले नाही. तेव्हा राजकीय अन्यायाचे शस्त्र भारतीय वसाहती तोडण्याकरीता राजकीय नियमांचा आधार घेतल्याचे ब्रिटीश इतिहासकार स्पष्ट करतात.

ब्रिटीशांचे भारतावर राजकीय वर्चस्व असले तरी आर्थिक वर्चस्व हाच त्याचा मूळ उद्देश होता. मुख्यतः आर्थिक वर्चस्व प्राप्तीचा प्रयत्न आणि आर्थिक वर्चस्वाद्वारे साम्राज्याच्या दृढीकरणाची नीती अवलंबलेली होती. यामुळे वसाहती देशाचे भांडवल उद्योजकता आणि कौशल्य यावर साम्राज्यवादी देशाचा व्यापार व निर्माणी उद्योगाचे वर्चस्व निर्माण होते. आर्थिक वर्चस्व निर्मितीचे महत्वाचे हत्यार म्हणजे नैसर्गिक नियमांच्या विरोधी वर्तन व नियम, राजकीय किंबहुना वसाहती नियमांचे वर्चस्व आणि आर्थिक नियमांचे प्रत्यावर्ती चक्राच्या स्वरूपात उपयोजन यातूनच साम्राजाच्या दृढीकरणाबरोबर भारतात दारिद्र्यता निर्माण होण्यास सुरूवात झाली.

भारताची संपन्नता ब्रिटीशांचे वर्चस्व टिकून राहण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरली. भारताला इंग्लंडच्या उद्योगाकरीता साधनीभूत बनवणे ही ब्रिटीशांची सुनिश्चित नीती होती त्यांनी ती स्वीकारली व राबविली. संपन्न कृषी उद्योग व व्यापार यामुळे देशातील आर्थिक विकासाला आधिक्यप्राप्त करून देते व ते औद्योगिक क्रांतीला देखील पोषक ठरते. याचे ज्ञान ब्रिटीशांना होते म्हणून त्यांनी गुंतवणूकीकडे दुर्लक्ष केले. अन्यथा भारतात गुंतवणूक योग्य वातावरण निर्माण होईल हे होऊ नये म्हणून ब्रिटीशांनी उत्पादकता वाढविण्याचे मार्ग जवळपास बंद केले. भारतातील अन्नधान्याचे उत्पादन लोकसख्येला अपूरे आहे याचा अर्थ भारत अती लोकसंख्येचा देश असल्याचे ब्रिटीशांचे प्रतिपादन दादाभाईनी नाकारले त्यांच्या मतानुसार पर्याप्त धान्य उत्पादनाची अक्षमता ही देशाला सातत्याने वाढत्या प्रमाणात, जबरदस्तीने त्यांच्या भांडवलापासून वंचित ठेवण्याचा परिणाम आहे. दत्तच्या म्हणण्यानुसार आपल्याकडे पूरेसे धैर्य आणि प्रामाणिकपणा असेल तर कृषकांच्या दारिद्र्याचे कारण अती लोकसंख्या नाही हे स्पष्ट आहे. कारण भारतातील लोकसंख्या युरोपातील लोकसंख्येपेक्षा जास्त वेगाने किंवा लागवडीखालील जमिनीच्या वाढीपेक्षा जास्त वेगाने वाढली नाही. भारतातील दुष्काळ व शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे कारण भारतातील कृषकांचा आळशीपणा, अपव्ययीपणा व दैववादीप्रवृत्ती हे त्यांना मान्य नाही. ब्रिटीशाकडून होणाऱ्या भारताच्या शोषणाची जनतेला प्रकर्षाने जाणीव होत होती. अमेरीका, जर्मनीसारख्या देशात राष्ट्रवादी आर्थिक विचारसरणीचा वाढता प्रभाव व ऐतिहासिक सापेक्षतेचा दिलेला भर या सर्व घडामोडींना जबाबदार आहेत. भारताच्या स्वातंत्र्यापूर्वीचे अर्थव्यवस्थेचे स्वरूप असे होते.

**स्वातंत्र्योतरकालीन अर्थव्यवस्था** - इंग्लडमधील चर्चीलची सत्ता संपल्यानंतर ॲटलीचे सरकार स्थापन झाले. ॲटलींनी आपल्या जाहीरनाम्यात नमूद केल्याप्रमाणे जर त्यांचे सरकार सत्तेवर आले तर भारताला स्वातंत्र्य बहाल करण्यात येईल. अर्थात भारताला स्वातंत्र्य मिळून देण्याकरीता ॲनी बेझंटचे प्रयत्नही तितकेच अधिक महत्वपूर्ण आहे. अनेक ब्रिटीशांनी व ब्रिटीश नागरिकांनी भारताला स्वातंत्र्य देण्यात यावे ही मागणी त्या काळात रेटून धरली होती. या सर्वांच्या प्रयत्नातून भारत ब्रिटीशांच्या हुकुमती मधून मुक्त व स्वतंत्र झाला. प्रशासनातील कोणताही व कोणत्याही क्षेत्राचा अनुभव नसणारा भारत स्वतंत्ररित्या भविष्यकालीन विभिन्न समस्या घेऊन वाटचाल करू लागला. ब्रिटीश धोरणातून अर्थव्यवस्थेत आव्हाने व अनेक जटील समस्या भारताच्या प्रशासनासमोर व अर्थव्यवस्थेसमोर ठाम उभ्या होत्या त्या सोडविण्याकरिता तसेच विविध प्रश्नांची उकल व उपायोजन करण्याकरीता सर्वांनी मिळून पुढाकार घेवून या सर्व बाबींची अग्रक्रमता निश्चित करायला सुरूवात केली. पंतप्रधान म्हणून नेहरूंनी जे आर्थिक प्रारूप तयार करून घेतले होते त्याला आजही आपण नेहरूनियन इकॉनॉमिक्स म्हणून बघतो. दिर्घकालीन विचारसरणी पायाभूत सुविधांचा विकास व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, न्यायव्यवस्था व व्यक्ती स्वातंत्र्यता असा पारदर्शी व्यवहार त्यांनी स्वतंत्र नागरिकासमोर ठेवण्यास आरंभ केला. १९५१ च्या सार्वत्रिक निवडणूकीतून नेहरूंचे सरकार अर्थव्यवस्थेला पुढील दिशा देण्याकरीता सज्ज झाले व यातूनच नियोजन नावाचा शब्द उपयोगात आणून नियोजन आयोग निर्माण करण्यात आला व भारताची प्रथम पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९५१ साली अस्तित्वात आली.

योजनांचा आरंभ म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेला क्रमाक्रमाने व टप्प्याटप्प्याने विकासाकडे नेण्याकरीता सरकारची व शासनाची कटीबध्दता समजल्या गेली. प्रथम पंचवार्षिक योजनेत प्राथमिक क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले व कृषी विकास घडून यावा व देशातील सर्वाना अन्न धान्य प्राप्त व्हावे याकरीता कृषीतील गुंतवणूक प्रथम क्रमाने मान्य करण्यात आली व



Scanned by CamScanner

जवळपास ४००० कोटी रू. पेक्षा जास्त गुंतवणूक कृषीक्षेत्रात करण्यात आली. पहिल्या योजनेचा एकूण खर्च १९६० कोटी रूपये इतका झाला. चालू शतकाच्या पूर्वार्धात लोकसंख्येच्या वाढीपेक्षा शेतमालाच्या उत्पादन वाढीचा दर कमी होता. जे. पी. भट्टाचार्य यांच्या मते १९०१ ते १९४६ या कालावधीत भारताची लोकसंख्या ३८ टक्के दराने वाढली तर शेती योग्य जमीन १८ टक्के दरांनी वाढली. याच कालावधीत शेतीची सुपीकता कमी झाली. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार १९६१-६२ मध्ये ५४ टक्के शेतजमीनीचा आकार २ हेक्टर पेक्षा कमी होता १९८५-८६ मध्ये ७७ टक्के शेतजमीनीचा आकार १ हेक्टर इतका झाला शेतीचे आंतरविभाजन व अपखंडन ही कृषीतील गंभीर समस्या होय. याकरीता चकबंदी आणि सहकारी किंवा सामूहिक शेती करून शेतीची उत्पादकता वाढविणे शक्य होईल. पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत भारतीय शेतीमध्ये निश्चित वाढ झाली. शेतमालाच्या उत्पादनाखालील असणारे जमिनीचे क्षेत्र वाढविले गेले. तर दुसऱ्या बाजूस प्रति हेक्टर शेतमालाची उत्पादकता वाढविण्याकरीता सुधारीत बी-बियाणांचा, रासायनिक खताचा सुधारीत शेती पध्दतीचा आणि शेतीच्या यांत्रिकीकरण पध्दतीचा उपयोग केला जात आहे. परंतु सर्वच राज्यातील शेतीची सूपिकता व श्रम यामध्ये विषमता असल्यामुळे एकाच पिकांच्या बाबतीत उत्पादनातील भिन्नता दिसून येते परिणामतः उत्पादन व्यय अधिक व सीमांत किंमत अशा दुष्ट चक्राने काही राज्यातील शेती, उत्पादन घेण्यास हानीकारक ठरत आहे.

१९६७-६८ पासून भारताच्या कृषी क्षेत्रात अचानकपणे आश्चर्यकारक बदल घडून आला व भारताचा हरीतक्रांतीच्या दिशेने देशाचा प्रवास सुरू झाला. ब्रिटीश कालावधीत भारतीय शेतीची प्रगती कुंठीत झालेली होती. हरीत क्रांती नंतर शेतीची अवस्था बदलण्यास सुरूवात झाली. या कालावधीत २५ टक्के पेक्षा अधिक उत्पादन शेतीच्या क्षेत्रात झाले दिसून येते. हरीत क्रांतीमुळे भारतातील औद्योगिक उत्पादनाला चालना मिळून औद्योगिक उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली. देशात आर्थिक विकास घडत असतांना देशात किंमतीचे स्थैर्य निर्माण झाले पाहिजे. किंमतीचे स्थैर्य निर्माण झाले नाही तर देशात आर्थिक विकास घडूनही तिचे परिणाम सर्वच स्तरावरून दिसून येत नाही. आर्थिक विकास व किंमतीचे स्थैर्य या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साधता आल्या पाहिजे. महागाईमुळे गुंतवणूकीचा दर कमी होतो व त्याचा परिणाम गुंतवणूकीच्या कार्यक्षमतेवर होतो. आर्थिक वृध्दीसाठी महागाईचा दर घातक ठरतो असे असले तरी काही विकसीत राष्ट्रात महागाईचा दर हा कमी असूनही त्या ठिकाणी महागाई आणि वृध्दी यांच्यातील संबंध व्यस्त झालेला पाहावयास मिळतो.

एरर करेक्शन प्रारूप अंतर्गत भारतात १९६१ ते २०११ या कालावधीत हा महागाई व वृध्दी दर याचा संबंध विशेष असल्याने स्पष्ट केल्या गेले. परंतु कृषी उत्पादन वाढीचा परिणाम काही प्रमाणात महागाईला नियंत्रीत करण्याकरीता उपयोगात आला. १९५१ साली भारताचे कृषी उत्पादन ५०.९ दश लक्ष टन इतके होते ते २०१२-१३ या कालावधीत वाढून ३२५ दश लक्ष टन इतके झाले या कालावधीत परंपरागत कृषी वाढीचा दर ३.८ टक्के वरून १.८ टक्के इतका झाला. परंपरांगत कृषी उत्पादनात घट झाली परंतु नकद पिकांच्या उत्पादन वाढीचा दर वाढत आहे. कृषी उत्पादनाच्या बाबतीत गुजरात, पंजाब, हरियाणा, आंध्र प्रदेश ही अग्रेसर राज्ये आहेत.

द्वितीय पंचवार्षिक योजना कालावधीत सरकारने मिश्र अर्थव्यवस्था प्रणीत औद्योगिकरणाचा स्वीकार केला व उद्योगाच्या निर्मितीची रचना सार्वजनिक उपक्रम व खाजगी क्षेत्रातील उपक्रम या दोन भागात करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्र ही केंद्र व राज्य सरकारच्या मालकीची ठरविण्यात आली तर खाजगी उपक्रम खाजगी उद्योगपतींकरीता राखून ठेवले होते. १९५१ मध्ये मध्यवर्ती सरकारच्या मालकीची एकूण ५ उपक्रमे होती. ती आज ७२५ पेक्षाही अधिक आहे. यातील अनेक उपक्रमांचे निर्गुंतवणुकीकरण केल्या जात आहे. किंवा त्यांच्यात असलेली समभागातील भागीदारी कमी केल्या जात आहे. उदा. अशोक हॉटेल्स, मारूती उद्योग, बाल्को या उद्योगात सरकारने आपली गुंतवणूक कमी करण्यास आरंभ केला आहे. जागतिकीकरणानंतर भारतातील औद्योगिक संरचनेत बदल केल्या जात आहे व अधिकाधिक क्षेत्रे खाजगी व्यवसायिकांकरीता खूले केले जात आहे. वर्तमानकालीन सरकारने रेल्वे व संरक्षण हे खाजगी क्षेत्राकरीता खुले केले याचा परिणाम विदेशी गुंतवणूकदारांना भारतीय अर्थव्यवस्थे गुंतवणूक करण्याकरीता एक मोठी बाजारपेठ उपलब्ध होत आहे विकास प्रेरित नियोजनाच्या युगाला सुरूवात झाली तेव्हा नेह महालनोबीस प्रारूप या नावाने १९५० मध्ये विकसीत झाले १९८० पर्यन्तच्या दशकात हे सूरू राहिले. योजनेचा मूळ उद्दे



Scanned by CamScanner

प्रामुख्याने, देशात वृध्दीदर प्राप्त करणे तसेच स्वहित व सामाजिक न्याय, हा होता. तृतीय पंचवार्षिक योजने अंतर्गत आत्मनिर्भता, स्वबळावरील अर्थव्यवस्थेचा विकास, दोन्ही योजनेचा अनुभव घेता कृषी उत्पादनात वाढ घडून आणणे व मूलभूत क्षेत्रातील उद्योगांचा विकास करणे यावर भर देण्यात आला होता. परंतु १९६२ च्या चीनच्या युध्दामुळे व १९६५ च्या पाकिस्तानने केलेल्या युध्दामुळे या योजनेतील विकास खर्च सरंक्षणाकडे वळविल्या गेला. चौथ्या पंचवार्षिक योजनेची सुरूवात १९६६ मध्ये आरंभ होणार होती व याचा आराखडा अशोक मेहता यांनी बनविला होता. परंतु या कालावधीत भारतातील भयंकर दुष्काळ, रूपयाचे अवमुल्यन व स्फीतीकारक स्थितीमुळे चौथी पंचवार्षिक योजना १९६६ मध्ये अंमलात येऊ शकली नाही व या कालावधीत तीन वार्षिक योजना राबविण्यात आल्या. चौथी योजना १९६९ ते १९७४ या कालावधीत सूरू करण्यात आली. पाचव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा दुर्गाप्रसादधर यांनी तयार केला. वाढत्या महागाईचा परिणाम आर्थिक मंदीत दिसून येत होता. त्यातच आंतरराष्ट्रीय स्तरावरील पेट्रोल, डिझेल यांच्या किमतीतील वाढीमुळे महागाईचे स्वरूप अधिक बिकट झाले होते. या योजने अंतर्गत प्रामुख्याने गरिबीचे उच्चाटन करणे व स्वयं निर्भरता ही दोन उद्दिष्टे ठरविण्यात आली उत्पन्नाचे सुदृढ वितरण व घरेलू बचतीच्या वाढीचा दर विकसीत करणे, निश्चित केले होते. असे असले तरी १९७७ साली नविन सरकारने पंचवार्षिक योजनेचा कार्याला विराम दिला. सहाव्या योजने अंतर्गत दोन्ही सरकारांनी निश्चित केलेली धोरणे राबविलेली दिसून येतात. या योजना कालावधीत कृषीतील व कृषी संबंधीत असलेल्या व्यवसायातील रोजगारात वाढ घडवून आणणे, हस्तकला व्यवसाय व लहान उद्योग क्षेत्रांचा विकास करणे, उपभोग्य वस्तूचे उत्पादन व लहान उत्पन्न गटातील लोकांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे हे ठरविण्यात आले होते. सातव्या पंचवार्षिक योजना कालावधीत धोरणात्मक कार्यक्रम अधिक गतिशील करण्यावर भर देण्यात आला. ज्यामध्ये अन्न धान्याच्या उत्पादनातील वाढ, रोजगाराच्या संधीतील विस्तार, व उत्पादन घटकाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्याचे उद्देश निर्धारीत करण्यात आले होते. आठवी पंचवार्षिक योजना सुरू करण्यापूर्वी पून्हा दोन वर्षात प्रतिवर्ष योजना राबविल्या गेली. आठव्या पंचवार्षिक योजना काळ हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक संघर्षाचा काळ होता. कारण शोधनशेषातील असंतुलन, कर्जातील वाढ, अंदाजपत्रकीय तूट, शिगेला पोहचलेली महागाई व उद्योग व्यवसायातील मंदी यातून राजकोषीय सुधारणा आर्थिक सुधारणा व अर्थ व्यवस्थेला चालना देण्याचे धोरण निश्तिच केल्या गेले. नवव्या पंचवार्षिक योजना कालावधीत चार महत्वाचे धोरणे ठरविण्यात आली होती. ज्यामध्ये गुणात्मक जीवनमान, उत्पादकीय रोजगाराची निर्मिती, प्रादेशीक संतुलन व स्वयं निर्भरता, वृध्दी दरातील गती अधिक करण्याकरीता कृषी विकासावर भर, ज्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील गरिबी निर्मूलन व रोजगारात वाढ, जी मागील १५ वर्षापासून अर्थव्यवस्थेत संचित झाली. या योजनेतील सर्वात महत्वाची बाब म्हणजे लोकाभिमुख योजना म्हणून तिची ओळख करून देण्यात आली. दहाव्या पंचवार्षिक योजना कालावधीत मागील योजनेतील उद्देशांची पूर्ती करणे, आर्थिक सुधारणेनंतर सकल घरेलू उत्पादनातील वाढ घडून आणणे व समता सामाजिक न्याय देणे यावर भर देण्यात आला होता. अकराव्या योजने अंतर्गत सर्वसमावेशक वृध्दीदर (Inclusive growth) प्राप्त करणे तसेच या योजने अंतर्गत भौतिकीय कंपनीची निर्मिती, मनुष्यबळ व त्यांची क्षमता व उत्पादकीय रोजगारातील संधीचा विस्तार ज्याचा अधिक लाभ, खालच्या व मध्यम गरिबीत जीवन जगणाऱ्यांना होतील. जे शाश्वत व सर्वसमावेशक विकासाकरीता उपयुक्त होईल हे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. येथे केवळ सर्व समावेशक वृध्दीदरच अपेक्षीत नाही तर याचा परिणाम सर्व सामान्यांच्या राहणीमानात वाढ घडून आणणे देखील शक्य करणे होय. याकरीता सुधारीत व गुणात्मक वितरण साधणे देखील महत्वाचे ठरेल. ज्याचा फायदा लाभार्थींना होईल. सध्या बारव्या योजनेला आरंभ होऊन जवळपास दोन वर्षाचा कालावधी संपत आहे. नवीन सरकार व प्रशासन यांचेकडून अनेक अपेक्षा आहेत.

**आर्थिक सुधारणानंतरचा कालावधी -** योजना विश्लेषणातून आर्थिक सुधारणांचे परिणाम थोडक्यात स्पष्ट केल्या गेले. १९९१ नंतर आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम मागील २० वर्षापासून भारतात कार्यान्वीत होत आहे. त्याचे अनुकूल प्रतिकूल परिणाम विकासास पोषक की मारक तसेच सुधारणेनंतर जगाच्या पातळीवर भारताची झालेली ओळख याचे महत्व विशेष आहे. या विश्लेषणातून जे अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल व भविष्यातील भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी व तिचे मूल्यमापन अर्थशास्त्रीय विश्लेषणातून करणे

Scanned by CamScanner

महत्वाचे आहे. कारण जगातील सर्वच राष्ट्रांनी आज अनिर्बंध अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आहे.

आज समाजवादी धोरण मागे पडत आहे. समाजवादी धोरणांची कास धरून भारताने ८ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंत अर्थव्यवस्था पुढे नेली. सर्व स्तरातील लोकांचे जीवनमान उंच व्हावे, सर्वांना रोजगाराच्या संधी प्राप्त व्हाव्या, शिक्षण, आरोग्य, परिवहन, दळणवळण, दूरसंचार, संरक्षण, असे अनेक उपक्रम सार्वजनिक क्षेत्राशी निगडीत होते त्यामुळे या क्षेत्रातील नफ्याची विभागणी खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत होत नव्हती. सार्वजनिक उपक्रमातून प्राप्त नफा हा पुन्हा पूनर्गुतंवणूकीकरीता वापरल्या जात होता. बाजारपेठीय व्यवस्थेत विशेष प्राधान्य नसल्याने सरकारी उपक्रमातून सेवेच्या व वस्तूच्या वितरणाचा प्रत्यक्ष लाभ लाभार्थींना प्राप्त होत होता. परंतु १९९१ नंतर भारताने देखील आपली अर्थव्यवस्था खूली करण्यास आरंभ केला, तेव्हा ही काळाची गरज आहे असे म्हटल्या गेले. सरकार हळूहळू सार्वजनिक क्षेत्राकडून खाजगी गुंतवणूक व विदेशी गुंतवणूकीस प्राधान्य देण्यात समोर येऊ लागले. संरक्षीत अर्थव्यवस्थेला खूले केल्यामुळे बाजार स्पर्धेत वाढ होण्यास आरंभ ठरले दोन्ही उद्योग व व्यवसाय हे स्पर्धेत टिकतील की नाही असा प्रश्न अनेकांना पडला व पडत आहे काही टीकाकारांनी तर भारताच्या सार्वभौमत्वावर प्रश्न चिन्ह निर्माण केले होते. आज दूसऱ्या पीढीतील सुधारणेनंतर आपणास असे स्पष्ट करता येईल की, काही अनुकूल तर काही ठिकाणी प्रतिकूल परिणाम अर्थव्यवस्थेत दिसून येत आहे.

GATT नंतर आंतरराष्ट्रीय व्यापार योग्य व अधिक उपयोगी व्हावा व विकसीत व विकसनशील राष्ट्रांना आयात निर्यात व्यापारात समान न्याय मिळावा या दृष्टीने, व्यापारातील अटींचे व शर्तीचे उल्लंघन झाल्यास त्यांना न्याय मिळून देण्याकरीता विवाद समितीचे गठण करण्यात आले आहे. WTO च्या अनेक प्रावधानाने आंतरराष्ट्रीय, अर्थव्यवस्था खूली केल्या गेली. ज्यामध्ये विशेष करून भांडवल प्रवाह पूर्णतः अनियंत्रीत करण्यात आला. संपूर्ण जगातील अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीदारांना थेट विदेशी गुंतवणूक व संस्थागत गुंतवणूक करण्यास मुभा मिळाली. उत्पादनाच्या दोन महत्वपूर्ण घटका अंतर्गत भांडवल व श्रम हे महत्त्वपूर्ण समजल्या जातात परंतु या ठिकाणी असे दिसून येते की WTO च्या विविध प्रावधानाने जगातील आर्थिक व्यवहार सुकर व्हावे याकरीता भांडवलांची गतिशीलता आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढविली परंतु त्याच वेळी श्रमाची गतिशीलता वाढविण्याकडे दुर्लक्ष केल्या गेले. श्रम बाजारपेठ आंतरराष्ट्रीय व्यापाराकरीता आजही नियंत्रीत आहे.

भांडवलाच्या गुंतवणूकीतून अधिक नफा प्राप्त करून देण्यांची ही विशेष सोय जागतिकीकरणात करण्यात आल्याचे दिसून येते. शिवाय देशी उद्योगाशी स्पर्धा ही अर्थव्यवस्थेतील दिर्घकालावधीत अडचण निर्माण करणारी बाब ठरू शकेल. परंतु श्रमाच्या संदर्भात विकसनशील राष्ट्राने व विकसीत राष्ट्राने कुशल श्रमिकाचे व अकुशल श्रमीकांचे मजूरीचे दर कसे राहतील, त्याची रचना कशी असेल, ते नफ्याच्या पातळीपर्यंत किंवा त्यापेक्षा कमी, असे कोणतेही स्पष्टीकरण श्रमाच्या बाबतीत दिसत नाही. श्रमधोरणच जागतिकीरणाला मान्य नाही असे थोडक्यात म्हणावे लागेल. या उलट कमी मजूरी दरातून ज्या ठिकाणातून उत्पादन करून घेता येते त्या ठिकाणी उत्पादन करून घेण्याची स्पर्धा विविध देशी कंपन्यामध्ये लागलेली दिसून येते, यालाच out sourcing या नावाने संबोधल्या जाते. भारत देखील आज out sourcing च्या बाबतीत सातव्या क्रमांकावर आहे. यावरून हे स्पष्ट होते की, भांडवली गुंतवणूक करणाऱ्यास अमाप नफा प्राप्त करून घेण्याकरीता जगाची अर्थव्यवस्था खूली केली परंतु भृतीदर किंवा वेतनाचे दर वाढू नये म्हणून ज्याठिकाणी श्रम स्वस्त आहे. अशा ठिकाणाहून उत्पादन करणे म्हणजेच उत्पादन व्यय कमी करणे, उत्पादन व्ययावरील विक्री किमतीतून अधिकार प्राप्त करणे व सोयीस्करपणे श्रमिकांचे शोषण करणे हे खुल्या अर्थव्यवस्थेतून स्पष्ट होतांना दिसत आहे. नफा, वेतन किंवा मजूरी हा संघर्ष पुन्हा नव्या प्रारूपात जन्म घेत आहे. चीन सारख्या साम्यवादी राष्ट्रात अर्थव्यवस्था खुली केल्या गेल्यावर श्रम किंवा श्रमिकाबाबत higher and fire चे तत्व वापरण्यात आल्याचे दिसून येते. श्रमधोरणा बाबत बोलावयाचे तर आज श्रमिक संघ जवळपास संपलेले आहे. सुशिक्षित तरूण नोकरी करणारा असेल तरी तो श्रमिक संघाचा सदस्य होण्यास तयार नाही, कारण त्याच्या समोर जो महत्वाचा प्रश्न आहे तो उदरनिर्वाहाचा खाजगी क्षेत्रात आज श्रमिक कायद्याचे पालन केले जात नाही या क्षेत्रात काम करणाऱ्यास जवळपास १५ ते १६ तास रोज कार्य करावे लागते. वेतनाचा किंवा मजूरीचा दर जीवन निर्वाह पातळीपर्यंतचा असलेला दिसून येतो. हा जागतिकीकरणाचा सर्वात मोठा दोष होय. उत्पादनाच्या सर्वच घटकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर तंत्रज्ञानाचा समान

Scanned by CamScanner

पातळीवर अंतर्भाव करून अर्थार्जनाच्या समान संधी उपलब्ध झाल्या असल्या तर विकसनशिल राष्ट्राचे विकासाकरीता वापरलेले प्रारूप फलद्रूप झाले असते. खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यावर आर्थिक विकास एकूण सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीव दरातून प्राप्त होतो. डिसेंबर २००८ मध्ये भारताचा आर्थिक विकास दर ९.१ टक्के इतका झाला होता. परंतु त्याचवेळेस U.S.A. व U.K. मध्ये, तारण बुडबुडा निर्माण झाला व लेहमन ब्रदर्स व मेरी लीन्च या दिग्गज वित्तिय कंपन्याचे दिवाळे निघाले. त्यानंतर अमेरिकेत जवळपास सर्वच वित्तीय कंपन्याचे अवसायन झाले. General Motors सारख्या कंपनीला आर्थिक मदत घोषित करावी लागली. याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसून येण्यास सुरूवात झाली. ९.१ टक्के विकासाचा दर हा आज ५.२ टक्के इतका झाला. महागाईचा दर वजा केल्यास निव्वळ वास्तविक विकासदर ४.६ टक्के पेक्षा अधिक नाही. या कालावधीत चीनचा विकास दर १३.५ टक्के वरून ९ टक्के वर येऊन पोहचला आज त्यात वाढ होत आहे. परंतु मागील काही वर्षात भारताचा आर्थिक विकासाचा दर ५.५ टक्के पेक्षा जास्त झाला नाही. ही अतिशय गंभीर बाब होय. २०११-१२ मध्ये चालू खात्यावरील तूट ही अनियंत्रीत झाली होती. जी ४.५ टक्के पेक्षाही जास्त होती. ही तूट अनेक कारणामुळे निर्माण झाली. ज्यामध्ये प्रामुख्याने सोने आयात, पेट्रोल व डिझेलचे वाढलेले दर, कोळसा आयात, इलेक्ट्रॉनिक वस्तु व क्रॉकरी यांची मोठ्या प्रमाणात आयात झाल्यामुळे चालू खात्यावरील देयता वाढत गेली. आज चालू खात्यावरील देयता नियंत्रित झाली असली तरी, विकास दर कुंठीत अवस्थेतच दिसून येतो. अर्थव्यवस्थेला चालना देण्याकरीता केंद्रीय स्तरावर विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. आर्थिक मितव्ययता, आर्थिक शिस्त, कमीत कमी व्ययात जास्तीत जास्त रिटर्न प्राप्त करण्याच्या दिशेने प्रयत्न होत आहेत. स्वबळावर अर्थव्यवस्था Self driven economy चालविली जावी हा देखील प्रयत्न करण्यात येत आहे. असे असले तरी पायाभूत उद्योगाच्या विकासाकरीता व पायाभूत सोयी सुविधांचा विकास व्हावा या दृष्टीने केंद्रांत आलेले नविन सरकार प्रयत्न करीत आहे. देशात रोजगारात वाढ व्हावी याकरीता Make in India ची घोषणा करून विदेशी भांडवलदारांना आकर्षीत करण्यात येत आहे. यातूनच थेट विदेशी गुंतवणूक व संस्थागत गुंतवणुकीला भारतात गुंतवणूक करण्यास चालना मिळेल. अर्थव्यवस्थेत विविध प्रश्नाची संख्या अमर्यादित आहे. व्यापार चक्राचे दुष्परिणाम, नैसर्गिक आपत्ती, विदेशी वित्तीय संस्थांच्या आर्थिक धोरणाचा परिणाम, अनियंत्रित विनिमय दर, स्फिती, बेरोजगारी गरिबी, वास्तविक संपत्तीच्या दरातील प्रचंड वाढ आरोग्य, शिक्षण, विदेशी व्यापाराची संरचना, कृषी विकासाचा स्थैतीक दर शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अनिर्बंध उद्योग व्यापारातून निर्माण होणारा नफा, असंघटीत क्षेत्राचे संरक्षण अशा अनेक प्रश्नासोबत भारतीय अर्थव्यवस्था आपली वाटचाल करीत आहे.

असे दृश्य असले तरी मौद्रिक धोरणातील व राजकोषीय धोरणातील आवश्यक असलेले पर्यायी संतूलन शोधून उत्पादनाच्या घटकाला प्रोत्साहीत करणारे व त्या अंतर्ग समानता निर्माण करता आल्यास भारतीय अर्थव्यवस्था भविष्य काळात निर्माण होणाऱ्या असंख्य प्रश्नाना सहज सोडवू शकेल एक मजबूत अर्थव्यवस्था म्हणून तिच्यात जगाची आर्थिक आव्हाने पेलण्याची ताकद निर्माण होऊ शकेल. यात यश प्राप्त करण्याकरीता देशातील जनतेने श्रम, उत्पादकता, कार्यक्षमता सचोटी, शिस्त, चारित्र्य व इमानदारी या सर्व पैलूचा खोलव जाऊन प्रत्यक्षात जीवनात उतरवण्याचा प्रयत्न केल्यास त्या अप्रत्यक्ष लाभ अर्थव्यवस्थेला होईल व यातूनच भारता राजकोषीय तूट व महसूली तूट नियीमत होण्यास मदत होई असे झाल्यास उद्याचा भारत जनतेचे कल्याण करणारा असेल प्रत्येक नागरिक या कल्याणात सुख व शांती या समीकरण जीवन जगणारा असेल अशी अपेक्षा करू या.

**संदर्भ ग्रंथ -**


१) भारतीय कृषी अर्थव्यवस्था - सी.बी. ममोरिया
२) Economic Journal - Indian Economic Association 201
३) Conference Volume - Indian Economic Associati 2005
४) WTO - Prof. Batra
५) Indian Industrial Economics - Prof. Maddaya
६) आर्थिक चिकित्सा - डॉ. मुक्ता जहागिरदार


Scanned by CamScanner



**डॉ.अरुणा सोनेगांवकर**
वी.एम.वी कॉलेज, नागपूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समर्पित समाजसुधारक असून त्यांनी राजकीय, धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक विषयांवर व्यापक विचार वेळोवेळी व्यक्त केले. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांचे आर्थिक विचार केवळ आनुषंगिक विचार म्हणूनच दुर्लक्षित राहिले परंतु त्यांनी अर्थशास्त्र या विषयातच विपूल असे संशोधन व लेखन केलेले आहे. त्यांच्या अध्ययन व चिंतनाचा अर्थशास्त्र हा एक महत्वाचा विषय होता. १९१५ या वर्षी त्यांनी 'प्राचीन भारतीय वाणिज्य' या विषयावरील शोधप्रबंध कोलंबिया विद्यापीठाला सादर केला व एम. ए. अर्थशास्त्र ही पदवी प्राप्त केली. जून १९१६ यावर्षी त्यांनी "भारताचे राष्ट्रीय उत्पन्न एक ऐतिहासिक व विश्लेषणात्मक अध्ययन" हा प्रबंध सादर करून पीएच. डी. प्राप्त केली. अर्थशास्त्रातील अधिक संशोधनासाठी त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अ‍ॅन्ड पोलिटीकल सायंस या संस्थेत प्रवेश घेतला. "ब्रिटिश भारतातील राजेशाही वित्ताचे प्रादेशिक विकेंद्रिकरण "या शोधप्रबंधाला सादर करून त्यांनी एम.एससी. ही उच्चपदवी प्राप्त केली. त्यांच्या "ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती" या प्रबंधाला जगप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रो. सेलिग्मन यांनी प्रशंसोद्‌गार काढून त्यांच्या अभ्यासाला गौरवले होते. द. प्राब्लेम ऑफ रूपी" या विषयावरील त्यांच्या शोधप्रबंधावर लंडन विद्यापीठाने त्यांना डी. एससी ही पदवी दिली होती. हे सर्व पाहता ते अर्थतज्ञ म्हणून जरी नावारूपास आले नसले तरी एका अर्थतज्ञाची पूर्ण क्षमता त्यांच्याजवळ होती ही बाब स्पष्ट होते. त्यांचे आर्थिक विचार त्यांचे आर्थिक तत्वज्ञान त्यांनी केलेल्या विपूल लिखाणातून, संसद घटना परिषद, मुंबई कायदे मंडळ इत्यादी ठिकाणी केलेल्या भाषणातून उपलब्ध आहे. त्यांचे तेच आर्थिक विचार येथे वर्तमानाचा संदर्भ घेत मांडण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून करण्यात आला आहे.

**पार्श्वभूमी** :- भारतात इंग्रजाची राजवट होती. राजकीय गुलामगिरीचा तो काळ होता. देशातील श्रीमंत व राजकीय वरदहस्त असलेल्या भांडवलशाही व्यक्तीचे साम्राज्य सर्वत्र पसरलेले होते. मुठभर असलेल्या व्यक्तीच्या ठिकाणी सत्तेचे केंद्रिकरण झाले होते. आर्थिक आणि सामाजिक शोषण सुरू होते. गरीबांचा वाली नव्हता. जातीभेद पराकोटीला पोहचले होते. अन्न, वस्त्र निवारा, आणि सामाजिक सन्मान यांचा सर्वत्र अभाव होता. निरक्षरता, अज्ञान, अंधश्रध्दा, परंपरा यांचा पगडा सर्वत्र सामान्य जनमानसावर मोठ्या प्रमाणात होता. देशाला स्वातंत्र्य मिळण्याचा काळ जवळ आला होता. देश स्वतंत्र झाल्यास देशाचा शोषणमुक्त आर्थिक विकास हा अर्थतज्ञांचा अभ्यास विषय होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या काळात आपल्या आर्थिक विचारांनी देशाला एक दिशा दिली त्याचेच विवेचन प्रस्तुत निबंधात केले आहे.

इंग्रजांच्या काळात भारतात आर्थिक गुलामगीरीची समस्या निर्माण झाली होती. या संदर्भात बाबासाहेबांचे विचार असे होते.

१. भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात बदल व्हावयास पाहिजे. याशिवाय आर्थिक गुलामगिरीच्या पाशातून सुटका होणार नाही. भारतीय खेडी स्वयंपूर्ण व्हावयास हवी. तसे प्रयत्न व्हावयास हवे. याकरिता स्थानिक रहिवाशांना त्यांचा अहंकार दूर ठेवावा लागेल. कठोर परिश्रम करावे लागतील ज्ञानप्राप्ती करावी लागेल. मनाचा मोठेपणा दाखवावा लागेल आणि जातीभेदापासून दूर राहावे लागेल.

- वर्तमान स्थितीत या संदर्भात फारशी प्रगती झाली नाही असे दिसून येते.

२. भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा पाया असून ग्रामीण अर्थव्यवस्थेची मदार शेतीवरच आहे. शेतजमीनीची मालकी



Scanned by CamScanner

वरिष्ठ जातीकडे एकवटलेली असल्यामुळे श्रमिक आणि शेतमंजूर परंपरागत कामे करित असतात. त्यांना विकासाच्या संधीच उपलब्ध नाहीत. त्या उपलब्ध करून देण्यात याव्या. जो कसेल त्याची जमीन असावी.

- वर्तमान स्थितीत अशी परिस्थिती राहीली नाही सर्वच जाती जमातीकडे शेत जमीनीचे विभाजन झालेले आहे. शेत ज़मीनीचा आकार कमी झाला आहे. मात्र शेत मजुरांची कमतरता तिव्रतेने भासत आहे.

३. ग्रामीण भागातील अस्पृश्यता, श्रमविभागणी, श्रमिकांची गतिक्षमता नसणे, आणि श्रमाला प्रतिष्ठा नसणे त्यांची सौदाशक्ती कमी असणे यामुळे त्यांचे आर्थिक शोषण होते. ते अग्रक्रमाने थांबवावयास हवे. ग्रामीण भागातील अस्पृश्य, शोषित, पीडित अशा समुहाच्या आर्थिक उन्नतीमुळे देशातील अस्पृश्यतेचे उच्चटन निश्चितपणे होईल.

- वर्तमान स्थितीत अस्पृश्यतेचे उच्चाटन मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

४. अशा पिडित वर्गाला शैक्षणिक आणि आर्थिक सवलती मिळाल्या तर त्यांच्या जीवनमानात आमुलाग्र बदल होऊ शकतो. याकरिता परंपरागत स्वरूपाची ग्रामीण अर्थव्यवस्थेची चौकट उखडून टाकावी लागेल. केवळ कायदे करून हा प्रश्न फारसा सुटणार नाही. शक्य असल्यास शेतजमीनीचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे. असा क्रांतीकारक विचार मांडूनच ते थांबले नाहीत. आर्थिक गुलामगिरी विरूध्द दलितांनी, शोषितांनी आवाज उठवला पाहिजे. असे विचार त्यांनी मांडले. यातूनच शोषितांना नवा आशावाद प्राप्त झाल्याचे दिसून येते.

- स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक आणि आर्थिक सवलतींचा परिणाम स्वरूप अपेक्षेप्रमाणे पिडीतांच्या आणि शेषितांच्या जिवनमानात अमुलाग्र बदल झालेला आहे. मात्र शेत जमिनीचे राष्ट्रीयीकरण न झाल्यामुळे त्याच्या फायदयापासून हा समाज अजुनही लाभान्वीत झालेला नाही.

५. बाबासाहबाच्या आर्थिक तत्वज्ञानाचा गाभा हा परंपरागत स्वरूपाचा आर्थिक मानव नाही तर मानवाचा जीवनपैलू आहे. प्रत्येक मनुष्य हा ज्या परिसरात वावरतो किंवा ज्या ठिकाणी वास्तव्य करतो त्या ठिकाणाच्या प्रश्नावावतचा अभ्यास हा त्यांनी अर्थकारणाचा केंद्रबिंदू मानला. व हा केंद्रबिंदू लक्षात घेऊन आर्थिक नियोजन केल्यास आर्थिक विकास होऊ शकतो असे विचार त्यांनी मांडले.

- या संदर्भात देशाची शासन व्यवस्था असफल झाल्याचे वर्तमान स्थिती पाहता स्पष्ट होते.

६. माणूस हा आर्थिक प्राणी आहे. त्यांच्या सर्वकृती व आंकाक्षा या आर्थिक घटकांनी प्रभावित झालेल्या असतात. सत्तेचे खऱ्या अर्थाने संपत्ती हेच उगमस्थान आहे. म्हणूनच आर्थिक समतेवर आधारित असणाऱ्या सुधारणेवरच बाकी सर्व सुधारणा अवंलूबन असतात.

- देषाच्या राज्यसरकारांचा वाढत्या कर्जाचा बोझा पाहता संपत्तीच्या समयोजना संदर्भात अपयश आलेले दिसून येते.

७. लोकशाहीच्या माध्यमातून आर्थिक विषमता कमी करण्यात जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. याकरिता समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या किमान गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. आर्थिक विषमता नष्ट करून आर्थिक समता प्राप्त करणे हा स्वतंत्र्याचा खरा अर्थ आहे. तरच लोकशाहीला उज्वल भविष्य आहे. असे त्यांचे आग्रही मत होते.

- वर्तमान स्थितीत देषातील आर्थिक विषमता कायम असल्याचे दिसून येते. पुर्णपणे जरी नाही तरी प्रत्येकाच्या आर्थिक गरजा पुर्ण होतील इतपत प्रगती अपेक्षीत होती ती झालेली नाही.

८. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारात समाजवादी समाज रचनेचा सूर आढळतो. आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण टाळून संपत्तीचे योग्य वाटप हे आर्थिक धोरणाचे मूलभूत केंद्र असणे आवश्यक आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेत आर्थिक शोषणाला वाव नसतो. मालका सोबतच नौकारांचा आर्थिक विकास यात अभिप्रेत आहे. नफयात श्रमिकांचा वाटा असावा हा मूलभूत दृष्टीकोण त्यांच्या आर्थिक विचारात आढळून येतो. केवल कुटूंब प्रमुखच श्रीमंत असून चालणार नाही. कुटूंबातील प्रत्येक व्यक्तीला श्रीमंतीचा उपभोग घेता



Scanned by CamScanner

आला पाहिजे. गावातील प्रत्येक व्यक्तीची आर्थिक पातळी सम असावी असे त्यांचे मत होते.

- वर्तमान स्थितीतही देशात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण अस्थित्वात आहे याचाच अर्थ संपत्तीचे योग्य वाटप अजुनही झालेले नाही.

९. श्रमिक उपाशी असेल तर मालकांला पोटभर जेवण्याच्या अधिकार नाही. श्रमिक तृप्त झाल्यानंतरच उरलेल्या संपत्तीचा मालकाने उपभोग घेतला पाहिजे. ही मानवी नैतिकता त्यांच्या आर्थिक विचारांच्या केंद्रस्थानी होती.

- वर्तमान स्थितीत या नैतिकतेचा अभावच सर्व राज्यातुन दिसून येतो. इतरांना सुखी करून स्वतः सुखी व्हायचे हा भारतीय सुखाचा मंत्र राज्यकर्ते विसरले असल्याचे वेळोवेळी अनुभवास येते.

१०.आर्थिक शोषण ही प्रक्रिया भांडवलशाही अर्थव्यवस्थेत गतिमान झालेली असते. कार्ल मार्क्स व जे.एम. किन्स यांच्या प्रमाणेच बाबासाहेबांचा भांडवलशाहीला विरोध होता. मात्र उपायांबाबतच मतभिन्नता होती. साम्यवादी अर्थव्यवस्थेप्रमाणे उत्पादन साधनांची पूर्ण मालकी सरकारकडेच असावी असे त्यांनी कधीही म्हटले नाही. लोकशाहीच्या चौकटीतच समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा. असा त्यांचा आग्रह होता. अपेक्षा होती. मात्र देशातील शेतजमिनीवर पूर्णपणे सरकारची मालकी असावी याकरिता शेतजमीनीचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे हा अतिशय महत्वाचा विचार त्यांनी मांडला. कारण असे केल्याने संपत्तीची प्राप्ती व तिचे वितरण योग्य प्रमाणात होईल यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

- वर्तमान स्थितीत बाबासाहेबांचा हा विचार सार्थक झालेला नाही. हा उपाय अमलात न आनल्यामुळे संपत्तीची प्राप्ती तर झाली मात्र वितरण योग्य प्रमाणात झालेले नाही.

११.जोपर्यंत विशिष्ट वर्गाचा विशेषाधिकार किंवा मक्तेदारी नष्ट होत नाही. तोपर्यंत समाजातील शोषित, पीडित वर्गाच्या शोषणाची प्रक्रिया थांबविता येणार नाही. असे त्यांचे ठाम मत होते.

- वर्तमान स्थिती पाहता आज विशिष्ट वर्गाचा वेशेषाधिकार आणि मक्तेदारी नष्ट झाली आहे असे दिसून येते.

१२.समाजातील आर्थिक व दुर्बल घटकांना शिक्षण, व्यापार या सोबतच समानतेचे अधिकार देण्यात आले तर त्यामुळे साहजिकच या घटकांच्या जीवनात आशेची नवीन पालवी फुटेल या विचारांवर त्यांची श्रध्दा होती. यालाच समाजवादी समाज रचना असे म्हणतात. राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाने अशी रचना निर्माण करता येते.

- आज देशात समाजवादी समाज रचनेची पाळेमुळे खोलवर रूजलेली आहे व देशात प्रगल्भ लोकशाही विकसित होत आहे.

भारताच्या संदर्भात बाबासाहेबांनी विविध आर्थिक विचार मांडून त्यावर पुढील प्रमुख आर्थिक उपाययोजना सूचविल्या त्यांचाही येथे थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. त्यापुढील प्रमाणे.

१. शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे. यामुळे आर्थिक गुलामगिरी नष्ट होऊ आर्थिकदृष्टया कल्याणकारक राज्याची निर्मिती होईल. या अंतर्गत प्रत्येक गावातील कुटुंबास जमिनीचे योग्य वाटप होईल व मिळणाऱ्या उत्पन्नाचे खर्च वजा जाता योग्यप्रमाणात वाटप होईल. सामुदायिक शेतीचा प्रयोग करण्यात यावा. यामुळे कृषिक्षेत्रातील उत्पादकता वाढेल व जाती भेद विरहित सामुहिक प्रयत्नातून आर्थिक विकास होईल.

२. शेतजमिनीच्या राष्ट्रीयीकरणा सोबतच देशातील महत्वाच्या अशा आधारभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे. यात विमा व्यवसायाचाही समावेश असावा. यामुळे सत्तेच्या केंद्रिकरणाला आला घालता येतो. आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण टाळण्यासाठी काही प्रमाणात उत्पादन साधनांवर सरकारची मालकी असावी. असे त्यांनी सूचविले होते.

३. बाबासाहेबांनी आर्थिक उपायांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यघटनेचा आश्रय महत्वाचा मानला होता. कारण समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी राज्यसंस्थेचे अस्तित्व महत्वाचे आहे. राज्यघटनेच्या माध्यामतून या राज्यसंस्थेवर नियंत्रण ठेवता येते हे लक्षात घेऊन त्यांनी भारताची राज्य घटना शोषित आणि पीडित



Scanned by CamScanner

यांना त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीतून वर आणण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व तरतुदी करून ठेवल्या.

उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या आर्थिक विचारांना आधिक खोली होती. देशातील प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक विकासाचा त्यांनी खोलवर अभ्यास केला होता. एका शोषण मुक्त समाजाच्या निर्मितीचे स्वप्न त्यांच्या आर्थिक विचारात पडले होते. त्यांना राज्यघटनेच्या माध्यमातून आश्वासक मदतीचा हात त्यांनी दिला होता. आज भारताचा बहुसंख्य समाज या आर्थिक व सामाजिक शोषणातून मोठ्या प्रमाणावर मुक्त झाला असल्याचे आपण अनुभवतो ते केवळ बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांमुळे आणि आजवरच्या राज्यसंस्थेने त्यांला दिलेल्या प्रतिसादांमुळेच

**संदर्भ :-**


१. प्रा. आर. एस. सोळूंके, डॉ. बाबा साहेबांचे आर्थिक विचार

२. डॉ. बाबासाहेब आंबडेकर गौरव ग्रंथ, प्रकाशक, सौ. नंदी गवळी १४ एप्रिल १९९१ प्रथम आवृत्ती.

३. दस स्पोक आंबडेकर, खंड १



**चरपे परिवारातर्फे अधिवेशनास हार्दिक शुभेच्छा!**



वेषधारी चरपे
L.I.C. Adviser

LIC

- Chief Life Insurance Adviser
- Member of Chairman Club
- Authorised L.I.C. Premium
- Authorised Agency Recruitment Centre
- M.D.R.T.

ए-३८, गाडगेनगर, रमना मारोती रोड, नागपूर-२४ मो. ९३७२३०३०११


Scanned by CamScanner



P. K. Lakhe
Head, Dept. of Economics
V.N.Govt.Inst.of A.S.S. Ngp

# B. R. AMBEDKAR - RELEVANCE TO THE PRESENT NEW ECONOMIC POLICY

Babasaheb Ambedkar fought the battle for attainment of equitable social order and social justice intervervoven into integrated society. According to him, in Indian society class and caste discriminations are not different, both are the same. He advocated casteless and classless ideal society which was based on political, social and economic democracy. This social struggle made him establish an ideal social order based on equality, liberty and fraternity. Ambedkar became the first and foremost lawgiver for the entire Indian Society, including these who for centuries dominated his own oppressed and depressed classes. To promote the well being of these oppressed classes, the constitution provided special safeguards and provisions with a view to achieve social justice. The fruits of these provisions are not properly reaching to the Dalits and others as visualized by the founding father of Indian Constitution.

An attempt is made in this paper to analysis Ambekar's socio-economic philosophy and relevance of his economic ideas in the present new economic policy.

**Ambedkar political and economic democracy -** According to B. R. Ambedkar the main object in his framing the constitution is real two fold (i) To lay down the form of political democracy and (ii) to lay down our ideal as economic democracy and also to prescribe that every govt. shall strive to bring about economic democracy. The parliamentary democracy ignored the economic inequalities resulting from capitalist system. Parliamentary democracy failed to realize the significance of equality with the result that liberty swallowed equality and has reduced democracy to a name and force. It may slip in dictatorship. So that he may not have a believe of democracy as an ideal to be pursued in the circumstance. He also did not say that parliamentary democracy is the only ideal form of political democracy. So he advocated for the establishment of state socilisation to retain parliamentary democracy and avoid dictatorship. The constitution also wishes to lay down an ideal before those who would be for forming the govt. The ideal is economic democracy, whereby so far as I am concerned I understand to mean "one man one vote" The question is have we got any fixed idea as to local we should fixed idea as to local we should bring about economic democracy? There are various ways in which people believe that economic democracy can be brought about, there are those who believe in individualism as the best from of economic democracy, there are those who believe in having a socialistic state as the best form of economic democracy, there are those who believe in the communistic idea as the most perfect form of economic democracy. Ambedkar further said "we have deliberately introduced in the language that we have used, in the directive principles, something which is not fixed. We have left enough room for people of different ways of thinking with regard to the reaching of the idea of economic democracy of strive in their own way to pursue the electorate that it is the best way of reaching economic democracy,



Scanned by CamScanner

the fullest opportunity to act in the way in which they want to act. He was the opinion that the classless society can be termed economic democracy.

**Economic Ideas of B. R. Ambedkar -** Babasaheb Ambedkar who the first Indian to write a comprehensive economic study of National Dividend for India. In fact he made a significant contribution in the field of public finance and minority economics. His ideas regarding administration, provincial autonomy and problems of Indian people, poverty unemployment and inequalities, stagnant agriculture distorted industrialization, nationalization & insurance and privatization were outstanding let us synthesis the economic ideas of Ambedkar which provide an insight into his thinking on the various economic issues. To put in brief the central elements of Ambedkar's economic ideas essentially include.

1) A social framework with parliamentary democracy particularly in Agriculture and basic and key industries.
2) Efficient and productive working of public sector undertakings.
3) Planned economic development.
4) Strong participation an active race of the govt. in economic governance.
5) Emphasis on industrialization to induce the productive development of Agriculture sector.
6) Capital investment in agriculture sector improves the productivity.
7) Focus on the planning on the labour, poor and the social downtrodden.
8) Provision of protest against the economic and social discrimination in the forms of reservation policy in favour of downtrodden.
9) General belief in the scientific development and modern technology.

**Social Justice and New Economic Policy -** In pursuance of the constitutional provisions for the historically disadvantaged, the Central and State Govt. have adopted a number of measures for the economic, educational and social uplift of these disadvantaged groups. The reservations for SC, ST and OBCs being implemented since 1950 under Art 15(4), 16(4), 46, 335, 14, 338 in all Central Provincial municipal and other authorities mentioned in Art 12, have gradually ceased to operate the moment these institution / establishment are privatized under the new economic policy introduced in 1991, through executive order which is unconstitutional as in violates the policy laid down in directive principles of state policy contained in part IV of the constitution annex. That these rights are linked with the ownership as private property rights under Art 31 i.e. rights in the means of production. The change in the rights under Art 31 in the means of production would bring change in the fundamental rights of the Weaker Sections. The Weaker derive their right to reservation from art 46 of the Directive Principles of State Policy, where the state is enjoyed with responsibility to promote the economic and educational interest of the weaker sections specially the SC and ST with special case. An analysis of total number of SCs employed in govt. PSUs and public sector banks would several that their total number decreased in 1977 while a total number of 11,27,050 SCs were employed in this section, excluding the sweepers in 1992, the no. reduced to 10,13,600 in 1997, registering a decreased of 10.07 percent. With liberlisation, globalization and privatization of Indian economy gathering grater momentum, the employment opportunities available for the SCs would further shrink. A reduction (10.07 percent) in the SCs employed in the three sectors cannot be explained due to more opportunities opening in other sectors of the economy. The most point is that incoming are decade the employment opportunities available in govt. PSWs and nationalized Banks will get drastically reduced. There is also a declining trend in the job opportunities available for SCs in the Central Govt. Services Employment under Group A, B, C and D, Shrank from 36,59,391 in 1992 to 35,44,262 in 1999, revealing a declining of 3.14



Scanned by CamScanner

percent. It seavels that the weaker sections are more affected by decrease in job opportunities. The govt. was the budget speech 2 percent cut per annum in the strength of the employees of the Central Govt. Services announced by the finance minister in 2001-02 budget, would hasten the reduction proceeds and cannot bring canfort to SCS. More than the impact that the down sizing of the govt. will have on the employment opportunities available for SCs, it would be the consequences of the new economic policy, which will adversely affect their employment opportunities in PSWs. During the period 1992-1999 total employment opportunities in PSUs under group A, B, C and D, Shrank from 21,52,650 to 18,00,628 registering a decline of 16.35 percent and the job opportunities for SCs also declined.

In this era of new-capitalism and globalization, both developed and developing countries are struggling to balance their humanitarian responsibility and social security measures with the demands of greater control and private initiate, which are integral part of market economy. Its effect on the affirmative action programme / policy of reservation is also to be seen.

**Conclusion :** B. R. Ambedkar is a unique personality in the social history of India. He struggled for self respects social equality, human dignity and fraternity. He advocated ideal social order. He was a great scholar and statesman, a leader and liberator and an architect of Indian Constitution.

**References :**


1. Dr. B.R. Ambedkar and relevance of new economic policy.
   P.K. Verma, P.P. Shukla, Indian economic Journal December-2013.
2. Relevance of Dr. Ambedkar's economic thought in the 21st Century.
   R.P. Singh and B.K. Singh, Indian economic Journal December-2013.


Scanned by CamScanner




**प्रा. मनिष तंबाखे**
श्री गजानन कनिष्ठ महा.,
नागपूर


# डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार

**प्रस्तावना** - भारतीय आर्थिक विचारांच्या पध्दतशीर मांडण्याला खऱ्या अर्थाने १९ व्या शतकापासून आरंभ झाला. भारतातील आर्थिक विचारांच्या विकासाचा सखोल अभ्यास करतांना डॉ. आंबेडकर यांच्या लिखाणाचा विचार करणे अनिवार्य ठरते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण घटनातज्ञ, कायद्याचे गाढे अभ्यासक संसदपटू राजकारणी अशा विविध पदव्यांनी ओळखतो. पण एक अर्थशास्त्र म्हणून त्यांची ओळख दूर्मीळ आहे. डॉ. आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशात महू या गावी झाला होता. त्यांचे वडील रामजी आंबेडकर हे सैन्यात सुभेदार होते व ते महाराष्ट्रात दापोली येथे कार्यरत होते. बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण दापोली येथे झाले. मुंबईच्या एलफीस्टन महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी प्राप्त केली. त्यांच्या जडणघडणीत बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांचा वाटा मोठा होता. अमेरिकेत कोलंबिया विद्यापीठात आणि इंग्लडमध्ये लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये त्यांनी उच्च शिक्षण आणि डॉक्टर पदवी प्राप्त केली. १९४२-४६ य काळात ते व्हाईस रॉयच्या कार्यकारी मंडळात मजूरमंत्री म्हणून कार्यरत होते. त्यांनी मागासवर्गीयांची शैक्षणिक व आर्थिक उन्नती करण्यास फार मोठे प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी पिपल्स एज्यूकेशन सोसायटी स्थापना केली. नेहरूंच्या मंत्रीमंडळात ते कायदामंत्री होते. घटन समितीने घटनेचा मसुदा तयार करण्याकरीता नेमलेल्या समीतीचे ते अध्यक्ष होते. हिंदू कोड बिल लोकसभेला सादर करण्याचा त्यांनी मिळविला.

**आंबेडकरांचे आर्थिक विचार** - लंडनमध्ये असतांना डॉ. आंबेडकरांनी रूपयाचा प्रश्न डॉ. कॅबन यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनात्मक प्रबंध लिहिला. यामध्ये त्यांनी रूपयाच्या उत्क्रांतीचा आढावा घेतला. भारतीय रूपयाची जडणघडण ही सूवर्ण परिमाणात असावी की सुवर्ण विनिमय परिमाणात याबाबत वाद निर्माण झाला. सर्व समायपणे सूवर्ण परिमाणात कागदी चलनाचा वापर होतो. एवढेच नव्हे तर कागदी चलन देऊन सरकारकडून सोने विकत घेता येऊ शकते.

या दोन परिमाणापैकी योग्य परिमाण भारताकरीता कोणते याबाबत वाद होता. याचा पुरस्कार प्रा. केन्स यांनी केला होता. याला बाबासाहेबांनी विरोध केला होता. त्यांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहात नाही. लवचिकता असल्यामुळे चलन निर्मीतीवर मर्यादा राहात नाही. आवश्यकतेपेक्षा जास्त चलननिर्मितीमुळे भाववाढ होतील व रूपयांची किमंत कमी होईल व विनिमयाचे साधन म्हणून रूपयाचे स्थान अस्थिर होईल. याकरीता बाबासाहेबांनी पुरावे सादर केले. हिलटन यंग कमिशनमुळे अर्थशास्त्र म्हणून त्यांनी आपले मत मांडले. आज आंबेडकर केन्स यांचा वाद इतिहास जमा झाला आहे. कारण विनिमय परिमाण वाद ज्या स्थितीत निर्माण झाला होता ती परिस्थिती आज नाही. आंबेडकरांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाणात सुवर्ण - पौंड - रूपया हा संबंध ब्रिटीशांना फायदेशीर ठरणारा होता. १९२६ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचे संबंधी रॉयल कमिशनपुढे डॉ. आंबेडकरांची साक्ष झाली त्या वेळी रूपयाचा प्रश्न म्हणजे रूपयाची किंमत स्थिर राहिली तर वस्तुच्या किंमती स्थिर राहतील व महागाई वाढणार नाही हे स्पष्ट केले होते. १८३५ मध्ये पौंडाच्या तुलनेत रूपयाचे मूल्य घसरले होते व लाखो रूपये ब्रिटनला द्यावे लागत होते. हे भरून काढण्याकरीता ब्रिटीश सरकारने जनतेवर ज्यादा कर लावले.

**शेतीविषयक विचार** - १९१८ मध्ये आंबेडकर यांनी लहान धारण क्षेत्रे व त्यावरील उपाय यावर लेख लिहून प्रकाश टाकला होता. शोध निबंधात शेती विषयक प्रश्नांची व त्यावरील उपयांची चर्चा केली. भारतात शेतीचे उत्पादन उत्तर देशाच्या तुलनेने शेतीची दर हेक्टरी उत्पादन क्षमता कमी असण्याचे कारण शेत




Scanned by CamScanner

जमीनीचे आंतर विभाजन व अपखंडन होय. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनीचे आंतरविभाजन होत आहे. हे होऊ नये म्हणून जमीनीच्या विक्रीवर बंदी घालणे, जमीन जवळच्यास विक्रीवर बंदी आणणे व जमीन गहाण करता येणार नाही या उपायामुळे जमीनीचे धारण क्षेत्र वाढविण्यावर भर देणे हे सुचविल्या गेले. जमीनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर जमीन महसूल आकारणे अन्याय आहे असे बाबासाहेबांनी स्पष्ट केले होते. एका विशिष्ट रककमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना जमीन महसूलात सुट मिळाली पाहिजे असे विचार त्यांनी व्यक्त केले होते. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार असून शेतीतील उत्पादनवाढीकरीता यंत्र प्रधान कृषी विस्तृत शेती, सहकारी व सामुदायिक शेती याचा त्यांनी पुरस्कार केला होता. देशातील पडीक जमीन लागवडीखाली आणल्याने भूमिहीनांचा प्रश्न सुटू शकेल. जमीनदारीचे उच्चाटन करून शेतकऱ्याला जमिनीची वैयक्तिक मालकी न देता सरकारने जमिनीचे मालक व्हावे या दृष्टीने सामुदायिक शेतीवर त्यांनी भर दिला होता. जमीन फसवणूकीच्या "खतेपध्दती" मध्ये खोत अनेक प्रकारे शेतकऱ्यावर जूलूम करीत असे. अनेक वेळा खोत शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावीत असे ही पध्दती समुळ नष्ट केली पाहिजे असे त्यांचे मते होते. जमीन कसणाऱ्यांना कुळाचे वहिवाटचे हक्क मिळावेत व रयतवाडी पध्दती आणावी याकरीता त्यांनी १९३७ मध्ये विधेयक मांडले होते.

**जातीव्यवस्था** - १९२६ ला सातारा येथे भरलेल्या महापरिषदेत त्यांनी मागासवर्गीय बंधुना वतनदारी व गावकरी हक्क सोडून देण्याचा संदेश दिला. त्यामुळे शेकडोंनी गावकीचे काम सोडून इतर कामे करण्यास सुरूवात केली. जातीव्यवस्था ही श्रमिकांच्या अनैसर्गिक विभागणीस कारणीभूत आहे. त्यामुळे भारताचा आर्थिक विकास होत नाही. 'स्टेटस् ॲन्ड मायनॉरटीज या ग्रंथात त्यांना गरिबी हटाव विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्तता यावर भर दिला होता.

**आर्थिक विषमता** - आरक्षण धोरणाचा त्यांनी शास्त्रशुध्द अभ्यास केला होता. केवळ आर्थिक निकष व गुणवत्ता हे निकष ठरविल्यास न्याय व सामाजिक समता याचा बोध होईल. त्यांना न्याय व सामाजिक समता प्रस्थापित व्हावी असे वाटत होते. डॉ. आंबेडकरांनी आर्थिक विषमता कमी करण्याकरीता सार्वजनिक क्षेत्रात उद्योगधंदे निर्माण करावेत. भूमीहिनांना जमीनी द्याव्यात. जमीनीचे राष्ट्रीयकरण करावे त्यामुळे कोणीही कूळ अथवा भूमीहीन राहणार असे त्यांनी आपले विचार मांडले.

डॉ. आंबेडकरांनी भारताला विचाराची एक नवी चौकट उपलब्ध करून दिली व घटनासारखे अमूल्य साधन लोकांना दिले. यावरूनच त्यांची महती स्पष्ट होते.


विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर
८ वे चर्चासत्र २०१४ ला हार्दिक शुभेच्छा !



**डॉ. राजेसाहेब दासराव मारडकर**
तत्त्वज्ञान विभाग
व.ना.शा.क.व.स.वि.स. नागपूर


Scanned by CamScanner



**Namdeo Gholse**
Meherbaba Institute of Management & Research, Manewada, Nagpur

# DR. AMBEDKAR SOCIAL AND ECONOMIC THOUGHT

The freedom movement in India through took its process from 1857. The battle of Indian soldiers against the mighty alian rule of the British, it deep rooted foundation spread its structural based strong in to rural village after the advent of M. K. Gandhi on the Indian scene in 1916. The first quarter of 20th century brought impressive crop of ancient personage who have contributed a lot in making new India. Dr. B. R. Ambedkar merit special mention among them and he also merits space in modern history. DR. B. R. Ambedkar born on 14th April 1891, in Ambed village in Ratnagiri district of Maharashtra State. He was tallest figure in India with modern out look. In his early life faced several social discriminations an outcaste. His ideas were immensely influenced by Ranade and Gokhale, Rama Swami Mayakar and Lohiya. He was genius and profound scholar, an elegant speaker of powerful debater, an emmient jurist and champion for the cause of unprivileged. In brief he was rare specimen of bossom in the dust. Early life he spent in rural area so he had practical knowledge of rural areas and situation of farmers.

Ambedkar was very much sensitive to the problems of poor who then were facing was unemployment problems or and even if employed, they get low wage or income. He wrote a very extensive paper on the issue of small holdings in India and their remedies. Which got published in the journal of Indian Economic Society published in 1918. An economic history several the beat that during British regime the Indian agriculture was most neglected sector. In the name of management there were three types of land tenure system prevailing in the country the Zamindari system the mahalulari system and one Ryotwari. They all were based on the practice of exploitation of the cultivators by rulers. This system created a parasite class of Zamindars, who did not perform any duty on land but snatched away whatever surplus above the minimum subsistence the cultivators produced. In agriculture economy, agriculture be the main source of living. But this source of earnings a living is generally not open for the untouchables.

This is so far variety of reasons. First of all the purchase of land is beyond their means, secondly even if untouchable has money to purchase land he has no opportunity to do so. Upper cast would recent an untouchable coming forwards to purchase land there by trying to become the equal of the touchable class of upper category. As labourers they cannot demand reasonable wages. They have to work for upper cast former only. The wages paid to the untouchables are either paid in case or in carn. Further Ambedkar rightly pointed out that on account of seasonality of agriculture operations. The scheduled caste labour will be subject to seasonal unemployment. This is true with other sections of rural labourer also. But it is important to note that the incidence of seasonal unemployment the untouchable labour will be very high because they do not possess any other alternative means of earning for living.

Dr. Ambedkar envisized the need of rural



Scanned by CamScanner

development of India and advocated rapid industrialization of the country to ameliorate the conditions of the rural population. Superfluous and ideal labour, earning or not consumers in order to live. Hence our efforts should be primarily directed towards this idle labour and strange though it may deem industrialization of India is the soundest remedy for the agricultural problems of India. According to Ambedkar machinery and modern civilization are indispensable for emancipating man from leading the life of a brute and for moving a life of culture possible. The independent labour party founded by him in 1936 included in its comprehensive programme the consolidation of small holdings and extensive technical education, protection of agriculture tenants from exactions and evictions by the land lords.

Dr. Ambedkar was a propounder of social democracy and a founder believer in emancipation of untouchables in India through providing them unward mobility on the skill lader on this issue he had certain opposition to Gandhian Social change ideas. We must make our political democracy a social democracy as well, political democracy can't last long unless these lies at the base of it i.e. social democracy. What does social democracy mean? It means way of life which recognize liberty and fraternity as the principle of life. The speech of Dr. Ambedkar told the fact that Indian economy and its polity and social canvas it framed have multilayers with different economic functions to perform. The upper cast social layers performs economically vibal business and the lower caste people.

They are less paid workers and some times on many occasions they perform unpaid workers of began. The lower strata of backward layers the underclass people perform dirty works on nominal doles, besides despicable treatment and outclass locations either at out skirts of village population or nearby at a distance. These people are untouchable social groups and have been classified as scheduled caste population by constituent assembly, their poor social treatments poor earnings, dirty works, dirty location make them live in depression at lower levels of income and doing graded dirty works.

Dr. Ambedkar, such living and working conditions gave them mental makeup from where one cannot thing of to make upward move on better quality of work, attainment of higher efficiency and high rewarding quality work. Gandhiji's adherence to certain mechanism of caste system and his relief in the spirit of caste system makes him a social philosopher of conservative outlook, while Ambedkar opposition to him placed him in progressive credential. As a conservative socia philosopher Gandhi in due 1920 in a long article o caste system defended certain aspects of the cast system.

Ambedkar was progressive designer of politic He was the first leader who articulated an alternativ egalitarian view of society in the political arena bein taught in open society of America he found soci discrimination at Bombay college.

Besides above thought he has own views o international trade, insurance, democratic econom labour education, health, employment and othe economic description.

**References :**


1) Dr. B. R. Ambedkar : A Social Democrat an Structural Economist of the first order & Tah Hussian Warri and Chitrya Tahir Indian Econom Journal December-2013.

2) Dr. Ambedkar as an Agricultural economist fo Indian Economy, Baij Nath Singh, Indian Econom Journal December 2013

3) Dr. B. R. Ambedkar's Economic Thought : A overview, Om Prakash Ram Satya Ratana Singh an Sir Shankar, Indian Economic Journal December 201

4) Economic Thoughts of Dr. Babasaheb Ambedk Hiralal - Chauhan, Indian Economic Journ


Scanned by CamScanner



**प्रा. अशोक गव्हाणकर**
रावसाहेब ठवरे क. महा.
नविन बाभूळखेडा, नागपूर.

# भारताच्या आर्थिक विकास-संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

भारताच्या आर्थिक प्रश्नांचा एक प्रज्ञावंत भाष्यकार या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे बघितले जाते. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांनी लिहलेला शोधनिबंध (ईस्ट इंडिया कंपनी प्रशासन आणि वित्त व्यवहार-१९१५) व १९१८ मध्ये प्रकाशित झालेला लेख "भारतातील छोटी धारणक्षेत्रे व त्यावरील उपाय" या लेखाने शेतीच्या गंभीर प्रश्नांची उकल या लेखातून पुढे आली आहे. आपल्या अर्थशास्त्रीय ग्रंथामधून त्यांनी केवळ तत्कालीन परिस्थितीचे विश्लेषणच केले नव्हते तर ते करतांना शास्त्रीय व व्यावहारीक तत्वाची मांडणीही केली होती, जी आजही भारतीय अर्थव्यवस्थेला मार्गदर्शक ठरते. त्यांच्या आर्थिक विचारांच्या पार्श्वभूमीला या देशाची जी विदारक सामाजिक स्थिती होती ती आज तरी बदलही आहे असे म्हणता येईल काय? त्यांच्या मते "Progress involves interference with the existing code of social life" असे म्हटले. त्यांनी पुढे असेही म्हटले की, शासक वर्ग असे बदल घडवून आणत नाही कारण त्यांना विरोधाची भिती असते आपली अडचण अशी असते की काही अनिष्ट गोष्टी अस्तित्वात आहे हे दिसत असून देखील त्या सिध्द करता येत नाहीत, अनेक कायदे असले तरी समाजातील जातीभेद, धर्मभेद, विषमता नष्ट झाली नाही उलट निवडणूकांच्या प्रसंगी त्याचा आधार घेतला जातो. अब्जावधी रूपयाचा आर्थिक व्यवहार होतो हे सर्वजण जाणतात परंतू तो फार कमी वेळा सिध्द होतो. मूळ प्रश्न मानसिकता बदलण्याचा आहे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार आजही आर्थिक दृष्टया उचित ठरत आहे.

ईस्ट इंडीया कंपनीचे वित्तव्यवहार आणि प्रांतिक वित्तव्यवस्था यातील त्यांचे संशोधन अर्थशास्त्रातील राजस्व शाखेशी संबंधीत आहे तर रूपयाचा प्रश्न हा विषय मौद्रिक शाखेशी संबंधीत आहे अर्थशास्त्रात हे दोन्ही भाग क्लिष्ट समजले जात असले तरी व्यावहारीक अर्थनितीच्या दृष्टीने महत्वाचे आहे. ब्रिटीश राजवटीत ब्रिटीश भारताच्या संघीय व्यवस्थेत केंद्रिय सत्ता प्रबळ आणि प्रांतिक शासने दुर्बल होती. भारताचे रूपया हे चलन प्रत्यक्षपणे सोन्यावर आधारीत असण्याऐवजी सुवर्णाधारीत इंग्लीश पौंडाशी जोडलेले होते. अस्थिर मुल्य हाच रूपयाचा प्रश्न होता. आजची स्थिती अर्थातच वेगळी आहे. केंद्र व राज्यांचे आर्थिक संबंध सुरळीत ठेवण्यासाठी वित्त आयोगासारखी यंत्रणा आहे. त्यांच्या दृष्टीने भारताच्या काही समस्या एका वेगळयाच मूलभूत समस्येतून निर्माण झाल्या होत्या व ती समस्या म्हणजे सामाजिक अर्थरचनेतील कु-समायोजन होय. तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करतांना डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिले की, कंपनीचे उत्पन्न भारतीयांची पिळवणूक करून मिळविले जात होते आणि तिचा खर्च भारतापेक्षा इंग्लंडच्याच फायद्याचा होता. डॉ. आंबेडकर म्हणतात की, देशाच्या एकूण खर्चात विकास खर्चाची स्थिती काय आहे यावरून तेथील वित्त व्यवहारांची यथा योग्यता दिसून येते.

म्हणजेच देशाच्या एकूण खर्चात विकासेत्तर खर्चाचे प्रमाण किमान समर्थनीय पातळीपेक्षा जास्त असेल किंवा ते वाढत जाणारे असेल तर ही प्रवृत्ती सुदृढ वित्त व्यवहारांचे लक्षण ठरत नाही. या कसोटीचा आधारावर त्यांनी कंपनीच्या वित्त व्यवहारांना निंदणीय ठरविले होते. हीच कसोटी जर आजच्या परिस्थितीला लागू केली तर काय दिसते?

गेली अनेक वर्षे आपल्या सार्वजनिक खर्चामध्ये, कर्जावरील व्याज, अर्थसहाय्य सामान्य प्रशासन, संरक्षण घटकांवरील खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. या खर्चाच्या प्रचलित वर्गीकरणानुसार हे घटक गैर-योजना खर्च (None Plan expenditure) या शिर्षामध्ये येतात. भारतामध्ये १९८९-९० ते २०१२-१३ या काळात केंद्र सरकारचा एकूण खर्च सोळा पट



Scanned by CamScanner

वाढला याच कालावधीत गैर-योजना खर्चाची वाढ पंधरा पट झाली. त्यामुळे गैर-योजना खर्चात त्यांचा हिस्सा ९० टक्के पेक्षा जास्त असण्याची प्रवृत्ती आढळते. संरक्षणावरील खर्च आवश्यक मानला तरी वित्त व्यवहार योजने अंतर्गत हा खर्च योग्य ठरत नाही. वर्ष २०१२-१३ चा अर्थसंकल्प सादर करतांना अर्थमंत्र्यांनी कबूल केले की या वर्षाचा गैर-योजना खर्च आधीच्या वर्षाच्या आकड्यापेक्षा १८.८ टक्के इतका जास्त आहे. त्याचे मुख्य कारण अर्थ साहाय्याचा भार होय.

वित्त व्यवहारासाठी व जनतेच्या व्यापक हितासाठी कडक वाटणारे काही उपाय आवश्यक आहेत हे जर लोकांना पटले तर ते सहकार्य करतात. या वास्तवाची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती व ती आज पुन्हा करून देण्याची गरज आहे. तत्कालीन राज्य व्यवस्थेचा प्रसंग होता. "दारूबंदीचे धोरण आणि त्याचा सरकारच्या महसुलावर होणारा परिणाम" यावर बॉम्बे लेजीस्लेचरमध्ये चर्चा सुरू असतांना डॉ. आंबेडकरांचे शब्द पुढील प्रमाणे होते.

"We are not opposed to the additional taxation, provided of course the Govt. will use the taxes for nation-building purpose, We are certainly opposed to additional taxation if Govt. are going to use the taxes merely to maintain the Govt. merely to govern, But if they are going to make life happy and not merely try to make life possible, then, I think we on this side are certainly willing to support any tax"

या उदाहरणातील डॉ. आंबेडकरांचा खरा व मूळ मुद्दा म्हणजे राष्ट्र उभारणीसाठी लोकांचे जीवन खऱ्या अर्थाने सुखी करण्यासाठी शासनाचे बहुतांश वित्त व्यवहार असावेत उलट लोकांना सुखाचा आभास देणारे आणि केवळ स्वतःचे शासन टिकवून ठेवण्यासाठी केलेले वित्तव्यवहार असमर्थनीय ठरतात.

'महत्तम सामाजिक हित' हे राजस्वाचे मौलीक तत्व आहे. सार्वजनिक उत्पन्न खर्च ऋण इत्यादी व्यवहारातून समाजाला जास्तीत जास्त लाभ मिळेल. इंग्रजांच्या शासनकाळात या तत्वाकडे दुर्लक्ष करण्यांत आले असले तरी ते एकवेळ समजू शकते त्यांचा मूळ हेतूच इंग्लंडच्या फायद्याचा होता. परंतू देशी शासनाचेही जर त्याकडे दुर्लक्ष होत असेल तर तो गंभीर सामाजिक गुन्हा ठरतो. डॉ. आंबेडकरांच्या सर्व कार्याचा केंद्रबिंदू सामाजिक हित, शोषीत, उपेक्षितांना न्याय हाच होता. त्यांच्या मते बेजबाबदार शासन कितीही सार्वभौम असले तरी त्यांच्या या मर्यादांमुळे प्रगती करण्यास ते असमर्थ ठरते. भारताच्या वर्तमान राजकिय स्थितीमध्ये बहुपक्षीय सरकार ही एक अनिवार्यता झाली असून त्यामधून काही मार्ग निघण्याची शक्यता कमी असते. दुसऱ्या बाजूला गेल्या २० वर्षात (१९९१-२०११) आपल्या स्वतंत्र्य निर्णय शक्तीला जागतिकीकरणाने सिमित केले आहे. परिणामतः काही लोकांना या देशात नविन आर्थिक महाशक्तीचा उदय दिसत असला तरी येथील ग्रामीण भाग व शेती समस्यांच्या विळख्यात आहे. मोजका श्रीमंत व उच्च मध्यम वर्ग सोडला तर नागरी भागातही बेकारी, दारीद्र्य आहे. उच्च विकासदर गाठणाऱ्या आपल्या देशाचे वित्त व्यवहार समता आणि न्याय प्रस्थापित करू शकले नाहीत. डॉ. आंबेडकरांनी जेम्स विल्सन यांच्या उदाहरणातून म्हटल्याप्रमाणे 'वित्त व्यवहार म्हणजे केवळ आकडेमोड नसून ते एक महत्वपूर्ण धोरण आहे. "निकोप वित्त व्यवहाराशिवाय सुदृढ शासन शक्य नसते आणि सदृढ शासनाशिवाय निकोप वित्त व्यवहारही असू शकत नाही".

वित्तीय व्यवस्थापन करणाऱ्यांनी केवळ महसूल उभारणे व खर्च करणे या तत्कालीक उदिष्टापुर्ती आपली दृष्टी सिमीत ठेवू नये. भारताचे केंद्रिय शासन आणि प्रांतिक शासने यांचे संबंध हा महत्वपूर्ण भाग आहे. केंद्राने स्वतःच्या हाती सत्ता एकवटून प्रांताच्या स्वायत्तेवर निर्बंध आणणे योग्य नाही. तसे केल्याने कोणत्याही पातळीला चांगले प्रशासन दिले जावू शकत नाही अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. सन २०१०-१५ हा तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावणीचा काळ आहे. प्रश्न असा आहे की, इतके करूनही घटनाकारांना अपेक्षित असलेली राज्यांची 'अर्थपूर्ण' स्वायत्ता आज साध्य झाली आहे काय? वस्तुस्थिती अशी आहे की गेल्या काही दशकांमध्ये केंद्र राज्य संबंध तणावपुर्ण आणि संघर्षपूर्ण झाले आहेत. त्यांच्या वित्तीय संबंधाचे पुर्नपरिक्षण करण्याची मागणी केली जात आहे. राज्यांना अधिक विश्वासात घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सरकारीया आयोगाने (१९८८) केले होते. केरळ सरकारने नियुक्त केलेली थावराज समिती, तामिळनाडूची राजमन्नार समिती, पश्चिम बंगाल शासनाचा १९७८ चा ठराव हे सर्व घटक दाखवितात की केंद्र राज्य वित्तीय संबंध समाधानकारक नसून घटक राज्यांना राजकिय व आर्थिक स्वायतत्ता देणे गरजेचे आहे. भारताच्या निरनिराळ्या प्रांतामधील परिस्थितीची पुरेशी



Scanned by CamScanner

माहिती नसणारे केंद्र सरकार हे प्रांतांचा राज्य कारभार पाहण्याच्या दृष्टीने निश्चितपणे कमी कार्यक्षम होते.

डॉ. आंबेडकरांनी मांडलेला 'रूपयाचा प्रश्न' हा भारतीय चलनाच्या इतिहासाचा भाग आहे. देशाच्या प्रमुख चलनाचा आधार म्हणून सोने-चांदी अशा मौल्यवान धातूंचा वापर सर्वत्र केला जात असे अशा धातूंच्या नाण्यासोबत कागदाच्या नोटाही प्रचलित होत्या. त्या परिवर्तनीय असायच्या आजचा काळ मात्र अपरिवर्तनीय नोटांचा व रोकड विरहीत व्यवहारांचा आहे. म्हणूनच तत्कालीन चलनविषयक प्रश्न समजून घेणे कठीण जाते तेव्हाच्या रूपयाचे मुल्य जसे अस्थिर होत असे तसेच आजच्या रूपयाचेही होते परंतू तेव्हा लागू केलेलले उपाय आज जसेच्या तसे लागू होत नाही.

स्वातंत्र्योत्तर भारतातील रूपया हा एक अपरिवर्तनीय चलन असून त्याच्या अस्थैर्याचा प्रश्न वारंवार उद्भवला आहे. वेळप्रसंगी त्याचे अवमुल्यनही करावे लागले. सन १९९० च्या आसपास तर देशाची आंतर्राष्ट्रीय पत अतिशय घसरली होती व विदेशी चलनसाठा धोकादायक पातळीपर्यन्त घटला होता. येथूनच आर्थिक सुधारणांच्या नावाखाली भारतात जागतिकीकरणाचा प्रवेश झाला. अपवादात्मक मंदीसदृश्य काळ (Recession) वगळता देशात किंमत पातळीही उच्च होती. तुटीच्या अर्थ संकल्पना नियंत्रित करण्याचे ठरवूनही त्यांचे प्रमाण सातत्याने जास्त राहीले. (वर्षे २०११-१२ च्या अर्थसंकल्पातही संकल्पित राजकोषिय तुट ४१२८१७ कोटी रूपये दाखविली होती, पण सुधारीत अंदाजातच ती २६.४४ टक्के ने वाढून ५२१९८० कोटी रूपये झाली.) वित्तीय प्रशासनाचे प्रश्न 'साधे-सरळ नसतात हे खरे, तरीही चलनाचे सतत वाढते परिमाण त्यांच्या अस्थैर्याला आजही कारणीभूत ठरते हे मान्य करायलाच पाहिजे म्हणूनच चलनाची मात्रा नियंत्रित करून त्याची क्रयशक्ती स्थिर ठेवणे हाच त्याच्या स्थैर्याचा खरा मुद्दा होय.' असे मत डॉ. आंबेडकरांनी मांडले होते. "मुल्यऱ्हास झालेलली मुद्रा ही महा फसवणूक होय"

"व्यवहारातील इतर मापे विशिष्ट गोष्टीशी संलग्न असतात, पण मुल्याचे माप हे सार्वत्रिक असल्याने जास्त महत्वाचे असते. ते सतत बदलत असेल तर अनेक घटक प्रभावित होतात, कारण प्रत्येक सौदा किंवा करार हा अंततः वस्तुचा असला तरी मुळात तो मुल्याचा असतो. म्हणूनच चलनाचे स्थैर्य टिकवून ठेवणे हे सरकारचे कर्तव्ये असते" आर्थिक शोषणापासून संरक्षण देवू शकणाऱ्या या तरतुदी त्यांच्या दृष्टीने इतक्या महत्वाच्या होत्या की त्या घटनात्मक कायद्याद्वारे अंमलात याव्यात ज्यामुळे भावी राज्यकर्ते त्यामध्ये मर्जीनुसार बदल करू शकणार नाहीत. मुळातच नागरिकांना आर्थिक शोषणापासून संरक्षण देण्याची कायमस्वरूपी तरतुद अंमलात आणणे हाच डॉ. आंबेडकरांचा मूळ हेतू होता. अलीकडच्या जागतिकीकरणानंतर तर विषमतेचे चित्र अधिक गडद होत आहे. भांडवलशाहीने प्रेरीत झालेले जागतिकीकरण सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधूता हे भारतीय समाजवादाचे मूळ घटक आहेत परंतू आज जागतिकीकरणाच्या पाव शतकानंतर त्यांच्या भूमिकेकडे लोक कसे बघतात हे महत्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रसाराचे माध्यम निरनिराळ्या आंतर्राष्ट्रीय संस्था आहेत त्यापैकी एक असलेल्या जागतिक बँकेचे जेष्ठ माजी उपाध्यक्ष जोसेफ स्टिगलिट्स म्हणतात की "जागतिक बँकेने तथाकथित वॉशिंटन - सहमती राबविणे आता पूरे झाले त्यापेक्षा समता, सामाजिक न्याय व दारिद्रय निर्मुलन यांना केंद्रिय स्थान देणारा विकासाचा तौलनिक दृष्टीकोन विचारात घ्यायला पाहीजे".

आर्थिक नियोजनाच्या काळात (११ पंचवार्षिक योजना पुर्ण झाल्या) भारताच्या ग्रामीण क्षेत्रात आणि मुख्यतः शेतीमध्ये अपेक्षित परिवर्तन होवू शकले नाही. आजही बहुसंख्य लोक ग्रामीण भागात असतांना (२०११ - ६९ टक्के) नवऔद्योगिक. देशाचा मानव विकास निर्देशांक असमाधानकारक पातळीला आहे. (२००७ मध्ये भारताचा ०.६१२ तर चीनचा ०.७७२ टक्के आहे) डॉ. आंबेडकरांनी शेतीच्या स्थितीबाबत जे चिंतन केले त्यामध्ये राज्य समाजवादाच्या रचनेनुसार शेतजमीनीवर शासनाची मालकी, लागवडीची सामुदायिक पध्दत आणि भांडवल व संसाधनाचा शासकिय पुरवठा इत्यादी उपाय अनिवार्य वाटत होते परंतू ते भारतीय मानसिकतेत बसणारे नव्हते. शेवटी डॉ. आंबेडकरांचा मार्ग अव्हेरून आपण संस्थात्मक भूमी सुधारणा कर्ज पुरवठयाचे संस्थात्मक स्त्रोत विस्तार यंत्रणा इत्यादी उपाय केले (याच उपायांना डॉ. आंबेडकरांनी निरर्थक व कुचकामी यंत्रणा म्हटले होते.) या उपायामुळे कितपत फरक पडला? प्रत्येक तरतुदीचा लाभ गरजूपेक्षा इतरांनीच जास्त घेतला. भांडवल पुरविणारे संस्थात्मक स्त्रोत अपेक्षित कामगिरी करू शकले नाहीत. हरित क्रांती झाली आणि ग्रामीण विषमतेत भर घालून गेली. पुर्वी शेती हा 'जीवन जगण्याचा मार्ग' होता. शेतकरी निदान जगत तरी होता, आता व्यापारीकरण झालेल्या शेतीमध्ये



Scanned by CamScanner

तर तो मरणाला कवटाळतो आहे. शेतकऱ्यांना पॅकेज, अर्थसाहाय्य, कर्जमाफी असे उपाय होत राहील, परंतू शेतकऱ्यांना स्वयं निर्भर (आत्मनिर्भर) करण्याचे उपाय मात्र पुढे आले नाहीत. सर्व योजनांचे पाणी मध्येच झिरपले आणि प्रत्यक्षात ग्रामीण व्यक्ती तहानलेलाच राहीला. थोडक्यात असे म्हणता येईल की, भारतीय मानसिकतेला न पटणारी डॉ. आंबेडकरांची शेती योजना नाकारली गेली याची तक्रार नाही पण पर्यायी मार्गाने आपण काय साध्य केले याचेही उत्तर मिळत नाही हे कमी होते काय म्हणून आता ग्रामीण समृध्दीसाठी कंपनी शेती, करार शेती, विशेष आर्थिक क्षेत्र सरसावले आहेत. भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात बरेच औद्योगिकरण झाले, तरीही त्याचा शेतीच्या विकासावर अपेक्षित परिणाम झालेला नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, १९५१ पासून जो औद्योगिक विकास केला तो आज ३१ टक्के लोकसंख्या रहात असलेल्या नागरी भागात केंद्रित झाला अर्थात ६९ टक्के लोक असलेला ग्रामीण भाग या प्रक्रियेतून वगळलला गेला. शेती व ग्रामीण भागाला वगळणारे औद्योगिकरण डॉ. आंबेडकरांना अपेक्षित नव्हते. अमेरिकेतील अध्ययनाचे उदाहरण देवून निष्कर्ष काढला की "शेतीसोबत उद्योगांची वाढ ज्या जिल्हामध्ये होत होती तेथे जमिनिचे भाव वाढलेले होते, तसेच दर एकरी उत्पादन आणि मजूरांचे उत्पन्नही वाढतांना दिसून आले होते यावरून असा निष्कर्ष निघतो की एखाद्या प्रदेशातील विविध उद्योगाची वाढ ही उत्पादकांना तर फायदेशीर असतेच शिवाय शेतकऱ्यांनाही तितकाच लाभ होतो."

शेतीवरील लोकसंख्येचा ताण आणि पर्यायी रोजगाराची कमतरता ही तेव्हाची दुखणी आजही कायम आहेत. ग्रामीण औद्योगिकरण हा त्यावरील उपाय असला तरी त्यासाठी केवळ प्रोत्साहनात्मक योजना पुरेशा नसून शासनाची सक्रिय भूमिका महत्वाची आहे. तात्पर्य शेती-ग्रामीण विकास - औद्योगिकरण यांना एकाच प्रक्रियेचे भाग मानून शासनाने पुढाकार घेतल्याशिवाय मानव केंद्रित सर्वसमावेशक विकास होणे शक्य नाही. डॉ. आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे श्रमिक वर्गाच्या स्थायी हितासाठी शासनानेच पुढकार घ्यावयास पाहीजे. श्रमिक वर्गाला समन्याय मिळायला पाहिजे.(equity, not only equality) हे प्रतिपादन करतांना त्यांनी म्हटले होते की, उद्योगांच्या कमाईवर पहिला हक्क किंवा वाटा मजूरांच्या मोबदल्याचा असावयास पाहिजे. उत्पादनात सर्वाधिक महत्वाची भूमिका बजावणाऱ्या श्रमिकांना सर्व आर्थिक घटकांची जाण असावयास पाहिजे. भारतामध्ये लोकसंख्या वाढीचा वेग थोडासा किंचीत कमी झाला असला तरी पण लोकसंख्या वाढीच्या प्रश्नांचे गांभीर्य कमी लेखता येत नाही.. बेकारी, दारिद्रय इत्यादी गोष्टी या समस्येतून पुढे येतात. अतिरिक्त लोकसंख्या दारिद्रयात भर घालते व हेच दारिद्रय समाजाला नैतिक अधःपतनाकडे नेते हे डॉ. आंबेकडरांची भूमिका आजही तितकीच मार्गदर्शक आहे.

डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तीमत्वाचा अभिन्न भाग असणाऱ्या सामाजिक तळमळीबद्दल सांगण्याची येथे गरज नाही तो केवळ अर्थशास्त्रीय लिखाणातच नव्हे तर सर्वत्र जागोजागी दिसून येते. ईस्ट इंडीया कंपनीच्या वित्त व्यवहारांना निंदनीय ठरवितांना, रूपयाच्या अस्थिर मुल्याचे परिणाम स्पष्ट करतांना छोटया धारणक्षेत्राचे तोटे व त्यावरील विसंगत उपायांचा विचार करतांना दरवेळी दिसून येते.

महत्वाकांक्षी बहुउद्देशिय प्रकल्पाच्या आखणीतही त्यांचा केंद्रबिंदू सामान्य मनुष्य हाच होता.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन सर्वार्थाने मौल्यवान आहे. त्यांच्या धोरणांची पुरेशी दखल घेतली गेली नाही किंवा त्यांचे अर्थतज्ञ सर्वापर्यंत पोहचले नाही हे आपल्या राजकिय व्यवस्थेचे दोष आहे. त्यामुळे त्यांचे तत्कालीन आर्थिक विचार आजही भारतीय व्यवस्थेला लागू पडतात केवळ समजून घेण्याची ती काळाची गरज आहे.

**संदर्भग्रंथ :-**


१) कविमंडन डॉ. विजय - डॉ. आंबेकडरांचे आर्थिक चिंतन

२) जाधव डॉ. नरेंद्र - डॉ. आंबेडकर आर्थिकविचार १ तत्वज्ञान १९९२ सुगावा प्रकाशन पुणे.

३) Keer Dhananjay- Dr. Ambedkar : life and Mission, 1971 Populas Prakashan Mumbai.

४) कुबेर डॉ. वा. ना.- डॉ. आंबेडकर विचारमंथन- १९८८, सुगावा प्रकाशन, पुणे

५) Thorat Dr. Sukhadeo- Ambedkar Role in economic planning, Water and Power Policy, 2006, Shivraj Publication, Delhi.





Scanned by CamScanner

**Venu Gopal**
Lecturer
Dayanand Arya Kanya Junior College, Jaripatka, Nagpur

# RELEVANCE OF DR. AMBEDKAR'S ECONOMIC THOUGHT IN THE $21^{ST}$ CENTURY

Dr. B. R. Ambedkar was among the most outstanding intellectuals of India in the $20^{th}$ century in the best sense of the world. Panal Baran an eminent Marxist economist had mode a distinction in one of his essays between an "intellect worker" and an intellectual. The farmer according to him, is one who uses his intellect for moving a living whereas the latter is one who uses it for critical analysis and social transformation Dr. Ambedkar fits Baran's definition of an intellectual very well. Dr. B. R. Ambedkar $14^{th}$ April 1891 to 6 December 1956, popularly known as Babasaheb was an Indian Jurist, politician philosopher, anthropologist, historian and economist. A revivalist for Bhudhism in India, he inspired the modernist Buddhist movement in Maharashtra which is spreading all across India is also called Dalit Buddhist movement. As independent India's first law minister, he was principal architect of constitution of India. Barack abama referred to Dr. Ambedkar as a founding father of modern India during his address speech in Indian parliament.

**As an Economist -** According to Prof. A. K. Sen "Ambedkar is my father in economics. He is true celebrated champion of the underprivileged. He deserves more than what he has achieved today. However he was highly controversial figure in his home country through it was not the reality. His contributor in the field of economics is highly appreciated and will be remembered for ever. Dr. Ambedkar laurite three sehalarly soon on economics 1) Administration and finance of East India Company 2) The Evaluation of provincial finance in India and 3) The problem of Rupee, its orisin and its Elution. There is one siruilicant academic paper wrote in 1918 "small holdings in India and their remedies in journal of the Indian Economic society. All of these have been brought together by the government of Maharashtra in a multi volume complete edition. The problem of the Rupee mainly and elsewhere deals with monetary standards as they had evolved during the provision few decades. The basic Indian currency unit the rupee has had a long history since 1872 to 1893, this acted as a continued devolution of the Indian currency which while was good for Indian exports was not good for the Indian economy, it had to produce more rupees to remit expenses under taken in England by India which were in sterling terms. Ambedkar argued for a prayer gold standard with gold currency as he was highly ciritical of the gold exchange standard latter on J. M. Keynes supported to the Dr. Ambedkar's views.

**Thoughts on Finance :** Dr. Babasaheb Ambedkar expressed his views on finance mostly during his stay abroad. He contributed to financial economics. He undertook a pioneering study of the education of provincial finance in India. He focused primarily on provincial decentralization of imperial finance. Dr. Ambedkar was of the opinion that inadequacy of imperial finance was basically due to an unround fiscal policy. The Govt. depended on taxes like land tax, customs and sales tax. This affected agriculture, trade and industry and poor, under the silence system of the imperial govt. that taxing capacity of



Scanned by CamScanner

people declined so not with standing the various resources of revenue the imperial govt. was not able to meet both ends.

**The problem of public finance** - "The evaluation of provincial finance in British India, from the discussion of Article 227 and 277, of the Indian constitution, the taxation policy in the manifests of "Swatantra Majdur Pakash" and his lectures and views on budgetary policy and tax on property. He had classified provincial finance in there categories imperialistic provincial finance and local criticizing the decentralization report of the Royal Commission Dr. Ambedkar argued that due to the provincial autonomy political power would be concentrated in the hands of the privileged but instead of common people.

**Ideas on Industries :** Dr. Ambedkar did not oppose the industrialization process. The supported modern type of industrialization. However he opined that such industrialization should not have the way to the problems like concentration of economic power, monopoly, inequality etc. He was not an opponent to govt. undertakings. He believed that some basic industries should be undertaken by the govt. moreover the govt. should take a lead to make an attempt in this direction. He also expressed that corporation should be established to initiate new industries in govt. sector. He also believed in the nationalization of Insurance Industry in India. Dr. Ambedkar's views on Industrialization are still relevant to current situation of India. The govt. sector has been playing very important have in Indian economy even after the execution of new economic policy.

Dr. B. R. Ambedkar was a firm believes of socialism. According to him "State socialism is essential" for India's industrialization.

**References :**


1) Relevance of Dr. Ambedkar's Economic thought in the 21st century, i) R. P. Singh ii) B. K. Sing

The Indian Economic Journal December - 2013

2) Contemporary Relevance of Dr. B. R. Ambedkar's economic philosophy and concept B. S. Sharma, M. Sharma, G. Devi The Indian economic Journal December, 2013.

3) Dr. B. R. Ambedkar's Economic Thoughts An overview O. P. Ram S. R. Singh S. Shankar

4) Economic Thought Dr. B. D. Kulkarni, Dr. S. V. Dhamdhul



विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर

८ वे अधिवेशन २०१४ ला हार्दिक शुभेच्छा



प्रा. दुर्वेश पंढरी मेन्डे व मित्र परिवार

यशवंत महाविद्यालय वर्धा


Scanned by CamScanner




प्रा. चेतन के. हिंगणेकर
सी.पी. अॅण्ड बेरार महा.
तुलशिबाग, नागपूर


# भारताच्या विकाससंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार व वर्तमान परिस्थितीचा अभ्यास

**प्रस्तावना :-**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय सामाजीक परिस्थितीचा अभ्यास करून मांडलेल्या बाबीचा चिकित्सक विश्लेषण करण्यात आलेला आहे. तसेच आधुनिक परिस्थितीची सांगड घालण्यात आलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचाराची पार्श्वभूमी चा विचार केला असता असे आढळले की,

१. ग्रामीण जनतेवर महसूलाचा ताण निर्माण होत होता.

२. कंपनी सरकार विकासाच्या दृष्टीने उदासीन होती.

३. वाढता कर्जाचा भार भारताचा विकास कार्यात अडथळा निर्माण करीत होता.

**विषयाचे गृहितके :-**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आधुनिक युगात उपयुक्त आहे काय?

२. सामाजीक विषमतेचा परिणाम आधूनिक युगात जाणवतो काय?

३. डॉ. बा. आंबेडकरांनी शेतकऱ्याची स्थिती जाणून उपस्थित केलेल्या प्रश्नांची आधुनिक युगात शासनाने निराकरण केले काय.

४. आंतरराष्ट्रीय अनुकूल व प्रतिकूल शोधन शेषाचा परिणाम रूपयाचे अवमूल्य करण्यात ठरते काय व त्यातून भारतीय रोजगार निर्मीती क्षमता वाढली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे :-**

प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहे.

१. डॉ. बा. आंबेडकरांचा आर्थिक विचार आधूनिक युगासाठी प्रेरकतेचा अभ्यास.

२. स्वातंत्र प्राप्ती नंतर सामाजिक आर्थिक विषमता दूर करण्याकरीता डॉ. बी.आर. आंबेडकराचे विचाराची उपयूक्ततेचा अभ्यास.

३. शेती विकास कार्यासाठी स्वातंत्र प्राप्ती नंतर शासनाने डॉ. बा. आंबेडकराचा शेती विषयक आर्थिक दृष्टीकोन अमलात आणले काय.

४. औद्योगिकरणाचा उपयोगाने श्रम शक्तीचा उपयोग देशाचा आर्थिक विकास साधण्यात झाला काय?

**तथ्य संकलन व संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंध प्रामुख्याने दूय्यम तथ्यांवर आधारित आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी आवश्यक माहिती व तथ्ये डॉ. बी.आर. आंबेडकारांचा आर्थिक व सामाजीक विचारावर लेखन करण्यात आलेल्या साहित्याचा आधार घेण्यात आला, तसेच भारतीय जनगणना अहवाल २०११, व भारतीय अर्थव्यवस्था आधार लक्षात घेवून गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण व उपलब्ध आकडेवारी ला तक्तात मांडण्यात आलेला आहे. आवश्यक व उपलब्ध संख्याशास्त्राच्या साहायाने विषय आशय स्पष्ट केला आहे.

शोधनिबंध प्रामुख्याने दूय्यम तथ्यांवर आधारित आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी आवश्यक माहिती व तथ्ये डॉ. बी.आर. आंबेडकारांचा आर्थिक व सामाजीक विचारावर लेखन करण्यात आलेल्या साहित्याचा आधार घेण्यात आला, तसेच भारतीय जनगणना अहवाल २०११, व भारतीय अर्थव्यवस्था आधार लक्षात घेवून गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण व




Scanned by CamScanner

उपलब्ध आकडेवारी ला तक्तात मांडण्यात आलेला आहे. आवश्यक व उपलब्ध संख्याशास्त्राच्या साहायाने विषय आशय स्पष्ट केला आहे.

स्व-अनुभवाने प्रेरीत असलेले डॉ. आंबेडकर भारतीय सामाजिक आर्थिक विषमता फार भयानक असल्याचे मत मांडतात तसेच याचा परिणाम देशातील असंख्य लोकांचा भवितव्याशी असल्याचे ते मत मांडतात. त्यामुळे सामाजीक व आर्थिक. विषमता दूर करण्यात येणाऱ्या निर्णयाना कायद्याचे संरक्षण देणे आवश्यक आहे. तसेच भविष्याचा विचार करून समाजात पिढया न पिढया अन्यायाचा आणि शोषणाचा बळी ठरलेला जो वर्ग होता त्याला न्याय मिळवून देण्यासाठी हीच यथोचीत वेळ आहे. असे लक्षात येताच त्यानी अखिल भारतीय अनुसूचित जाती महासंघाचे काम स्विकारले व प्रस्तूत केलेल्या अनौपचारिक टिपण पूढे States of Minorities ही पुस्तक कायदेपंडित डॉ. बी.आर. आंबेडकर प्रसिध्द केली या (१) भारतीय नागरीकाचे मुलभूत अधिकार, अल्प संख्यांक गटांचे हक्क आणि अ.जा. च्या व्यक्तींच्या विशेष हक्कांबाबत संरक्षणाबाबत तरतूदी यांची तरतूद कल्पना मांडली.

**शेतकऱ्याचे प्रश्न व धोरणाचे परिणाम :-**

डॉ. बी.आर. आंबेडकराच्या मते त्याकाळी भारतीयाची मानसिकता बदल घडवून आणने हा महत्वाचा घटक होता शेतकऱ्याचे प्रश्न सोडविण्यासाठी शेतकऱ्याचे हित साधायचे असेल तर जमीन दारीसारख्या पध्दतीचे उच्चाटन होणे फार गरजेचे होते. तसेच डॉ. आंबेडकरांनी एक अनअपेक्षीत उपाय सूचविला तो म्हणजे Agriculture shall be state industry म्हणजेच शासनाने शेतीवर मालकी प्रस्तापित केल्यास सामुदाईक शेतीपध्दतीचा अवलंब करता आला असता. यासाठी किफायतशीर आकाराची धारण क्षेत्र तयार करून काहीकुटूंब जे एकाच कुळांची आहे त्याच्या कडे त्याची जबाबदारी सोपवण्यात यावी. तसेच शेती विकासासाठी भांडवल व संसाधने हे शासनानेच पूरवावी शासनाने शेतकूळांना काही हक्कासोबतच जबाबदाऱ्या देवून त्यांच्या विकासासाठी कृतीशील करावे. महत्वाचे म्हणजे जात, धर्म, सामाजिक किंवा आर्थिक दर्जाचा विचार न करता लागवडी साठी जमीन देणे याचा मुख्य उद्देश भुमिहीन मजुरांना याचा लाभ व्हावा व त्यांना न्याय मिळावे या मागचा हेतू होता. तसेच शेतीची उत्पादकता वाढावी व सामाजि[...] परिस्थिती सुधारावी या मागची सामाजीक भावना असून दे[...] आज १२ वी पंचवार्षिक योजना सुरू असतांना देखील भार[...] शेतीव्यवसायात अपेक्षीत विकास साधता आलेला नाही तर [...] वी पंचवार्षिक योजना मध्ये शेती व्यवसायापासून ४% [...] साधता आलेला आहे. डॉ. बा. आंबेडकाने आज होत असले[...] शेतकऱ्याच्या आत्महत्या हा व त्याची आजच्या परिस्थि[...] विचार डॉ. बा. आंबेडकरानी फार पूर्वी केली होती [...] निदर्शनास येते.

तसेच त्याकाळी वाढती जमीनदारी पध्दतीमुळे अनिष्[...] निर्माण होवू लागल्या होत्या. त्यामुळे अनौपचारिक पद्ध[...] शोषन वाढत होते. वाढते "ग्रामीणी करन" हा भविष्य का[...] मोठी समस्या निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकते [...] अर्थतज्ञ डॉ. बी.आर. आंबेडकराच्या शेती विषयक विचारा[...] वाटते. कारण ग्रामीण क्षेत्रावर वाढती लोकसंख्येचा [...] वाढविणारे व निरूद्योगी शेतमजूराचा वर्ग याचा विचार प्रभा[...] ते करीत असल्याचे दिसते. डॉ. बी.आर. आंबेडक[...] "जमीनीवरील सामाजीक मालकी हक्क" त्या का[...] समाजास न पटणारा होता. त्यामुळे तुकडे पध्दतीने शेती[...] प्रकार वाढत गेला व शेतीचे तूकडे पडू लागले तर ग्रामीण भा[...] नवी समस्या डोके वर करू लागली. ती म्हणजे रिकामा श्र[...] एक असा घटक आहे जो राष्ट्रीय उत्पन्नात भर टाकत नाही, जी काही उत्पन्न वाढले असेल त्यात देखील घट करते.

**आंतरराष्ट्रीय अनुकूल व प्रतिकुल शोधन शेष -**

डॉ. बी.आर. आंबेडकर आपल्या अभ्यासात सांगतात ब्रिटीश राजवटीने १८३५ नंतर कायद्याचा आधारे भारता[...] प्रमाण रूढ करून, भारतीय अर्थव्यवस्थेत बदल घडवण्यात[...] हा परिवर्तन भारतीय अर्थव्यवस्थेत चलन - टंचाईसारखे [...] संकट निर्माण करण्यास कारणीभूत ठरले. बदल हा समस्[...] नवा मार्ग काढण्यात उपयूक्त ठरतो. तरी ती समस्या रा[...] स्वरूपाची असल्याने त्याची जाणीव मोठ्या प्रमाणावर होते. [...] काळचे भारतीय चलन मौल्यवान धातूवर आधारित अस[...] धातूची गरज फार जाणवत होती व भारत देश चांदीसाठी [...] नसल्याने त्याला ही गरज दूसऱ्या देशाकडून पूर्ण करावी ला[...] होती व यूरोपातील निर्बंधामुळे चांदीची आयातही त्याकाळी [...]

Scanned by CamScanner

नव्हती अशा परिस्थितीत चांदीप्राप्तीसाठी निरनिराळ्या पर्यायी मार्ग शोधण्यात आला तो म्हणजे भारतातून इंग्लंडमध्ये रवाना रकमेपेक्षा जास्त पैसा मिळवून देईल इतका माल निर्यात करणें ही परिस्थीती तात्पूरते. समाधान प्राप्त करून शकली मात्र समस्या दिवसेंदिवस वाढतच गेली कारण भारताच्या वाढत्या निर्याय धोरणातून रूपयासाठी लागणारी चांदीची आवक होत होते. हे मुद्रेच्या टंचाईचे मुख्य कारण असल्याचे तसेच विनीमयाचे मुख्य साधन चांदी असल्याने ही समस्या भविष्यात मोठी समस्या निर्माण करणारी होती व व्यापार व्यवसाय विकासासाठी चांदीच्या रौप्याची गरज वाढत होती. तसेच रौप्यकार व जवाहिरे यांची सुध्दा चांदीची मागणी वाढत होती व ती पुरविणे आवश्यक होती. अशा भारतासाठी ही पध्दती समस्या निर्माण करणारी होती तसेच सरकारी खर्च पध्दती भारतीय आर्थिक समस्योला वाढविणारी होती. देशाच्या संरक्षणासाठी त्याकाळी देशाच्या खर्चापैकी साधारणतः ५२% ते ८०% दरम्यान खर्च हा युध्दाशी संबंधीत करण्यात येत होता. त्यामुळे विकास कार्य करण्यात अर्थव्यवस्था सक्षम नव्हती. तसेच या युध्दासाठी व संरक्षणासाठी लागणारे मनुष्य बळ भारतीय असून त्याचा आर्थिक फायदा भारताला फारसा नव्हता कारण ते खालच्या वर्गाचे म्हणजेच सैन्यातील खालच्या स्तरात त्याचा उपयोग केला जात व वरच्या स्तरात त्यांनी ब्रिटीश नागरीकाचा उपयोग करून वेतनांच्या नावाखाली भारताचे शोषण घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले.

**रूपयाचे अवमूल्यन :-**

भारतामध्ये पूर्वीच्या काळी सोने व चांदी या मौल्यवान धातूंचा उपयोग मुद्रा म्हणून वापरल्या जात असे. यात हिंदू राज्यकर्त्यांनी सोने हा मुद्रा म्हणून वापर केला तर मुस्लिमांनी चांदीचा वापर मुद्रा म्हणून मोठया प्रमाणात केले तर अकबर राज्याच्या काळात भारतात सोन्याची मोहर आणि चांदीचा रूपया चलन म्हणून वापरण्यात आला. मात्र इंग्रज शासनाने ईस्ट इंडिया कंपनीच्या नावाखाली सन १८३५ मध्ये चलन कायदा लागू करून संपूर्ण भारतात चांदीच्या धातूचे रौप्य चलनात आणले. हा विशिष्ट वजनाचा व शुध्दता असलेला चांदीचा रूपया प्रचलीत होता. परंतू या धातूचा साठा देशात पूरेसा नसल्याने मुद्रेसाठी व दागिण्यासाठी या धातूची मागणी मुख्यतः बाहेरच्या देशाकडून करावी लागायची यासाठी निर्यात प्रणाली उपयोगी पडायची. परंतू चांदीसाठी परकीय राष्ट्रावर किती अवलंबून राहणार वाढत्या समस्यांचा विचार करीत १८३५ च्या चलन कायद्यावर पूर्ण विचार करुन उपाय सुचवण्यात आले. त्यानंतर पत्रचलन (नोटा) चलनाच्या स्वरूपात मान्य करण्यात आल्या देशात मिश्र चलन पध्दती विकसीत होण्यास सुरवात झाली परंतू या बदलाचा सकारात्मक परिणाम झाला नाही. सोन्याची मुद्रा परत व्यवहारात आणण्याची हीच योग्य वेळ होती परंतू सरकार त्यासाठी प्रयत्नशील नव्हती. भारतीय रूपया हे चांदीवर आधारीत होते. व भारतावर सत्ता करत असलेले शासक देश इंग्लंडमधील चलन सोन्यावर आधारित होते. या दोन देशातील चलनाचा आधार वेगवेगळय मौल्यवान धातूवर अवलंबून असल्याने चलनाच्या अदलाबदलीचा विनीमय दरावर अवलंबून होता. तरी मुल्यस्थिरता ठेवण्याचा प्रयत्न शासनाने करण्याचा प्रयत्न केले असता १८७३ सालापासून धातूच्या संबंधात बिघाड सुरू झाले. त्याचे मुख्य कारण म्हणजे इतर देशाने आपल्या चलनामध्ये सोने या धातूला विशेश स्थान दिले असता भारतात मात्र चांदीला अधिक महत्व देण्यात आलेले होते. त्यामूळे दोन मौल्यवान धातूचे मूल्यच अनिश्चित होत गेल्याने भारताच्या आर्थिक व्यवहाराचे भवितव्य संकटात आलेले निदर्शनास येते. मुल्यऱ्हासामुळे भारत सरकारचे सतत होत असलेले आर्थिक नूकसान मूल्य ऱ्हासामूळे रूपयाच्या विनिमय दरात होत असलेली घसरणाचा काळ तब्बल १५ वर्षे (१८७८-१८९३) चालढकल करणाराच ठरला.

परिस्थिती लक्षात घेता इतर देशाने सुवर्णस्थिती सुदृढ करून चांदीकडे फारसे लक्ष केंद्रित केले नाही. भारत मात्र चांदीवरच लक्ष केंद्रीत केले असल्यामुळे रूपयाचे अवमूल्यांकन झाल्याचे निदर्शनास येते.

**रोजगार निर्मिती :-**

अर्थतज्ञ डॉ. बी.आर. आंबेडकर भारतीय ग्रामीण भागात केंद्रित होत असलेली लोकसंख्या देशाच्या अर्थव्यवस्थेकरीता फार उपयोगी असूनतीचा यथोचीत उपयोग करते देशाच्याहिताचे असणार असे मत ते मांडतात.

नागरी औद्योगिकरण देशाच्या आर्थिक हिताचे असणार असे डॉ. बी.आर. आंबेडकराचे मत होते. ग्रामीण भागावर वाढत्या



Scanned by CamScanner

लोकसंख्येचा भार याची योग्य व्हिलेवाट करणे त्या काळची मूख्य गरज बनली होती हाच काळ चांदीच्या मूल्य ऱ्हासाचा काळ असल्याने श्रम शक्तीचा योग्य वापर करून उद्योग विकास साधता येणारा हा काळ समजला जावू लागला. सोने व चांदी यांचा मूल्यसंबंध बिघडले असतांना सुवर्णमान असणाऱ्या इंग्लंडमधील उद्योग व व्यापाराची स्थिती वाईट होती. तेथील उद्योगावर संकट निर्माण झालेले असल्याने तेथील शेती व्यवसाय देखील निरूत्साही होते. परंतू मुल्यऱ्हासाच्या संकटात असलेल्या भारत देशात मात्र उद्योगाच्या व व्यापाराच्या भरभराटीस चालणा निर्माण केल्या जाऊ लागले. निर्यातीच्या माध्यमाने चांदीच्या साठयात वाढ करण्याच्या उद्देशाने भारतात उद्योगाची व व्यापाराची भरभराट झाल्याचे निदर्शनास येते. भारतात प्राथमीक उद्योगातच नव्हेतर दूय्यम उद्योगात सुध्दा भरभराट होत असल्याचे निदर्शनास येते व ही परीस्थिती रोजगार निर्मीतीचा दृष्टीने फार उपयोगी असल्याचे निदर्शनास येते.

### डॉ. बा. आंबेडकराचे इतर आर्थिक विचार :-

### १) जल संशोधन, विद्युत, खनिज विकास :-

भारताची आर्थिक स्थिती सुदृढ करण्यासाठी जागतीक परिस्थितीत आपले योगदान वाढवून प्रत प्राप्त करणे व नव्या उद्योगाची स्थापना करणे तसेच वाढत्या लोकसंख्येला पर्यायी रोजगार साधन निर्माण करणे व अर्थव्यवस्था सुदृढ करणे फार उपयुक्त ठरू शकते असे डॉ. बा. आंबेडकराच्या अभ्यासावरून दिसून येते. तसेच आधारभूत संसाधनात वाढ करून देण्याची संरचना बदल घडवून आणण्यात उपयूक्त ठरू शकते असे मत डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी मांडले कारण रोजगार निर्मीतीसाठी आवश्यक संसाधन विद्यूतीकरणकरने मुख्य असल्याचे निदर्शनास येते. म्हणून याची दखल घेत १९४१ साली इलेक्ट्रानिकल कमिशनचे कार्यालय सुरु करण्यात आले.

तसेच खनिज विकासाकडे स्वतंत्रपणे न बघता देशातील एकूण औद्योगीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून बघावे असे मत डॉ. बा. आंबेडकरानी मांडले यातून औद्योगीकरण वाढेल असे त्याचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विशयचा अभ्यासाच्या माध्यमाने काही ठळक बाबी निदर्शनास आल्या.

**तक्ता क्र. १ :-भारतीय श्रम शक्तीची विभागणी**

| | लोकसंख्या मिलीयन | | | एकूण लोकसंख्ये शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| वर्ष | एकूण | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी |
| १९०१ | २३२.९ | २०७.३ | २५.६ | ८९.०० | ११.०० |
| १९११ | २४६.० | २२०.४ | २५.६ | ८९.६० | १०.४० |
| १६२१ | २४४.३ | २१६.६ | २७.७ | ८८.७ | ११.३ |
| १९३१ | २७०.८ | २३७.८ | ३३.० | ८७.८ | १२.२ |
| १९४१ | ३०९.० | २६५.५ | ४३.५ | ८५.९ | १४.१ |
| १९५१ | ३६१.१ | २९८.७ | ६२.४ | ८२.७ | १७.३ |
| १९६१ | ४३९.२ | ३६०.३ | ७८.९ | ८२.० | १८.० |
| १९७१ | ५४८.२ | ४३९.१ | १०९.१ | ८०.१ | १९.९ |
| १९८१ | ६८५.२ | ५२५.७ | १५९.५ | ७६.७ | २३.३ |
| १९९१ | ८४४.३ | ६२७.१ | २१७.२ | ७४.३ | २५.७ |
| २००१ | १०२७ | ७४२.० | २८५.० | ७२.२ | २७.८ |
| २०११ | १२१०.२ | ८३३.१ | २७७.१ | ६८.८ | ४३१.१ |

स्त्रोत :- कै. डॉ. सु श्री मु. देसाई, डॉ सौ. निर्मल भालेराव - भार अर्थव्यवस्था निराली प्रकाशन :- census २०११

भारतीय लोकसंख्या ही देशाच्या आर्थिक विकास स करण्यात महत्व पूर्व संसाधन असल्याचे निदर्शनास येते. म्ह डॉ. बा. आंबेडकरांना देशाच्या आर्थिक स्थिती सुधारणा घ आणण्यासाठी ग्रामीण क्षेत्राच्या श्रम शक्तीचा उपयोग श भागात उद्योग व्यवसायाच्या विकासाच्या दृष्टीने योग्य पध्द करता येऊ शकते असे मत त्यांच्या विचारावरून निदर्शनास ये

**समाजवादातून आर्थिक विकास :-** डॉ. बा. आंबेडकर यां सामाजीक भावनेतून भारतीय समाजातील दोन समाज, द पातळी, आपणास दिसून येते. त्या काळची समाज रचना देशाच्या आर्थिक विकासाला घातक असल्याचे डॉ. ब आंबेडकराना अनूभवात येते.

डॉ. बा. आंबेडकरांना असे निदर्शनास येते की भारता आर्थिक संरचनेमध्ये शासनाची भूमिका ही फार प्रभावी ठ शकते. आर्थिक शोषणापासून रक्षण हा नागरीकाचा मुख्य अधिकार असायला हवा. त्यामुळे त्याचे अधिकार राख येणार. व सामाजीक आर्थिक विकास साधता येणार.

१. समाजात संपत्तीचे समन्यायी वितरण होणे आवश्यक.

Scanned by CamScanner

२. शासनाने पूढाकार घेवून खाजगी क्षेत्राचा विकास करणे आवश्यक

३. डॉ. बा. आंबेडकर गतीमान औद्योगीकरण देशाच्या आर्थिक विकास साधण्यात उपयुक्त ठरू शकल्याचे मत ते मांडतात. परंतू औद्योगीक क्षेत्र संपूर्णतः खाजगी भांडवल शाहीने प्रेरित असल्यास समाजाची पिळवणूक फार मोठया प्रमाणात होणार असे ते सूचवितात म्हणून शासन लक्ष नियंत्रीत उद्योग विकास ते सूचवितात.

४. समाजाची आर्थिक विकास साधण्याची क्षमता एक व्यक्ती एक मत याच्या अवलंबाने साधल्या जाणार.

**भारतीय शेती संघटन :-**

डॉ. बी.आर. आंबेडकरानी भारतीय शेती विषयक विचार मवाळी वृत्तीचे असल्याने त्या काळात ते अनेकांना न रूचणारे होते. स्वातंत्र प्राप्तीपूर्वी भारतीय शेती दूरावस्थेत होती. स्वातंत्र प्राप्तीनंतर या क्षेत्रात बरेच बदल घडवून आणने आवश्यक होते. व ग्रामीण क्षेत्रात १९५१ च्या दरम्यान ८२.७ः लोकसंख्या निर्भर होती. शेती व्यवसायावर ताण वाढता स्वरूपाचा असल्याने परिस्थिती दयनिय होत चालली होती. भारतीय शेती ही सर्वसामान्यतः निसर्गावर अवलंबून असल्याने पाणी पूरवठयाच्या फारस्या सोई विकसीत होवू शकल्या नव्हत्या तसेच शेतीचे यांत्रिकीकरण व्हायचेच होते व शेतीची कामे करण्यासाठी लागणाऱ्या पशूंची संख्याही दुष्काळामुळे कमी होत होती. अशा अवस्थेत वाढती लोकसंख्या व त्याचा विपरीत परिणाम शेती व्यवसायावर होणारच हया दृष्टीने डॉ. बा. आंबेडकर विचार करीत होते. यासाठी त्यांनी आपल्या अभ्यास विचाराच्या माध्यमाने सांगतात की,

१) शेतीचे संघटन करणे फार आवश्यक आहे. यासाठी डॉ. बा. आंबेडकर शेती हा "राज्याचा धंदा" या शब्दात त्याचे उल्लेख करीतात व सूचवितात की, सहकारी शेती ही देशाच्या हिताच्या दृष्टीने उपयूक्त असणार

**सामुदायिक शेतीची प्रस्तावित योजना :-**

१) शेतजमिनीची मालकी

२) शासनाची जबाबदारी

३) लोकांचे हक्क

४) शासकीय हक्क

याचेकाय असायला हवे याचा विचार डॉ. बा. आंबेडकरानी आपल्या शेतीविषयक आर्थिक विचारात केला.

**तक्ता क्र :-२**

**भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात निरनिराळया क्षेत्राची हिस्सेदारी**

| क्षेत्राचे नाव | १९५१-५१ | १९८०-८१ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक | ५५.४ | ३८.० | १४.६ | १४.३ |
| द्वितीय क्षेत्र | १५.० | २४.० | २८.५ | २७.९ |
| तृतीय क्षेत्र | २९.६ | ३८.० | ५६.९ | ५७.८ |

स्त्रोत :-कै. डॉ. सु श्री मु. देसाई, डॉ सौ. निर्मल भालेराव - भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन

डॉ बाबासाहेब आंबेडकराच्या आर्थिक विचारात उद्योग क्षेत्राचा विकास हा देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणारा ठरणारा असल्याने त्यानी श्रम क्षक्तीचा योग्य उपयोग नागरीकी करण्यानेच होवू शकते असे मत ते मांडतात हे आज वाढत्या वृतीय क्षेत्राच्या हिस्सेदारीवरून निदर्शनास येते.

**श्रम विषयक विचार :-** साधारणतः उत्पादन क्षेत्राचा महत्व पूर्ण घटक हा श्रम म्हणून मानल्या जातो. श्रम हे श्रमीकापेक्षा वेगळे नसून तो त्याचा अंर्तभूत घटक असल्याने त्याला श्रमीकापासून वेगळे केले जात नाही. उत्पादक घटकातील महत्वपूर्ण असणारा घटक श्रम संबोधले जाता असून तो श्रमीकाला मजूरीच्या स्वरूपात मोबदला ग्राहय करीत असतो.

गरीब वर्गातून पुढे आलेले लाखो श्रमीक जीवन जगण्यासाठी मजूरीवरच अवलंबून होते. परंतू त्याचे शोशन भांडवलशाही च्या माध्यमातून केले जात होते, जाती वादाचा पूढाकार कारणाऱ्या भारतीय समाजाचा अनुभव घेतलेले डॉ. बा. आंबेडकरांना श्रम जीवी वर्गाची स्थिती आणि शोषणाचीजान (माहिती) त्यांना असल्यामुळे या विचारीक क्षमतेत त्यांचा विरोध होता. त्यावेळची परिस्थिती बघता श्रमविभागणी न जातीचा संबंध जोडणार वा त्या समाजात मोठया प्रमाणात होता.

Scanned by CamScanner

तक्ता क्र. ३ भारतातील श्रमिकांची व्यावसायिक विभागणी(श्रमिकांची टक्केवारी)

| व्यावसायिक क्षेत्र | 1951 | 1961 | 1971 | 1981 | 1991 | 99–2000 | 2008–09 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. प्राथमिक म्हणजेच शेतीव्यवसाय क्षेत्र | 72.1 | 71.8 | 72.1 | 68.7 | 66.8 | 56.7 | 50.00 |
| त्यापैकी | | | | | | | |
| शेतकरी | 50.0 | 52.1 | 43.4 | 41.6 | 38.4 | – | – |
| शेतमजूर | 16.7 | 16.7 | 26.3 | 24.9 | 26.4 | – | – |
| पशुपालन, जंगल, व्यवसाय, मासेमारी | 2.6 | 2.3 | 2.4 | 2.2 | 1.9 | – | – |
| **2. द्वितीय किंवा औद्योगिक क्षेत्र** | 10.7 | 12.2 | 11.2 | 13.5 | 12.7 | 17.5 | 21.9 |
| लहान व मोठे उद्योग | 9.0 | 10.6 | 9.5 | 11.3 | 0.5 | 0.6 | 0.9 |
| खाणकाम, दगडाच्या खाणीतील काम | 0.6 | 0.5 | 0.5 | 0.6 | 9.5 | 11.3 | 14.5 |
| बांधकाम | 1.1 | 1.1 | 1.2 | 1.6 | 1.2 | 1.6 | 6.5 |
| **3. तृतीय किंवा सेवाक्षेत्र** | 17.2 | 16.0 | 16.7 | 17.8 | 20.5 | 25.8 | 28.1 |
| व्यापार व्यवसाय | 5.2 | 4.0 | 5.6 | 6.3 | 7.5 | 11.1 | 14.2 |
| वहतूक दळणवळण, साठवणूक सेवा | 1.5 | 1.6 | 2.4 | 2.7 | 2.8 | 4.1 | 6.5 |
| इतर सेवा (शिक्षक, डॉक्टर, अभियंते, नोकरदार इ. बॅकसेवा) | 10.5 | 10.4 | 8.7 | 8.8 | 10.2 | 10.6 | 7.4 |
| एकूण | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.0 |

स्त्रोत :- कै. डॉ. सु श्री मु. देसाई, डॉ सौ. निर्मल भालेराव - भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन

डॉ बा. आंबेडकरांनी अपेक्षीत भारतीय अर्थव्यवस्था क्रियाशील झाल्याचे उपलब्ध आकडे व माहिती वरून निदर्शनास येते परंतु हा बदल आवश्यकतेचया तुलनेत फार कमीच आहे. कारण आजही भारतीय ६८.८४ः लोकसंख्या ग्रामीण क्षेत्रावर निर्भय आहे. श्रम विशयक विचार मांडत असतांना क्षमाचे अपेक्षीत क्षेत्र हे नागरी क्षेत्र असून त्याच्या मागचा मुख्य उद्देश औद्योगिक विकास साध्य करणे हा होता. परंतु स्वातंत्र प्राप्तीनंतर देखील डॉ. आंबेडकरांनी अपेक्षीत लक्ष गाठता आलेले नाही. हे दुर्देवच. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण समजले जाणारे शेती व्यवसाय व शेती व्यवसायाचे पूरक व्यवसाय, पशुपालन, कुकटपालन मासेमारी दुग्ध व्यवसाय महत्वपुर्ण व्यवसाय असण्याचे डॉ. बा. आंबेडकराना जानवते. शेती व्यवसायासोबतच या पूरक व्यवसायात वाढ होणे विकास होणे महत्वपूर्ण असल्याने त्यांना जानवत असे.

**निष्कर्श :-**

१) अर्थतज्ञ डॉ. बा. आंबेडकरानी आपल्या आर्थिक विचारात अत्याधूनिक विचाराची मांडणी केलेली आहे.

Scanned by CamScanner

२) डॉ. बा. आंबेडकर आर्थिक (विचारातून) विचारासोबतच सामाजिक परिस्थितीचा अभ्यास असून आर्थिक स्थिती सामाजीक विकासातूनच होणार आहे असे त्याचे मत असल्याचे निदर्शनास येते.

३) आर्थिक विकास हा संपूर्णतः शेती व्यवसायाचा विकासाभोवतीच गतीशिल असल्याचे निदर्शनास येते.

४) डॉ. बा. आंबेडकराना भारतीय शेती व्यवसाय ही एक एक उद्योग साखळी असल्याचे निदर्शनास येते.

५) जाती, धर्म, स्वार्थ, यांच्यानी ग्रासलेली भारतीय अर्थव्यवस्था असल्याचे निदर्शनास येते.

६) सावकारी पध्दतीचा विपरीत परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेचे निदर्शनास येते.

७) समहित धोरणाचा विचाराचा तूटवडा जाणवून येतो.

८) जमिनीचे सतत होत असलेले तुकडे भारतीय अर्थव्यवस्था खालवण्यात महत्वाचे असल्याचे निदर्शनात यैते.

९) निर्यातीच्या माध्यमाने भारताची आर्थिक परिस्थिती कमकूवत करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

१०)निर्यात धोरणाचा सकारात्मक परिणाम म्हणजे भारतात रोजगार निर्मीती क्षमता वाढण्यास उपयूक्त असल्याचे निदर्शनात येते.

११)भारतातील आर्थिक परिस्थितीची जाण असून देखील त्या काळच्या शासनाकडून चूकीच्या निर्णयाचा परिणाम म्हणजे भारतात स्वर्ण साठा करता येऊ शकला नाही.

१२)चलन विकाससंबंधीचे चूकीचे निर्णय घेण्यात आले.

१३)भारतीय वाढती लोकसंख्याचा सदउपयोग करण्यात शासनाने व राज्य कर्त्यानि केलेल्या चूका निदर्शनास येते.

१४)औद्योगिकरण हा देशाचा आर्थिक विकासासाठी फार उपयूक्त असू शकते या कडे डॉ. बा. आंबेडकरांनी लक्ष केंद्रित केले. परंतू शासनाकडून कानाडोळा करण्यात आले.

१५)डॉ. बा. आंबेडकरांनी ग्रामीण विकासात देशाचा आर्थिक विकास साधल्या जाणार असे मत मांडले तसेच पशुपालन कुकुट पालन व एकत्रीकरण च्या माध्यमाने देशाची आर्थिक स्थिती सुधारता येऊ शकते असे देखील मत मांडल्या निदर्शनास येते.

**उपाययोजना :-**

१) डॉ. बा. आंबेडकर आधुनिक विचारवादी अर्थतंज्ञ असल्या आपले आधूनिक विचार अती परखड पणे मांडले आहे त्याची अमलबजावनी करणे आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरू शकते.

२) डॉ. बा. आंबेडकराच्या आर्थिक विचारावर आवश्यक असलेली क्रिया होणे जलद गतीने आवश्यक आहे.

३) वर्तमान भारतीय मुद्रा धोरण मध्ये बदल होणे अपेक्षीत आहे.

४) शासनाने शेतकल्याणासाठी ज्या योजना निर्माण केल्या त्याचा काटेकोर पाठपूरावा केला जाने आवश्यक आहे.

५) समानतेचा अभाव आजही दिसून येतो.

६) लोकशाही शब्दात समाज वाद निर्माण झाल्याने सामाजीक आर्थिक विकास साधण्या अडथळा निर्माण झालेला आहे.

७) सहकारी तत्वाचे महत्व लक्षात घेवून शासनाचे निर्णय पालन करणे आवश्यक असल्याचे दिसते.

८) तंत्रज्ञानाचा विकासाने शेती विकास साधून औद्योगीक विकास साधने व राष्ट्रीय श्रम शक्तीचा पुरेपूर उपयोग करून घेणे महत्वाचे वाटते.

**संदर्भ :-**


१) डॉ. विजय कविमंडन - डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन

२) डॉ. नरेंद्र जाधव - डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान १९९२ सुगावा प्रकाशन पूणे

३) Dr. Jayashri Sarode Research Paper Impact of Dr. Ambedkar thoughts on Indian Economy.

४) कै. डॉ. सु श्री मु. देसाई, डॉ सौ. निर्मल भालेराव - भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन

५) Google

६) Census 2011




Scanned by CamScanner



प्रा. मोहन बि. वडतकर
श्रीमती सकुबाई खडतकर
कनिष्ठ महा. गिरोली, जि. वर्धा

# भारताच्या आर्थिक विकासा संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

## आर्थिक विचाराची पार्श्वभूमी, सामाजिक विषमता व आर्थिक धोरण :

### सामाजिक विशमता

बाबासाहेब जसे झुंझार राजकीय धुरंधर होते त्याहीपेक्षा महत्त्वाचे त्यांचे कार्य सामाजिक नेते म्हणून जबरदस्त आहे. खरे तर ते केवळ सामाजिक नेतेच नव्हते, तर श्रेष्ठ दर्जाचे समाजशास्त्रज्ञ होते. जाती भेदाला खतपाणी घालून असमानता समाजात पसरविण्याचे निदंनीय कृत्य येथील धर्मग्रंथ करतात त्यामुळे समाजाचेच नव्हे तर देशाचेही फार मोठे नुकसान होते, म्हणून असले धर्मग्रंथ जाळून टाकण्याचा इशारा ते भारतीयांना देतात. या धर्मग्रंथानाच येथील धर्मसनातनी लोक प्रमाण मानून त्याप्रमाणे आपले वर्तन करतात. त्यामुळेच समाजामध्ये सर्वत्र विघातक रूढी, वाईट परंपरा व मारक संस्कृती वाढीस लागून समाजाची अपरिमित हानी होते असे त्यांचे म्हणणे होते महापुरूष दोन प्रकारचे असतात. राष्ट्रांवर गुलामगिरीचे संकट ओढवले असता जनतेत स्वातंत्रेच्छा व स्वाभिमान जागृत करतो तर दुसऱ्या प्रकारचा महापुरूष सामाजिक जुन्या चालीरिती, जुनी समाजरचना, जुनी मूल्ये बदलवून न्याय व समतेवर मानतावादी तत्त्वांच्या पायावर नवसमाजाची उभारणी करतो सर्वांना समतेचे बंधुत्वाचे व स्वातंत्र्याचे हक्क प्रदान करण्याचा प्रयत्न करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दुसऱ्या प्रकारचे महापुरूष होते. त्यांचे सामाजिक कार्य भारताच्या समाज पुनर्बांधणीच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या सामाजिक विचार व कर्तृत्वातून सामाजिक परिवर्तनाची दिशा स्पष्ट होते. त्यांचे विचार मुलगामी स्वरूपाचे असून त्यांचा दृष्टिकोन केवळ विशिष्ट परंपरामध्ये सुधारणा घडवून आणणे एवढाच मर्यादित नव्हता तर त्यांचे सामाजिक कार्य पुरोगामी व परिवर्तनाची होते. समताधिष्ठित समाज निर्माण व्हावा असे त्यांचे स्वप्न होते.

देशामध्ये राजकीय स्वातंत्र्याची चळवळ वेग धरीत असताना डॉ. आंबेडकरांनी सामाजिक स्वातंत्र्याचा लढा उभारला. त्यांना माहीत होते की, समता प्रस्थापित झाली तर राजकीय स्वातंत्र्य आपोआपच मिळेल. वरील सर्व बाबींचा विचार केल्यास ते उच्च दर्जाचे सामाजिक नेते होते. त्यांनी केलेल्या मानवतावादी सामाजिक लढ्यामधून आम्हीही माणसे असून आम्ही भारतीय तथा हिंदूधर्मीय आहो मग निसर्ग निर्मित पाण्यापासून आम्ही वंचित का? आम्ही तुमच्यासारखे स्वधर्मीय हिंदू आहोत मग परमेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्यापासून वंचित का? या सर्व मानवतावादी मूलभूत हक्कांसाठी अस्पृश्यांसाठी महाडच्या तळ्याचा, नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह केला, गोलमेज परिषदातून, मुंबई विधीमंडळातून, संसदेतून राज्यघटना समिती समोर, पुणेकरांद्वारे अस्पृश्यांना मानवी हक्क मिळावे, त्यांचा राजकारणात प्रवेश व्हावा, ते शिक्षणांपासून रोजगारांपासून वंचित राहू नये म्हणून अनेक लढे केलेत. अनेकदा निवेदने देऊन, भाषणे करून तत्कालीन सरकारचे, कॉंग्रेस पुढाऱ्यांचे, एवढेच नव्हे तर गोलमेज परिषदेतून अस्पृश्यांनी निग्रो आणि जर्मनीतील ज्यू यांच्या गुलामगिरीपेक्षा अस्पृश्यांची भारतातील स्थिती केविलवाणी आहे, प्रत्येक भारतीयसाठी अत्यंत लाच्छनास्पद आहे. हे जगाच्या निदर्शनास आणून दिले. एवढेच नव्हे तर येथील भारतीय समाजाची समाजशास्त्रीय दृष्टीने सैध्दांतिक पध्दतीने अवलोकन करून 'अस्पृश्य पूर्वी कोण होतो?' 'जातीभेद', हिंदूत्ववाद', 'भारतीय स्त्रियांची उन्नती व अवनती' आदि समाजशास्त्रीय असे ग्रंथ लिहिलेत यावरून ते दिगज सामाजिक नेते होते हे निदर्शनास येते.

### आर्थिक धोरण :

बाबासाहेब खऱ्या अर्थाने जगप्रसिध्द अर्थतज्ज्ञ होते त्यांनी

Scanned by CamScanner

एम. ए. पी. एच. डी., एम. एस., सी. व डी. एस. सी. या इंग्लंड अमेरिकेतील उच्च पदव्या अर्थशास्त्रावर प्रबंध लिहूनच मिळविल्या होत्या. प्राचीन भारतातील व्यापार, रूपयाचा प्रश्न, इंग्रजी हिंदुस्थानातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती आदि अर्थशास्त्रावर प्रबंध लिहून वरील उच्च पदव्या मिळविल्या. ते मुंबईच्या सिडनहॅम महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक सुध्दा होते. आर्थिक समानतेला ते लोकशाहीचा प्राण मानत होते. भारताच्या संदर्भात आर्थिक विचारधारा काही मुठभर धनिक लोकांच्या हिताला कृषी फायदेशिर राहिल असा विचार करून ज्यावेळी सरकारद्वारा इथली आर्थिक स्थिती राबविण्यात येत होती. तेव्हा बाबासाहेबांनी तत्कालीन परिस्थितीवर भारताच्या विविध आर्थिक धोरणा विषयी आपले परखड विचार मांडले ज्यामध्ये भारतीय अंदाजपत्रक, सविधान समितीतील भाषणे त्यांनी स्थापलेला स्वतंत्र मजुर पक्ष व शेडु'ल्ड कास्ट फेडरेशन, भारतीय रिपब्लिकन या राजकीय पक्षांची ध्येय धोरणे त्यांची राज्यसमाजवादांची संकल्पना आदीचे सुक्ष्म अवलोकन केले म्हणजे ते खरोखरच दिग्गज जगप्रसिध्द अर्थतज्ञ होते हे दृष्टीपथास येते.

### आर्थिक नीती :-

भारतात राजकीय समानतेसोबतच आर्थिक समानता प्रस्थापित होणे अत्यंत गरजेचे आहे हे सांगतांना बाबासाहेबांनी राज्यघटनेची अंमलबजावणी करणाऱ्या राज्यकर्त्यांना घटना समितीमध्ये भाष्य करताना असा निर्वाणीचा इशारा दिला की, जर आम्ही राजकीय समतेबरोबर सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित केली नाही, तर जे लोक साजाजिक व आर्थिक विषमतेचे बळी ठरतील ते लोक न्यायाअभावी मोठ्या कष्टाने तयार झालेला राजकीय लोकशाहीचा डोलारा समुळ उध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही. असा निर्वाणीचा इशारा बाबासाहेबांनी ६३ वर्षापूर्वीस दिला होता. परंतु अत्यंत खेदाची बाब ही की, राज्यघटनेची अंमलबजावणी होऊन ६३ वर्षे झालीत परंतु अजूनही आमच्या देशात आर्थिक असमानता पदोपदी दिसून येत आहे. परिणामी या देशातील उद्योग नीती ही धनदांडग्यांच्या, करोडपतीच्या मुठभर धानिकांच्या हिताची दिसून येते. त्यामुळे या देषातील तमाम बहुजन वर्ग दारिद्रय रेशेखाली जीवन जगत असून त्यांना धड दोन वेळच्या जेवणास सुध्दा मोहताज व्हावे लागते. ही वस्तुस्थिती आहे.

### बाबासाहेबांचे औद्योगिक धोरणाविषयी मत :-

देशातील औद्योगिकीकरणांवर डॉ. आंबेडकारांनी जोर भर दिला होता. 'औद्योगिकिकरण म्हणजे यंत्रे अधिक यंत्रे' त्यांचे मत होते असे असले तरी त्यांचा औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातील मनुष्यबळाच्या वापराला मुळीच विरोध नव्ह तर उलट ते या मताचे होते की, देशातील भांडवल बेकार अ तरी फारसे काही बिघडत नाही. परंतु कामगार बेकार रा कामा नये अशी त्यांची धारणा होती. शेतीतील अतिरि लोकसंख्या उद्योगधंदयाकडे वळविली पाहिजे, यावर त्य जोरदार भर दिला होता. देशातीलच उद्योगधंदे भरभराटीस य व देशातीलच मजुरांना रोजगार मिळावा, यावर बाबासाहेब कटाक्षाने भर होता. परंतु आज आपल्या देश जागतिकीकरणाच्या व मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावाने वि उद्योग कंपन्यानी या देशात मालाच्या उत्पादनाच्या क्षेत्रात धुमाकूळ घातला आहे, याचा परिणाम असा झाला की, दे उद्योगधंदे बुडाले व जे थोडे फार प्रमाणात देशी उद्योग कसे टिकून आहे: परंतु त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तू वि कंपन्यांनी काढलेल्या वस्तूपेक्षा ग्राहकांना महाग प असल्यामुळे भारतीय ग्राहकाच देषी वस्तू पसंत करीत ना त्यामुळे देशी उद्योग विदेशी उद्योगाच्या स्पर्धेत टिकू शकत नाही आज देशी उद्योगांच्या मानाने विदेशी उद्योग कंपन्य अत्याधुनिक यंत्रे व संगणकीकरण यांचा वाढता वापर ह असल्यामुळे देशातील कामगारांची समस्या निर्माण झाली आ याशिवाय विदेशी कंपन्या भारतातील सर्व चलन परदेशात असल्यामुळे आपल्या देशावर कर्जाचा डोंगर उभा ठाकला आ या मुक्त अर्थव्यवस्थेच्या व जागतिकीकरणाच्या स औद्योगिक व व्यापारी नितीला बाबासाहेबांचा तिव्र विरोध हो मजुरांचे वेतन निष्चित व्हावे म्हणून बाबासाहेबां कामगारांसाठी किमान वेतन कायदा संमत करून घेतला हो १९४२/४६ मध्ये बाबासाहेब ब्रिटीश सरकारमध्ये सार्वजनि बांधकाम व मजूर मंत्री असताना या देशातील तरूणांना रोजगा उपलब्ध व्हावा म्हणून त्यांनी सेवा योजना आयोग सुरु केले हो

### ब) शेतकऱ्यांचे प्रश्न व धोरणांचा परिणाम

बाबासाहेबांनी १९१८ मध्ये 'भारतातील अल्पभूधारक अ प्रबंध लिहून शेताचे लहान लहान व विखुरलेले तुकडे शेतीच्या

Scanned by CamScanner

उत्पादनांवर कसा परिणाम करतात हे या प्रबंधातून दर्शवून भारतातील शेतीच्या अनेक समस्यांशी शेती उत्पादन जुळलेले आहे असे मत व्यक्त करून शेतीच्या अर्थशास्त्रावर भर दिला. त्यांच्या मतानूसार अल्प भूधारकांच्या कमी उत्पादनाचे कारण म्हणजे या देशातील सदोष सामाजिक अर्थव्यवस्था होय. त्यांनी शेतकऱ्यांच्या संघटनेवर भर दिला त्यांनी शेती संदर्भात भूमीहीन अल्पभूधारक, खोती पध्दती, महारवतन, जमीन महसूल, सामुदायिक शेती, शेतीचे राष्ट्रीयकरण आदी विषयांवर आपले पुरोगामी विचार मांडलेत. त्यांनी घटना समितीला सादर केलेल्या 'राज्य आणि अल्पसंख्याक' या प्रबंधातून आर्थिक शोषणविरूध्द शोषिताच्या संरक्षणासाठी एक आर्थिक योजना मांडून त्यात त्यांनी कृषी उद्योगाला राष्ट्रीय घोषित करून जमिनीचे राष्ट्रीयकरण व सामुदायिककरण्याचे सुचविले. अशाप्रकारे बाबासाहेब शेती उद्योगाला औद्योगिकिकरणाशी जोडू पाहत होते. त्यांनी महारवतन विरोधी बील, खोती विरूध्द बील मुंबई विधीमंडळात मांडले होते. विषमतावादी शेतसाऱ्यांचा विरोध दर्शवून इंग्रज सरकारवर टीका केली व शेतसारा उत्पन्न कराच्या कायद्याखाली आणण्याची मागणी केली. कायदेमंत्री असताना शेतकऱ्यांच्या हितांचे अनेक कायदे व योजना या देशामध्ये कार्यान्वित केल्या. शेतीला जलसिंचनाची आवश्यकता आहे हे ओळखून दामोधर घाट ही जलसिंचन योजना तयार केली. अशाप्रकारे बाबासाहेब शेतकऱ्यांचे कैवारी होते.

**बाबासाहेबांचे शेती संदर्भात विचार :-**

या देशातील ८० टक्के लोकांचा व्यवसाय शेती असून सुध्दा व आपल्या देशाचा प्रमुख उद्योग शेती असूनसुध्दा शेतकऱ्यांना आपल्या दैनंदिन प्राथमिक गरजा भागविता येत नाही. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभूत गरजांपासूनही वंचित राहावे लागते याचे शल्य बाबासाहेबांना सतत बोचत होते. शेतकऱ्यांना कष्टरूपी दिव्यातून जावे लागते तरीसुध्दा त्यांचा कसलाही उध्दार होत नाही. याची पुरेपुर जाणीव त्यांना होती म्हणूनच शेतकऱ्यांनी संघटना बळकट करून स्वतःची दुःखे व दारिद्र्य दूर करण्याचे संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न करावे व आपले हक्क पदरी पाडावेत असे सुचविले होते. बाबासाहेबांनी शेती विकासाच्या संदर्भात देशातील संपूर्ण जमिनीचे सरकारद्वारा राष्ट्रीयीकरण करून सामुहिक शेतीचे प्रयोग हाती घ्याचे असे राज्यसमाजवादाच्या म्हणजेच 'स्टेटस् अॅन्ड मायनॉरिटीज' या राज्यघटना समितीला सादर केलेल्या आर्थिक योजनेतून सुचविले होते. राज्यसमाजवादाच्या या आर्थिक योजनेतून असेही सुचविले होते की, शेतीसाठी लागणारी साधन सामुग्री शेतकऱ्यांना सरकारद्वारेच वितरित करण्यात यावी. व उत्पन्नाच्या वेळी शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात शासनाने ठरवून दिल्यानुसार शेतसारा सरकारी तिजोरीत जमा केल्यानंतर झालेले उत्पन्न सर्व शेतकऱ्यांमध्ये वितरित करण्यात यावे असे सुचविले होते. आजही शेतीला राष्ट्रीय उद्योग म्हणून शासनाद्वारे मान्यता मिळाल्याचे दिसत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या पिकांना खर्चाच्या प्रमाणात बाजारभाव मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जाची परतफेड करणे मोठे अवघड जाते व कर्जापोटी शेतकऱ्यांचे दिवसे - दिवस आत्महत्येचे प्रमाण वाढते आहे ही बाब आपल्या देशासाठी अत्यंत लाजिरवाणी, चिंतेची व गंभीर अशी आहे. बाबासाहेबांनी तयार केलेल्या 'स्टेटस् अॅन्ड मायनॉरिटीज' अर्थात राज्यसमाजवादांच्या आर्थिक योजनेनुसार जर आपल्या सरकारने कृषीनिती अवलंबली असती, तर या देशातील बळीराजाचे प्रश्न चुटकी सरशी सुटले असते दूष्काळ, दारिद्र्य, बेकारी, भुकबळी व कुपोषण आदी समस्या निर्माण झाल्या नसत्या.

**ग्राम विकासाची तळमळ :-**

आपल भारत देश हा बहुतांश खेडयांचा देश आहे. ८० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. म्हणून ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे असे बाबासाहेबांना सतत अंतःकरणातून वाटत होते. या देशातील बहुतांश मागासवर्गीय समाज हा मोठया प्रमाणात ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्यांना अन्न, वस्त्र, निवारा या मूलभुत गरजांपासूनही वंचित राहावे लागते व अत्यंत दारिद्र्यात त्यांना जीवन जगावे लागते, याची बाबासाहेबांना पुरेपुर जाणीव होती. म्हणूनच त्यांनी खेडयांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. त्यामध्ये रस्ते विकास, रोजगार, प्राथमिक शिक्षण या संबंधी सुधारणा करण्याच्या हेतूने त्यांनी खुप प्रयत्न केलेत बाबासाहेबांनी सर्व सामाजिक लढे अस्पृश्यांच्या, स्त्रियांच्या न्याय हक्कांसाठी, त्यांना मानाचे जीवन जगता यावे म्हणूनच लढले होते, हे निदर्शनास येते. मराठवाड्या सारख्या अत्यंत दुर्गम भागात औरंगाबाद येथे त्यांनी स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयातून हजारो मागासवर्गीयय विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. यावरून त्यांच्यातील शैक्षणिक

Scanned by CamScanner

*तळमळीची साक्ष पटते.*

*बाबासाहेबांनी 'अस्पृश्यांना शहराकडे चला' असा उपेदश केला होता. कारण त्याकाळी खेड्यात तिव्र जातिभेद होता. सामाजिक विषमता होती. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, खेडे संपूर्ण ओस पडावी व शहरेच लोकांच्या गर्दीने व्यापून जावी.*

जातीभेदाला चालना देणारी बाराबलुतेदार पध्दती तिव्रस्वरूपात प्रचलित होती. त्यामुळे बाबासाहेबांनी या बलुतेदार पध्दतीमुळे त्या समाजातील लोकांना चाकोरीबध्द व्यवसाय करावा लागत होता. त्यांना आपला व्यवसाय सोडून दुसऱ्या क्षेत्रात जाण्यास प्रतिबंध होता. बलुतेदार पध्दतीमुळे श्रमाचीच नव्हें, तर श्रमिकांचीही विभागणी होत होती. त्यामुळे बाबासाहेबांनी बलुतेदार पध्दतीचा विरोध केला होता. परंतु याचा अर्थ असा नव्हे की ग्रामीण भागातील हस्तव्यवसाय संपूर्णपणे संपुष्ठात यावा व खेडे ओस पडावी असा नव्हता तर ग्रामीण भागातही शेतीत होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया होणारे उद्योग अत्याधुनिक यंत्राच मदतीने निर्माण व्हावे असा होता.

**शेती उत्पादनाचे कार्य :-**

या देशातील ८० टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्यात असून त्यांचा व्यवसाय शेती आहे. तरीसुध्दा त्यांना आपल्या अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभुत व प्राथमिक गरजाही भागवता येत नाही. याचे शल्य बाबासाहेबांना सतत टोचत होते. शेतकऱ्यांना कष्टरूपी अग्नीदिव्यातून जावे लागते. तरीसुध्दा त्यांचा उध्दार होत नाही याची जाणीव होती म्हणूनच सातारा आणि नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांच्या मेळाव्यात १९३८ रोजी मार्गदर्शन करताना त्यांनी शेतकऱ्यांच्या संघटनेवर भर दिला. स्वतःची दुःखे आणि दारिद्रय दूर करण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः संघटना उभारून त्याद्वारे प्रयत्न करावे, मात्र शेतकऱ्यांच्या संघटनेमध्ये जातीभेद, वर्णभेद या असमानतेच्या तत्त्वांना थारा असु नये, असे त्यांचे प्रामाणिक मत होते.

१) शेती हा राज्य उद्योग असावा, जमिनीवर फक्त राज्याची मालकी असावी. कोणीही भूमीहीन कुळ वा जमीनदार असू नये, सक्तीचे जमीन संकलीकरण किंवा कुळ कायदे करण्यापेक्षा सामुहिक शेती पध्दतीचे प्रयोग हाती घेण्यात यावे.

२) कृषी उद्योगाला राष्ट्रीय उद्योग घोशित करून जमिनीचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे. शेतकऱ्यांकडू[न] नियमाप्रमाणे शेतसारा वसूल करण्यात येऊन उरलेल्या शासनाद्वारे शेतकऱ्यांना समप्रमाणात वाटप व्हावे. [..] लागणारे भांडवल राज्य शासनाद्वारे विनामूल्य पुरवि[..] सामुदायिक शेतीचे वाटप करताना जात, धर्म, पंथ व [..] बाबींचा मुळीच विचार करू नये. कोणत्याही परिस्थि[तीत] कुळ वा भूमिहीन राहू नये याकडे सरकारने लक्ष द्यावे.

३) पायाभूत व मूलभूत उद्योग राज्य सरकारच्या [..] करून विमा व बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे.

अशा प्रकारच्या या देशातील कृषी उत्पन्नाच्या [..] पुरोगामीत्व ठरणाऱ्या प्रमुख तरतुदी वरील आर्थिक [..] होत्या; परंतु ही शेतकऱ्यांच्या दृष्टिने लाभदायी [..] समाजवादाची आर्थिक योजना त्याकाळच्या सनातनी [..] नेत्यांनी व काँग्रेस नेत्यांनी कार्यान्वित होऊ दिली नाही. [..] ही योजना कार्यान्वित झाली असती, तर आज देशात [..] बेकारी, भांडवलशाही धार्जिनी आर्थिक स्थिती, अर्थव्यस्थेच्या नावाने विदेशी उद्योग कंपन्यांचा हैदोस [..] उद्योग धंदे बुडाले, अशी भीषणावह आर्थिक स्थिती [..] देशात निर्माण झाली नसती केवळ बाबासाहेबांनी या [..] कृषी उत्थानासाठी राज्य समाजवादाची आर्थिक योजना [..] नाही, तर शेतीसाठी जलसिंचनाची अत्यंत आवश्यकता [..] ओळखून त्यांनी त्याकाळात दामोधर घाटी धरण योजना कार्यान्वित केली. १९४३ रोजी बंगालमध्ये फार भीष[ण] दुष्काळ पडला असता व हजारो लोक भूकबळी ठरत [..] अधीक धान्य पिकवा ही मोहीम राबविली. भारतीय [..] तयार करीत असताना मसुदा समितीचे अध्यक्ष या [..] बाबासाहेबांनी तत्कालीन कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख [..] सूचना ज्या कृषी विकासासाठी फार महत्त्वाच्या हो[त्या] सूचनांचे कायद्यमध्ये रूपांतर करून देशाच्या संविधा[नात] त्यांचा समावेश केला.

डॉ. आंबेडकरांच्या शेती समस्याविषयक विचारांचा [..] म्हणजे १९५० च्या दशकात विविध राज्यांनी संमत [..] जमीन सुधारणाविषयक कायदे अंमलात आणले व १९६[..] मध्ये शेतीमध्ये घडून आलेली आपल्या देशातील हरितक्रां[ती] डॉ. आंबेडकराच्या कृषिविषयक मार्गदर्शक व प्रेरणा[..]

Scanned by CamScanner

विचारांचे फलित होयं. त्यांचे विचार त्यावेळी जेवढे मार्गदर्शक होते, त्याहीपेक्षा आज ६५ वर्षानंतरही मोलांचे मार्गदर्शक ठरत आहे. शेतीची उत्पादकता वाढावी यासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून अनेक प्रकारच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. थोडक्यात सरकारने शेतीमध्ये भांडवल गुंतविल्यामुळे शेतीची उत्पादकता काही प्रमाणात वाढली आहे. शेतीतील अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी सरकारद्वारे युध्दपातळीवर औद्योगीकिकरणावर भर देण्याचे प्रयत्न सुरू आहे.

**शेती व शेतकऱ्यांसंदर्भात विशेष कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती व शेतकऱ्यांच्या संदर्भात मौलिक व आमुलाग्र विचार मांडले नाहीत, तर प्रत्यक्ष कार्यही केलेत. दुसऱ्या गोलमेज परिषदेत काही नेत्यांनी जमीनदारांना विशेष प्रतिनिधित्व द्यावे यावर भर दिला असता, त्याला बाबासाहेबांनी तिव्र विरोध केला होता. त्यांच्या मते जमीनदारांना विशेष प्रतिनिधित्व दिले तर स्वातंत्र्य आणि प्रगती याचा हेतू निश्फळ ठरतो. कारण जमीनदार नेहमी क्रांतीविरोधी व सनातन्यांच्या बाजूने असतात. महार वतनांना इंग्रज सरकारने बसविलेल्या करवाढीच्या विरोधात बाबासाहेबांनी इंग्रज सरकारच्या विरोधात तिव्र स्वरूपाचा लढा उभारला होता व त्याचा परिपाक म्हणजे थोड्याच दिवसात इंग्रज सरकारनी ते ज्यादा कर वाढीचे आज्ञापत्र मागे घेतले.

१० सप्टेंबर, १९३७ मध्ये बाबासाहेबांनी मुंबई विधीमंडळात खोती पध्दती रद्द करण्याविषयी विधेयक मांडले होते. १९४६ रोजी ऑल इंडिया शेडुल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने बाबासाहेबांनी संविधान सभेला 'राज्ये आणि अल्पसंख्याक' हया नावाचा एक मसुदा सादर केला. त्यामध्ये अल्पसंख्याक व अस्पृश्य यांच्या सामाजिक व आर्थिक संरक्षणाची एक योजना होती. यामध्ये शेतीसंबंधी काही महत्त्वाच्या बाबी होत्या.

१) शेतीला राष्ट्रीय उद्योग म्हणून सरकारने घोषित करावे.

२) शेती सरकारच्या मालकीची असावी.

३) शेतीचे सामुहिकीकरण करण्यात यावे.

४) शासन शेतकऱ्यांना मशागतीसाठी पैसा, बी - बीयाणे, खते, रसायने पुरवतील.

५) शेतकरी शासनाला तो सर्व खर्च आणि निर्धारित महसूल कर जमा करतील अशाप्रकारे बाबासाहेबांची राज्यसमाजवादांर्तगत सामुदायिक शेतीची संकल्पना होती.

सतारा आणि नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी १९३८ मध्ये काढलेल्या मोर्चाला संबोधित करताना बाबासाहेब म्हणतात, 'शेतकरी बंधुनो, तुमची दुःखे अनेक आहेत, ती दुर करण्यास तुम्हीच कंबर कसली पाहिजे आणि आपली संघटना बळकट केली पाहिजे. खोती नष्ट करण्यासाठी मी जे बिलकायदे मंडळात आणले ते मंजूर करण्यासाठी माझ्या प्रयत्नापेक्षा तुमच्या एकजुटीवर अधिक अवलंबून आहे. तुमची संघटना जेवढी मजबूत असेल, तितके तुमच्या हिताचे कायदे तुम्हाला मंजूर करून घेता येतील.'

भारतीय संविधान लिहितांना कृषी विषयावर तसेच शेतकऱ्यांच्या कल्याणांवर अनेक चर्चा होत असे. त्यावेळी शेतकरी नेते डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक प्रस्ताव मांडले असता, कायदामंत्री बाबासाहेबांनी त्या प्रस्तावांना कायद्याचे स्वरूप दिले. १९४३ मध्ये बंगालमध्ये भीषण दुष्काळ पडला असता व हजारो लोक भुकबळी ठरले असताना बाबासाहेबांनी 'अधिक धान्य पिकावा' ही मोहीम सुरू केली होती. शेतीला भरपूर पाण्याची सतत आवश्यकता असते हे ओळखून 'दामोधर घाटी' धरण प्रकल्प त्या काळी बाबासाहेबांनी कार्यान्वित केला होता. अशा प्रकारे षेती आणि शेतकऱ्यांच्या संदर्भात बाबासाहेबांनी बरेच भरीव कार्य केले, असे असले तरी स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने अनेक जमीन सुधारणा कायदे केलेत; परंतु ते प्रभावी ठरले नाहीत. तुकडेबंदी कायदा होऊनही तुकडेबंदी पूर्णपणे थांबलेली नाही. कमाल जमीन - धारणेच्या कायद्यातून अनेक पळवाटा काढल्या जात आहे. थोडक्यात सरकारच्या जमीन सुधारणा कायद्याची काटेकोरपणे आजही अंमलबजावणी होताना दिसत नाही. बाबासाहेबांनी सुचविलेल्या सहकारी व राष्ट्रीयिकरण शेतीचा प्रयोगही यशस्वी झाला नाही. शेतमालाला योग्य भाव मिळविण्यासाठी कृषी मूल्य आयोग स्थापन करण्यासाठी टाळाटाळ होत आहे. परिणामी आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. कधी शेतकऱ्यांना नापिकीमुळे, तर कधी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या कराव्या लागत आहे.

Scanned by CamScanner

या शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या संदर्भात अनेक प्रकारचे उपाय सरकारकडून केल्या जात आहे. शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज दिल्या जात आहे; परंतु त्यांचा परिणाम दिसून येत नाही. परंतु बाबासाहेबांनी शेती संदर्भात सुचविलेल्या वरील सर्व उपायांकडे गांभीर्याने पाहिल्यास शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांवर ताबडतोब प्रतिबंध घातला जावू शकतो. त्यासाठी जमिनींची राष्ट्रीयिकरण, सहकारीकरण व सामुहीकिकरण करणे आजच्या घडीची खरी गरज आहे.

**क) अंतरराष्ट्रिय अनुकुल व प्रतिकुल शोधन शेष रुपयाचे अवमूल्यन, रोजगार निर्मिती.**

'रूपयाचा प्रश्न आणि समाधान' या त्यांच्या शोधप्रबंधातून त्यांनी भारताच्या रूपया व इंग्लंडचे पौंड याच्याशी निगडित असा महत्त्वपूर्ण प्रश्न या शोधप्रबंधात अंतर्भूत केला. त्यांनी लॉर्ड केन्स सारख्या जागतिक पातळीवर दिग्गज असणाऱ्या अर्थशास्त्रज्ञाचे मत कालबाह्य ठरविले होते. त्यांच्या मते 'भारतीय सूवर्ण विनिमय,' प्रमाणाच्या शास्त्रीय आधारे करण्याचा सर्वप्रथम प्रयत्न जरी प्रा. लॉर्ड केन्स यांनी केला तरी तो अपुर्ण स्वरुपाचा आहे. प्रा. केन्स यांनी एका महत्त्वपूर्ण मुद्याकडे कानाडोळा केला होता. तो मुद्दा म्हणजे जोपर्यंत रूपयाच्या सामान्य क्रयशक्तीमध्ये स्थिरता येत नाही जोपर्यंत हे चलन स्थिर होणे शक्य नाही. म्हणून डॉ. आंबेडकरांनी या संदर्भात उपाय सुचविताना असे मत व्यक्त केले की, त्यांच्या मतानुसार भारतातील सुवर्ण विनिमय प्रमाणाला स्थैर्य मिळवून देण्यासाठी निर्गमणाची निश्चित मर्यादा असलेल्या अपरिवर्तनीय रूपया हाच स्थिर ठेवणे प्रभावी मार्ग ठरू शकतो. त्यांच्या या उपायांचे त्यावेळी जगातील सर्व श्रेष्ठ अर्थतज्ज्ञांनी मुक्त कंठाने भरपुर स्तुती केली. जेव्हा या प्रश्नावर अभ्यास करण्यासाठी फाउलर समिती नेमून त्या समितीने आपला अहवाल सादर केला, तेव्हा बाबसाहेबांनी त्या अहवालाला विरोध केला होता. त्यांच्या मते या अहवालातील उपायावरून रूपयाचे स्थैर्य होणे शक्यच नाही. म्हणून डॉ. आंबेडकरांचे प्रांतिक वित्तासंबंधी विचार तर त्या काळातच नव्हे तर आजही अत्यंत मौलिक आहे. ते यासंबंधी म्हणतात 'सरकार सषक्त हवे असेल, तर वित्तासंबंधी देखील ते सशक्त असले पाहिजे.' वित आयोगाच्या स्थापनेमध्ये बाबासाहेबांचा वाटा हा फार मोलाचा आहे. 'सार्वजनिक आय-व्यय' हा त्यांचा ग्रंथ म्हणजे अर्थशास्त्रज्ञांच्या अध्ययनाचा एक महत्त्वाचा आहे. केंद्र व राज्याच्या संबंधाबाबत डॉ. आंबेडकरांचे विचार महत्त्वपूर्ण आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २७० च्या चर्चेच्या वेळी प्रांतिक स्वायत्तता आणि प्रांतिक आय - व्यय यासंबंधी जे त्यांनी विचार मांडले त्याची प्रा. सेलिग्मन या त्यांच्या प्राध्यापकांनी खुप स्तुती केली. 'प्रांतिक स्वायत्तता आणि प्रांतिक आय-व्यय या संदर्भात त्यांच्या मते वित आयोगाच्या शिफारसी राष्ट्रपतीला मार्गदर्शक ठरतात. राष्ट्रपती व घटकराज्ये यातील दुवा वित आयोग होय असे त्यांचे मत होते. बाबासाहेबांनी इंग्रजाच्यां तत्कालीन राज्यकारभाराचे मूल्यमापन करण्याच्या संदर्भातील 'भारतातील राष्ट्रीय नफ्याचा वाटा एक ऐतिहासिक पृथक्करण' नामक प्रबंध कोलंबिया या अमेरिकन विद्यापीठाला सादर केला होता. त्या प्रबंधाचे सार खालीलप्रमाणे होते.

इंग्रजांनी भारतात शांतता प्रस्थापित केली, हे खरे असले तरी त्यावर समाधान मानने हे योग्य नाही. इंग्लंडमधील उद्योगधंदे भारतातील भांडवलदार यांच्या हिताच्या दृष्टीनेच इंग्रज शासनकर्ते आपले धोरण ठरवितात. बाबासाहेबांनी बट्राँड रसेल यांच्या 'सामाजिक पुर्नरचनेची तत्वे' या ग्रंथाचे परीक्षण करून 'भारतातील लहान जमिनी व तद्विशयक उपाय' हा महत्त्वपुर्ण ग्रंथ लिहिला अशाप्रकारे त्यांनी सर्वप्रथम औद्योगिकिकरणाच्या तसेच कृषी उत्थानाच्या दृष्टीने महत्त्वाचे विचारमंथन केले. ते आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे.

म्हणूनच ते केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील नामवंत अर्थशास्त्रज्ञामध्ये उच्च दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ व अर्थ विचारवंत होते असे निदर्शनास येते.

**आर्थिक सुधारणा व डॉ. आंबेडकरांचे विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा गाभ म्हणावा असे दुसरे क्षेत्र म्हणजे सामाजिक, आर्थिक न्याय हे होय. सामाजिक, आर्थिक न्यायाच्या माध्यमातून मानवी हक्कांची प्रस्थापना व मानवतेचे जतन आणि सभ्य व सुसंस्कृत समाजाची निर्मिती हे बाबासाहेबांचे स्वप्न होते. सारे जगच या स्वप्नाच्या दिशेने वाटचाल करणारे असावे, अशी त्यांची धारणा होती.

जागतिक बँकेच्या ताज्या अहवालनुसार जगातल्या ६९० कोटी लोकांपैकी १३० कोटी लोकांना आजही वीज उपलब्ध नाही

२६० कोटी लोकांना संडासची सुविधा उपलब्ध नाही. ९० कोटी लोकांना पिण्याचे शुध्द पाणी मिळत नाही आणि १०० कोटी लोक दारिद्रय आणि उपासमारीचे जिवन जगत आहे. जगातील १३ टक्के युवक बेरोजगार आहे. जगातील १५ कोटी युवक दारिद्रये रेषेखालील कुटुंबामध्ये राहत आहे. जगातील एकुण गरीबांमध्ये २४ टक्के गरीब हे युवक आहेत. जगामध्ये असणारे हे सामजिक, आर्थिक विषमतेचे चित्र पाहता जगातील मोठया वर्गाला सामाजिक, आर्थिक न्यायाचा संघर्ष द्यायचा आहे आणि त्यांना न्याय मिळवून देणारी व्यवस्था निर्माण करायची आहे. त्यामुळेच न्याय समाजाच्या निर्मितीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न हे केवळ भारतचे स्वप्न नाही तर संबंध जगातील मानवतेचे स्वप्न आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मास १२० वर्षे झाली तरी, त्यांच्या अनेक पैलूवर अद्यापही म्हणावा तसा प्रकाशझोत टाकण्यात आलेला नाही. घटनाकार, अर्थतज्ज्ञ, पत्रकार, संसदपटू, वक्ते, कामगार व कायदामंत्री, लेखक, विचारवंत, तत्वज्ञ, समाजशास्त्रज्ञ अशा काही पैलूंवर जाणकारांनी काम केले आहे. १९४२ ते १९४६ या काळात बाबासाहेब व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य होते. आजच्या भाषेत सांगायचे तर ते कामगार, उर्जा, सार्वजानिक बांधकाम, जलसंपदा आदी खात्यांचे केंद्रिय कॅबिनेटमंत्री होते. या सर्व खात्यांवर त्यांनी आपली कलदार मुद्रा उमटविलेली आहे. २००० सालापर्यंत देशाला किती वीज आणि पाणी लागेल, याचा अभ्यास करून त्यासाठी दूरदृष्टीने त्यांनी त्याकाळात पावले उचलली. पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, जल वाहतुकीसाठी आणि पर्यटनासाठी (वॉटर पार्क) लागणारे पाणी साठवायचे कसे, पुरवायचे कसे याचे शास्त्रशुध्द नियोजन त्यांनी केले होते. भारतात एकाचवेळी काही राज्यांमध्ये महापूर आलेला असतो, तर दुसऱ्या काही राज्यांमध्ये त्याचवेळी दुष्काळ पडलेला असतो. हे दोन्ही प्रश्न सोडविण्यासाठी बाबासाहेबांनी देशातील सर्व मोठया नद्या एकमेकींना जोडण्याची योजना मांडली. पूरनियंत्रण आणि दुष्काळ निवारण करण्याची ही महत्वाकांक्षी योजना पाठिंब्याअभावी आजवर पुढे जाऊ शकली नसली तरी, एक ना एक दिवस तिचा विचार करावाच लागेल. देशात १९४३ मध्ये त्यांनी शासकीय योजना मांडताना लिहिले होते की, मुबलक आणि स्वस्त वीजपुरवठा उपलब्ध असल्याखेरीज भारताचे औद्योगिकीकरण वेगाने होणार नाही. भारतीय लोक दारिद्रयाच्या दुष्टचक्रात कायमचे अडकले आहेत. दूरदृष्टीने मानवी जीवनाच्या विकासाचा प्रश्न म्हणूनच विजेचा प्रश्न अग्रक्रमाने सोडविला पाहिजे. हा प्रश्न धसाला लावण्यासाठी त्याकाळात त्यांनी अपार मेहनत केली. केवळ पुरेसा नव्हे, तर भरपूर वीजपूरवठा, पायाभूत सुविधा म्हणून उपलब्ध करून देण्यावर त्यांचा भर होता. कोळसा, पेट्रोल, अल्कोहेल व पाण्यापासून वीज निर्मिती करणे, अभियंत्यांना परदेशात पाठवून प्रशिक्षण देणे, वीज व्यवस्थापण, विद्युत वाणिज्य व वीज अभियांत्रिकी ही सर्व क्षेत्रे आधुनिक आणि बळकट बनविण्यासाठी त्यांनी जगभरातल्या या कामांचा अभ्यास करून त्या तोडीची व्यवस्था भारतात उपलब्ध करून देण्याचा चंग बांधला होता. एका शासकीय प्रस्तावातते म्हणतात, 'The broadening of the electrical industy and the development of hydro electric power are inextricabley conneted with development of industries and food production' उद्योगधंदे वाढविणे आणि अन्नधान्याचे उत्पादन करणे या दोन्ही गोष्टी विजेच्या उपलब्धतेवर अवलंबून आहेत, याचे स्पष्ट विवेचन त्यांनी वारंवार केलेले आढळते.

भारतातील पूरनियंत्रण, कृषी जलसिंचन, मृदासंधारण, अन्नधान्य पुरवठा या साऱ्या राष्ट्रीय प्रगतीच्या नाडया आहेत. त्यांच्यासाठी ऊर्जा व जलसंपदा या खात्यांनी जोरदार काम केल्याशिवाय भारत विकासामध्ये मुसंडी मारू शकत नाही. याचे भान देशाला देणारे पहिले राष्ट्रनेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. देशाला 'जल साक्षरता' आणि 'ऊर्जा साक्षरता' यांचे धडे १९४२ ते १९४६ या काळात त्यांनी गिरवायला शिकवले. ही दूरदृष्टी आपण गांभीर्याने ओळखू शकलो असतो, तर आज देशात ना कुणी बेकार दिसले असते ना कोणी शेतकरी आत्महत्या करताना आढळला असता.

ज्या पूर्वास्पृश्य समाजाला उच्चजातींनी पाण्याच मूलभूत अधिकारापासून वंचित ठेवले आणि ज्यांना गुलामीच्या अंधारात ढकलले त्यातून आलेले बाबासाहेब देशाला पूढची १०० वर्षे अविरत प्रकाश (ऊर्जा) आणि पाणी मुबलक मिळावे यासाठी चिंतन, नियोजन आणि उपाययोजना करीत होते. अर्थसंकल्पात त्यासाठी भरीव तरतूद करणे की गरजेचे आहे, हे ते

Scanned by CamScanner

व्हाईसरॉयला पटवून देत होते. भारतातील पहिली १५ मोठी धरणे बांधण्याचे 'ब्ल्यूप्रिंट' (संकल्पचित्र) बाबासाहेबांनी तयार केले. अवघ्या ४ वर्षात त्यासाठी अहोरात्र मेहनत करून त्यांनी कामांची सुरूवातही केली.

जगप्रसिध्द जलतज्ज्ञ डॉ. पी.सी. एच. भाभा म्हणतात, 'अल्पावधीत आपण जुण्यापुराण्या संकल्पातून अत्याधुनिक अशा जलविकास संकल्पनेकडे वळलो आहोत. त्यासाठी नदी खोरे विकासाचा विस्तृत नियोजन आराखडा तयार करण्यात आला. याबाबत दामोदर नदीसंबंधी घेण्यात आलेली पहिली परिषद अतिशय महत्वाची ठरली. कारण तिनेच सर्व मार्गदर्शनाचे काम केले. त्यातूनच पुढे महानदी, कोसी, सौननदी आणि इतर सर्व प्रकल्प तयार झाले. यासंदर्भात बहुउद्देशीय आणि प्रादेशिक विकासाचे प्रकल्प ज्यांनी तयार केले त्या डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे आपण सर्वांनी ऋणी असले पाहिजे.'

'न्यू इंडियाज रिव्हर्स' या जगप्रसिध्द ग्रंथाचे लेखक प्रा. एच. सी. हर्ट हे डॉ. आंबेडकरांचे कार्य किती मौलिक होते, ते नोंदवतात, 'नदीच्या खोऱ्यात पावसाचे पाणी किती उपलब्ध होईल व त्याचे नियंत्रण कसे करावे या प्रश्नांची सोडवणूक इंजिनीयर मंडळी करू शकली असती; परंतु खरे अवघड प्रश्न मुख्यतः राजकीय स्वरूपाचे असे धोरणात्मक होते. तेथील रहिवांशाशी इच्छा, प्रांतिक, सरकारे बिहार व बंगालची बहुउद्देशीय दामोदर खोरे विकासाला मान्यता मिळवणे, खर्चाचे विवरण आणि निर्मिती उपलब्धता हे प्रश्न मुख्यतः राजकीय स्वरूपाचे होते. साधारणतः ३० महिने दामोदर धरणाच्या नियोजनाचे सर्व सुकाणू एका राजकीय व्यक्तीच्या हातात केंद्रित झाले होते. ज्यांनी अत्यंत दूरदृष्टीने आणि झपाट्याने याबाबतचे निर्णय घेतले, ते मंत्री महोदय डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे या बाबतीतील योगदान असाधारण असे मौलिक आहे.'

या सर्व कामांना गती देण्यासाठी बाबासाहेब 'सेंट्रल इरिगेशन ॲण्ड वॉटरवेज ॲडव्हायजरी बोर्ड' स्थापन केले. त्याला त्वरित २०५ जणांचा कर्मचारी व अधिकारी वर्ग मिळवून दिला. पुढे ही संख्या त्यांनी ४४७ पर्यत नेली. या बोर्डाने सरकारी व खासगी वीज कंपन्यांचे दर ठरविण्याचे निकष, त्यासाठीची मार्गदर्शक तत्वे यांची मांडणी केली.

या बोर्डाकडून बाबासाहेबांनी पुढील कामे करवून घेतली. १. पूरनियंत्रण २. जमिनीची झीज रोखणे ३. पुरामुळे होणारे नुकसान टाळणे ४. शेतीसाठी पाणी पुरवणे ५. वीजनिर्मिती करणे ६. भूगर्भातील पाणी शेतीसाठी मिळविणे ७. पूरग्रस्त भागातील पाण्याचा निचरा करणे ८. जलमार्ग निर्माण करणे ९. सर्व राज्यांशी संपर्क करून धरणांचे व वीज निर्मितीचे प्रस्ताव तयार करणे १०. त्यासाठी आवश्यक संशोधन व सर्वेक्षण करणे ११. राज्याराज्यातील पाणी तंटे सोडविणे १२. धरणे बांधणे १३. बहुउद्देशीय प्रकल्प उभारणे १४. भारतीय अभियंत्यांना प्रशिक्षण देणे १५. पर्यावरण, जमीन रचना आणि निसर्गाचा अभ्यास करून तो ग्रंथरूपाने प्रकाषित करणे १६. सुसज्ज ग्रंथालय उभारणे.

या सर्व कामांवर बाबासाहेबांनी बारीक लक्ष असे. कामाच्या प्रगतीचा दरमहा आढावा घेऊन त्याबाबत आवश्यक ती उपाययोजना ते करीत. अनेकदा कामांना ते थेट भेटी देत. त्यातील अनेक भेटी अचानक दिलेल्या असत. स्वतः कामाच्या ठिकाणी ते राहत. अभ्यास करीत. तिथल्या तिथे प्रश्न सोडवित. त्यासाठी त्यांनी अनेक राज्यांचे दौरे केले. जिथे वाहन जात नाही अषा ठिकाणी ते पायी जात. अडचणींची पर्वा न करता ते फिल्डवर जात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढत असे. कामांना गती येई. दर्जा वाढे. या काळातल्या संषोधन, चिंतन आणि अभ्यासामुळेच पुढे घटनेत ते याबाबतच्या अत्यंत निर्दोष तरतुदी ते करू शकले.

१४ नोव्हेंबर १९४४ रोजी त्यांनी 'सेंट्रल वॉअरवेज, इरिगेशन ॲण्ड नेव्हिगेशन ' स्थापन केले. १५ मार्च १९४४ मध्येच त्यांनी सोन नदीचाही प्रकल्प अहवाल मंजूर केला होता. दामोदर, हिराकुंड, सोन नदीचे कार्य प्रकल्प हे बाबासाहेबांच्या कल्पक आणि प्रगल्भ अशा दर्जेदार प्रतिभेतून साकारले आहेत. देशाच्या पुढील १०० वर्षाच्या पाणी व विजेचे नियोजन आणि त्यासाठीच निधी त्यांनी मिळवून दिला. बाबासाहेबांच्या याविषयीच्या सूचनांचे पालन राज्यकर्त्यांनी केले असते, तर आज आला देश भारनियमनयुक्त आणि टँकेरमुक्त दिसला असता.

आज विदर्भात फार मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा इशारा १९१८ साली त्यांच्या एका पुस्तकात दिला होता. १९१८ साली

Scanned by CamScanner

त्यांनी 'इंडियन इकॉनॉमिक सोसायटी' च्या जर्नलमध्ये (खंड १) 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया ॲण्ड देअर रेमडीज' असा प्रदीर्घ शोधनिबंध लिहिला होता. (खंड १, पृ. ४५३ ते ४७१) त्यात भारतीय शेतीचे आकारमान लहान आहे. कुटुंबात मुलांची संख्या जास्त असल्याचे भाऊ हिस्से वाढत जातात. तसे जमिनीचे तुकडे वाढतात. पहिणामी शेती परवडत नाही, असा मुद्दा मांडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, हे तुकडे एकत्र करणे (तुकडे बंदी) हा त्यावर उपाय असला तरी एकमात्र उपाय नाही. मुळात शेती एकटी कधीच, कुठेही परवडत नसते. जोवर शेतकरी शेतीवरील बोजा काही मुलांना दुसऱ्या क्षेत्रात पाठवित नाही तोवर शेती किफायतशीर होणारच नाही. शेतकऱ्यांच्या मुलांनी उद्योग, व्यापार, स्वयंरोजगार, शिक्षण अशा अन्य क्षेत्रात गेले पाहिजे. अन्यथा, त्यांना हलाखीचे दिवस आल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा ते ९३ वर्षापूर्वी देत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे द्रष्टेपण १९१८ साली आपल्याला कळले नाही. जातीय मानसिकतेमुळे अनेक शेतकऱ्यांना आजही बाबासाहेब जवळचे वाटत नाहीत. आम्हीही बाबासाहेबांच्या या योगदानाची फारशी चर्चा केलेली नाही.

### संदर्भ सूची


१) आत्मभान - जुलै-सप्टेंबर २०११-१२

२) भागवत विष्णू, जागतिकरण नवीन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६

३) डॉ. आंबेडकर भीमराव रामजी, भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, २००६

४) आंबेडकरवार - राजेंद्र काटकर, २००९

५) प्रा. रा.ना. घाटोळे, भारतीय समाज व्यवस्था.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - भारतीय संविधान, मिलींद प्रकाशन, वर्धा

७) परदेशी प्रतिमा - डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती, सावित्रीबाई फुले प्रकाशन, पुणे



Stree Shikshan Parsarak Mandal

MAHILA MAHAVIDYALAYA

152, Nandanvan, Near Sangam Talkies,, Nagpur- 400 009
College Phone No. (0712) 2744935,2744579



Admission open for

Jr. college
- Arts, Commerce & Science(with IT)

Arts Faculty

B.A (Subject offered)
- English - Marathi - History Sociology - Political science
- Home Economics - Public Administration - Marathi Literature
- English Literature - Economics

Home Science Faculty

Cosmetic Technology- B.Tech
(IV Years Degree Course)

EMPLOYABILITY ASSURED

Master Of Arts (M.A)
- Economics - Home-Economics
- Marathi - Political Science - English

YCMOU

B.A., B.Com, M.B.A.

Career Oriented Programmes

(UGC Sponsored )

25% Students employed in all COP's

- Business Communication
- Livelihood Skills - Micro- finance
- Herbal Products - Pharmaceutical Marketing
- Vermi Composite - Therapeutic Nutrition
- Tally Accounting - Banking & Finance
- Insurance with Networking - Writing for Media
- Translation - Outfit Manufacturing
- Naturopathy & yoga - Travels & Tourism
- Art of Acting

Facilities Available
- Hostel Facility - Gyam Facility available
- Day care center - UPSC/ MPSC Classes
- Computer Training - CCC Course

Mahila Mahavidyalaya


Scanned by CamScanner



Bhushan P. Bhongale
Navapratibha Ju. College,
Sakkardara, Nagpur.

# DR. B. R. AMBEDKAR'S ECONOMIC THOUGHT

Dr. B. R. Ambedkar was not a mere economist as such. He was a visionary statesman architect of Indian Constitution, As a leader schoar and actionist of the depressed classes known as untouchables or Dalits. B. R. Ambedkar on the Indian socio-political scene in the early 1920 and remained in the forefront at all social, economic, political and religious efforts for uplift of the lowest stratum of Indian society. In him mingled a great scholar, an economist, a sociologist a legal luminary an educationist, journalist parliamentarian and above all social reformer and champion of human rights as well as a dynamic thinker heralding a new thinking in the direction of bringing about an egalitarian society based on equality and social justice.

Ambedkar's economic philosophy is expressed in his ideas on mixed economy, socialism, state ownership of industries, industrialization and others. He belongs to group of liberal thinkers but by and large his orientation is that of a socialist. It would not be wrong to describe him as a follower of Keynesian economic school. His economic ideas reflected his concern for the downtrodden and his penchant for their development and upliftment in the scoial ladder. In order to eradicate explanation by landlords and capitalist he advised mixed economy or state socialism. The reserve bank of India formed in 1934 was based on the ideas that Ambedkar presented to the Hilton Young Commission. Amartya Sen himself voices forth that Ambedkar is a true celebrated champion of the underprivileged. He deserves more than what he has achieved to day. His contribution in the field of economics is marvelous and will be remembered forever.

**Land Reform** - Ambedkar's main concerns was were the nature of land holdings, especially their fragmentation and divison into unproductive and economically in vibal structure. According to him consideration may eliminate the evils of scattered holding but not the evils of small holdings unless the consolidated holding was an economic holdings. Amberkar criticised the existing definition of economic holding which was defined from the point of view of consumption rather than that of production. So he remarked "any definition therefore that leans on consumption mistakes the nature of an economic holding which is essentially an enterprise in production. What is more important for the purpose of production is the process of combining the factors of production. According to Ambedkar the basic problem of Indian Agriculture was that, it was unable to generate surplus which ultimately led to scarcity of capital. This resulted in the inefficient use of resources. Surplus labour and superfluous employment which by raising the cost of production culminated in low agricultural productivity.

Thus the process of overall economic growth get adversely affected. Ambedkar was of opinion that the process of consideration of holding could eradicate the ill effect of uneconomic holding and usher in the prepress of the cultivators. He favoured

Scanned by CamScanner

successful growth industrialization and described that how agriculture is improved by the reflex effect of industrialization Ambedkar stated "Industrialization facilitates consideration. It is a barrier against future subdivision and consolidation.

**Labour Problems :** Ambedkar supported trade union movement and right to strike against capitalism. He wanted participation of labourers in industrial management. He paid attention to joint councils employment exchanges and earned leave for permanent workers, welfare activities. Conciliation, trade disputes. According to him industrial peace would prevail if it is based on social justice. He introduced 5% to 6% reservation for schedule castes in central govt. He helped the untouchable students wishing to take technical education in foreign countires. Ambedkar, while discussing the labour problem, and in his mind not only industrial labour employer's liability, workmen's compensation, health insurance including invalidity pension should be open to all sort of labour whether it was industrial labour or agricultural labour.

**Monetary System :** Dr. B. R. Ambedkar contribution to monetary economics especially Indian currency system is evident "The problems of rupee" its origin and solution (1923) and his evidence before the 'Hilton Young Commission" which show his freightless. 8 years before the establishment of the R.B.I. Ambedkar elucidated credit supply and reconstructions on it. In his book he offers and excellent exposition of Indian currency both as a medium of exchange and equality in terms of gold and silver. He focuses attention on the currency crisis i.e. pure gold standard. The peculiarity of Dr. Ambedkar was that studying there complicated problems and he wrote a research thesis on it. He tried to search out why the purchasing power of Indian Rupee was failing crossing Swords with Keynes he argued that gold exchange standard dashed have stability. The developing countries like India can not offered it, besides it is a two edged weapon resulting in unlimited risk of unbridled inflation and price-ri unbridled growth of currency, governments defic and automatic molestration should be regulated Money in transactions should have a circular flow Then only prices would remain constant and th economy would be sound. He suggested that mor attention should be given to price stability tha exchange rate stability. DR. Ambedkar showed wit statistics than Indian Rupee has lost its purity wit gold hence its purchasing power is failing. Thoug the context and setup of Indian economy ha changed the essential message of Dr. Ambedka remained surprisingly the same and times less. H opined that international exchange rate will not b equated with the internal price level in the country.

**Decentralization of Imperial Finance :** D Ambedkar's thesis the evaluation of provinci finance in British India dealt with the history of publ finance. Dr. Ambedkar demonstrates ho centralization of govt. finances which prevailed India during 1833 through 1971 was a failure o account of faulty fiscal system marked by injuriou taxes and unproductive of extravagant expenditur The system of imperial finance was started in India i 1833. It became so elaborated not in 1858 when th crown took over from the East India Company that n province had any separate power for legalising an separate financial resources. The imperial govt. wa responsible in law but did not administer the countr whereas the provincial govts. administered th country but had not the responsibility in law. Under this system budgets were prepared by the provincial govt. but the responsibility for the findings the ways and means for financing them rested on the govt. of India. There was no practically no power of creating or modifying any appointments in service. The restriction involved provided the government of India with an opportunity to interfere with all the details of provincial administration. This led to

Scanned by CamScanner

extravagant demands and since the govt. of India did not possess the necessary machinery to appraise the demands and to control the expenditure, it often had to yield. Government finances came under severe strain and it was realised that the provincial government must draw up their own revenue and expenditure budgets. Accordingly the regime of provincial budgets came into force in 1871. Provincial finance was introduced in the form of budget by assignment during 1871-72 through 1876-77. Under this scheme financial responsibilities of certain departments of administration were delegated to the provinces and the receipts accruing from the imperial from those services were handed over to them with fixed lump-sum assignment from the treasury. According to Ambedkar this scheme led to high taxes and made taxation more iniquitous.

**Conclusion :** Ambedkar was primarily an economist his achievement in the field was primarily overshadowed by his achievements in his field of politics. His political ideas had moral purpose. He was more concerned about the human welfare. He had unflinching faith in socialism and believed that it would solve the problems of the under privileged. Mixed economy was the corner stone of his philosophy. Ambedkar also linked salvation and emancipation of untouchable people with the emergence of modern urbanised and industrialised India with modern liberal ideology.

**References :**


1) The Indian economic Journal December 2013, O. M. Prakash Ram, Satya Rana Singh and Shiv Shankar

2) The Indian Economic Journal December 2013 Ashim K. Karmarkar

3) The Indian Economic Journal December - 2013, Mohd. Salahuddin Ashan



विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर

८ वे चर्चासत्र २०१४ ला

# टेकाम परिवारा

# तर्फे

# चर्चा सत्रास

# हार्दिक शुभेच्छा !


Scanned by CamScanner

Glaris Raju K.J
Hislop College, Civil Line,
Nagpur

# SOCIAL SECTOR: DEVELOPMENT IN HEALTH AND EDUCATION AFTER THE ECONOMIC REFORMS IN RURAL AND URBAN AREAS



**ABSTRACT** - Social sector i.e. social infrastructure which consists of Education, Health and Medical Care, Housing and Water Supply is very essential for the economic development of any Country. The introduction of Economic reforms has changed the social set-up of Indian economy and integrated it with rest of the world. This paper, through literature search identifies the scenario of social sector (especially Education and Health) in India and development after the economic reforms.

Key words: Economic reforms 1991, Development, Education, Health, Infrastructure.

**INTRODUCTION** - The Indian economy has undergone substantial changes since the introduction of economic reforms in 1991. These reforms were a comprehensive effort consisting of three main components namely, liberalisation, privatisation and globalisation. They included various measures like deregulating the markets and encouraging private participation; trade liberalisation; dismantling the restrictions on domestic and foreign investments; reforming the financial sector and the tax system, etc. All such policy initiatives radically changed the economic set-up of the country and integrated it with the rest of the world. We can see tremendous changes over these years in this sector. Thus, India was placed in a globally competitive position so as to fully utilise its potentials and opportunities for rapid growth of the economy.

Social sector comprising of sub-sectors like Education, Health and Medical Care, Housing and Water Supply is very essential for the economic development of any Country. The Government plays a very significant part in the development of the Social Sector.

**OBJECTIVES OF THE STUDY** - The objectives of this paper are to assess the performance in the social sector viz., Education and Health.

**SOURCES OF DATA** - Present study is of theoretical nature and makes use of secondary data. To get the relevant secondary information various books and websites were considered.

## REVIEW OF LITERATURE

### Social Sector Development in Health and Education

In economic terms, educated and healthy people build a healthy nation with a healthy growth rate. Yet social sector in India does not receive the importance it should.

**History** - In over fifty years since independence, India has developed an extensive public delivery system for the provision of health care. This was preceded in 1946 by the Bhore Commission that recommended basic health services be provided for all through Primary Health Centres (PHCs). In line with the recommendations, PHCs were set up all across the country, each serving about 30,000

Scanned by CamScanner

inhabitants. At the time, the urban population of India was less than 18 per cent. Since then, the urban population has grown over fourfold.

As in the case of health services, provision of education for all in India has also largely been envisaged within the public delivery system even though this sector has a significant presence of private providers. Since independence the government has launched various schemes and programmes for increasing literacy among all sections of the population, the Sarva Shiksha Abhiyan and the Right to Education Bill are the two seminal steps in this direction. Recently there has been a growing demand for privatization and growth in the number of private institutions. This phenomenon is more strongly visible in the urban areas where there is a greater proportion of literate population as well. As per the latest Census of India (2011), 80 per cent of the urban population is literate as opposed to 59 per cent in the rural areas.

India's social indicators at the start of the reforms in 1991 lagged behind the levels achieved in southeast Asia 20 years earlier, when those countries started to grow rapidly.

For example, India's adult literacy rate in 1991 was 52 percent, compared with 57 percent in Indonesia and 79 percent in Thailand in 1971.

The gap in social development needed to be closed, not only to improve the welfare of the poor and increase their income earning capacity, but also to create the preconditions for rapid economic growth. While the logic of economic reforms required a withdrawal of the state from areas in which the private sector could do the job just as well, if not better, it also required an expansion of public sector support for social sector development.

**ANNUAL REPORTS: Ministry of Finance (2011-12, 2013-14)**

The focus of development planning in India over the years has been on issues related to human development and inclusive development with emphasis on poverty alleviation, employment generation, education, health and skill development. To achieve inclusive development, sector-specific priorities of the Government are reflected in terms of continued higher budgetary allocation in areas like rural development, education, medical and public health, family welfare, water supply and sanitation, housing, urban development, etc. The Central government expenditure on social services and rural development has gone up consistently over the years. The share of Central Government expenditure on social services including rural development in total expenditure (Plan and Non-Plan) has increased from 13.75 per cent in 2005-2006 to 18.47 per cent in 2011-2012. Similarly, the expenditure on social services by the General Government (Centre and States combined) has also shown increase in recent years reflecting higher priority to social services. The expenditure on social services as proportion of total expenditure has increased from 21.6 per cent in 2006-2007 to 25 per cent in 2011-2012.

**सामाजिक क्षेत्र :-** सामाजिक क्षेत्राच्या विकासाकरीता शिक्षण आरोग्य, इत्यादीवर खर्च,वाढविणे आवश्यक आहे याव्दारे लोकांच्या क्षमता त्याचे हक्क वाढण्यास मदत होतील, वास्तविक पहाता जनसामान्यांची क्षमता हीच संपती निर्मीतीची प्रभावी यंत्रणा होय. सामान्याचे हात बळकट केले तर त्याचा केवळ परिश्रमातून विस्मयजनक विकास शक्य होतो वाढीव अर्थसाह्याच्या वाटण्याने प्रश्न सुटत नाही. अमेरीकेसारख्या व इंग्लंड सारख्या देशांनी प्रगती केली आहे. त्याकरीता त्यांना सामाजिक क्षेत्राच्या विकासाकरीता प्रयत्नांचे पाठबळ होते. सध्याच्या आर्थिक सुधारणांची अभिमुखता वरील दृष्टीने बदलून त्या सुधारण्याचा तिसरा टप्पा जोमाने कार्यवाहित आणावयास हवा. राज्यघटनेने आपण स्वातंत्र्याची ग्वाही दिलेली आहे. ते स्वातंत्र्य केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्षात सर्वांना सामाजिक संधीची लोकव्यवहारातील पारदर्शकतेच्या हमीची आणि सामाजिक सुरक्षेची निश्चितता या सर्व गोष्टी सर्वांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

आर्थिक सुधारणांचा तिसरा टप्पा नाणे बाजार, भांडवल बाजार, इस्टेट बाजार, श्रम बाजार, यावर भर देण्यात येत आहे. यामध्ये गरीबांच्या क्षमतांचा विकास साधणाऱ्या सार्वजनिक धोरणांचाही समावेश केला आता देशाच्या सामाजिक व राजकीय जीवनात वंचितांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारणातून सामाजिक न्याय स्थैर्य यांची हमी मिळाली पाहीजे.

ग्रामीण जनतेला सध्या उपल्ब्ध असलेल्या आर्थिक संधी अद्याप अत्यंत मर्यादित आहे. देशाच्या मागास भागातील रस्ते पाणी पुरवठा, वीज, इत्यादी पायाभूत सोयी सुधारल्यास त्याचा लाभ ग्रामीण भागात राहणाऱ्यांना होतील. सर्वात म्हणजे आर्थिक सुधारणेनंतर देशाच्या विकासाचा वेग वाढत आहे. परंतु त्याची फळे मात्र नागरीक्षेत्रातील लोकांना जास्त मिळतांना दिसतात. सुधारणेचा लाभ ग्रामीण जनतेलाही होत आहे परंतु त्याचे प्रमाण अल्प आहे. म्हणून आर्थिक सुधारणेत ग्रामिण रोजगार निर्मीती क्षमतेवर भर देणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**


१) भारतीय अर्थव्यवस्था - मिश्रा पूरी

२) महाराष्ट्र -२०१२ - तुकाराम जाधव

३) भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल - प्रा. शरद शंकर जोशी

४) वैश्वीकरण व भारतीय अर्थव्यवस्था - मानचंद खंडवे.



चर्चा सत्र- २०१४ ला आमच्या शुभेच्छा



श्री. मनेस छबिलदास गांधी

किराणा व बिल्डींग मटेरियल सप्लायर्स

चामोर्शी, जि.गडचिरोली.

मनेस गांधी पेट्रो सर्वो

(पेट्रोल, डिझेलसाठी २४ तास सेवा)

फोन नं. ०७१३५-२३५८६१

चर्चा सत्र- २०१४ ला आमच्या शुभेच्छा



जयवंत किसन आदमने

मानेवाडा रोड, नागपूर





Scanned by CamScanner



प्रा. राजाभाऊ दुरगकर
नवप्रतिभा कनिष्ठ महा.
सक्करदरा, नागपूर

# आर्थिक सुधारणा व ग्रामीण नागरीक क्षेत्रातील आर्थिक व सामाजिक परिवर्तन

**प्रस्तावना :-** ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासाबाबत पूर्वीपेक्षा सद्यःपरिस्थितीत चांगल्याप्रकारे जागरूकता येत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे ग्रामविकासामध्ये गावातील लोकांच्या सहभागास प्राधान्य दिले गेले आहे. राज्य केंद्रीत विकासामध्ये शासनाने विकास करणे हे कर्तव्य समजले जात असे. गावातील लोक आपल्या गावाच्या विकासाबाबत शासनाला जबाबदार धरत. परंतु सद्यःपरिस्थितीमध्ये गावाच्या विकासात गावातील लोकांनी जबाबदार राहिले पाहिजे ही भूमिका वाढत आहे. त्याचाच परिणाम म्हणून ग्राम स्वच्छता अभियान, निर्मल ग्राम, जलस्वराज्य इ. विकास कार्यक्रमामध्ये लोकांच्या सहभागास महत्व दिले आहे. केंद्रसरकारच्या भूमी आणी संसाधन विभागामार्फत पाणलोट व्यवस्थापण कार्यक्रम राबविला जात आहे. हा कार्यक्रम पूर्णतः लोकसहभागावर आधारीत कार्यक्रम आहे.

**परंपरागत विचार प्रक्रिया :-** भारतामध्ये सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग घेण्यास सुरूवात केव्हा झाली किंवा समाजातील कोणते घटक सार्वजनिक निर्णयामध्ये सहभागी होत होते. हे तपासल्यास प्राचीन मध्ययुगीन काळी गावातील लोक आपल्या गावा संदर्भात सार्वजनिक निर्णय घेत व त्यामध्ये लोक सहभागी असलेले दिसतात भारतामध्ये सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत खऱ्या अर्थाने लोक सहभागी होत असलेले दिसतात. ते आधुनिक काळामध्ये ब्रिटिशांच्या काळात भारतामध्ये आधुनिकीकरणाची प्रक्रिया आरंभ झाली. या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे इतर राजकीय मूल्यांच्या तुलनेत स्वातंत्र्य या मूल्याचे महत्व उच्च शिक्षणामुळे वाढलेले दिसून येते. पाश्चात्य देशामध्ये आधुनिक काळात मोठयाप्रमाणात जे वैचारिक मंथन झाले त्यामधून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही राजकीय मुद्दे पूढे आली. शासनाच्या परिभाषेत बोलायचे तर हा काळ अभिजात उदारमतवाद होता. याचा परिणाम भारतीय ग्रामीण जीवनमानावर होण्यास सुरूवात झाली. व या परिणामामुळे ग्रामीण जीवन विकास होण्यास आरंभ झाला. अभिजात उदारमतवादामध्ये राज्याने व्यक्तीच्या जीवनात हस्तक्षेप न करणे व व्यक्तीस मुक्त आर्थिक स्वातंत्र्य देणे यावर भर दिला. या काळात लोकांचा विकास करण्यास राज्यसंस्था व बाजारपेठ यांना स्वातंत्र्यता देण्याच्या विचारावर भर देण्यास सुरूवात करण्यात आली. मानवाच्या इतिहासामध्ये प्रथमतः लोकांचे कल्याण व विकास करण्यावर सर्वाधिक भर दिला आहे. या काळात ग्रामीण व नागरी लोकांचा विकास करण्याची जबाबदारी राज्यसंस्थेकडे होती. राज्यसंस्था आपले प्रशासकीय कार्य व लोकांचा विकास करण्याकरिता कल्याणकारी राज्याची स्थापना करण्यास आरंभ झाला.

**विकास संकल्पना व बदल :-** विकास या संकल्पनाची चर्चा ही तिसऱ्या जगातील देशामुळे सुरू झाली. तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे जे प्रश्न होते ते प्रामुख्याने आर्थिक घटकांशी निगडीत होते. विशेषतः व आजही ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधांचा अभाव, दरिद्रय, उपासमार, कुपोषण इत्यादीमुळे सुरूवातीच्या काळात विकास संकल्पना आर्थिक विकासाशी जोडले गेले. विकास साधणे म्हणजे आर्थिक विकासावर भर देणे. होय यात औद्योगिकरण मोठे सिंचन प्रकल्प विकासाच्या विविध योजना या आधारावर ग्रामीण क्षेत्र व नागरीक्षेत्र यांचा विकास निश्चित करण्याचे ठरविले. बदललेल्या विकासाच्या संकल्पनेमध्ये लोकसहभागाला प्राधान्य देण्यात येते. स्थानीक पातळीवरील समस्या सर्वच सारख्या नसतात. समस्येचे स्वरूप गावानुसार बदलते त्यामुळे असे प्रश्न व समस्या सोडविण्याकरिता गावपातळीवर नियोजन करणे आवश्यक असते. गावातील लोकांना गावातील परंपरा, गावातील लोकांचा स्वभाव गावातील



Scanned by CamScanner

प्रश्नाची तिव्रता यांची माहिती असते. यामुळे गावातील प्रश्न व समस्या सोडविण्याकरिता बाहेरून आखलेल्या योजना परिणामकारक ठरत नाही. या करिता ग्रामीण नियोजन होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण क्षेत्रात होणाऱ्या विकास योजनामधील निर्णय प्रक्रियेत लोकांना सहभागी करून घेणे आवश्यक असते. लोकसहभागीय विकासामध्ये गावातील लोकांच्या मतांना प्राधान्य दिले जावे. गावामध्ये ग्राम सभा घेतली जाते. व याद्वारे विविध प्रश्नांची सोडवणूक केली जाते. लोकसहभागीय विकास आकृतीसबंधाने पाश्चात्य धर्तीवरील प्रारूप स्वीकारून खऱ्या अर्थाने शाश्वत विकास होणार नाही तर त्याकरिता आपली सामाजिक राजकीय आर्थिक विषम परिस्थितीचा विचार करूनच योग्य प्रारूप रांबविणे आवश्यक ठरेल.

**आर्थिक सुधारणा व ग्रामीण, आर्थिक, सामाजिक स्थिती :-** आतंरराष्ट्रीय वित्त संस्थानी आखून दिलेल्या ज्या आर्थिक सुधारणा भारतात १९९१ पासून व त्या आधी लॅटीन अमेरीका व आफ्रीका खंडातील अन्य देशात कार्यवाहित आणल्या गेल्या त्या अर्थशास्त्राच्या सिध्दांताच्या भक्कम पायावर उभ्या आहेत. आर्थिक सुधारणातून स्पर्धात्मक मुक्त अर्थव्यवस्था अस्तित्वात येते. व अशा अर्थव्यवस्थेतूनच साधन संपत्तीचा सुयोग्य व सक्षम उपयोग होतो. उपभोक्त्याच्या मागणीनुसार वस्तू व सेवाचे उत्पादन व पूरवठा होतो. कार्यक्षम उद्योग नफा कमावतात व वाढवितात असे जरी असले तरी आर्थिक सुधारणेनंतर ग्रामीण शहरी आर्थिक व सामाजिक विषमता वाढतांना दिसत आहे. २० टक्के पेक्षाही कमी लाभ आर्थिक सुधारणेनंतर ग्रामीण भागात प्राप्त झाला हे विविध अहवाल व लेखनातून स्पष्ट होते. जागतिकीकरण प्रक्रियेने गरिबांवर प्रमाणाबाहेर वित्तीय बोझा टाकला आहे. विकासाचे फायदे सुशिक्षित शहरी मोजक्या लोकांपुरतेच मर्यादित आहे. परिणामतः आर्थिक विषमता वाढली आहे. जागतिकीकरण यशस्वी व्हायचे असेल तर दक्षिण आशियातील बहूसंख्य लोकांच्या हिताचे रक्षण करणारी सक्रीय सरकारे हवीत. याच संदर्भात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा बोझा कमी करून आर्थिक लाभ वाढवायचे असतील तर त्या संपूर्ण प्रक्रियाविषयी पूर्नविचार करण्याचे आवाहन करणे गरजेचे आहे.

१९८०-९० च्या दशकामधील कृषीक्षेत्रात झालेल्या हरित क्रांतीमूळे वाढलेली कृषी उत्पादकता नंतरच्या काळात लोकसंख्या वाढ. ऱ्हासमान संसाधन पाया, वाढता पर्यावरण खर्च आणि उदासीन धोरणे इत्यादीमुळे टिकविता आली नाही. गरिबीचे स्त्रियींकरण (फेमिनायझेशन) झाले आहे. रोजगार पूरूषांना मिळतो. आणि गरिबी स्त्रियांच्या वाट्याला येते. ग्रामीण श्रमबळातील वृध्दीच्या तुलनेत कृषी क्षेत्रात रोजगार वाढीचे प्रमाण मंद राहिले आहे. कृषीशिवाय अर्थव्यवस्था कृषीक्षेत्रातून जास्त श्रमिकांना स्वताःमध्ये समाकून घेऊ शकली नाही. श्रमिकांची उत्पादकता वाढ कुंठीत झाली आहे. १९९०-९१ च्या काळात भारत. बांगला देश यासारख्या देशामध्ये शेतजमिनीत वाढ झाली नाही. पण लोकसंख्या वाढत राहिली परिणामतः लोकसंख्येचा लागवड योग्य जमिनीवरील दबाव वाढला. देशामधील ग्रामीण विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे हे गरिबांचे उन्नयन आणि समृध्द जीवन यांनी न ठरता बदलत्या राजकीय हितसंबाधानुरूप ठरत आली. त्यामुळे कमी प्रमाणात व अ[illegible] सार्वजनिक खर्च सुध्दा चुकीच्या दिशेने केले गेले.

**ग्रामीण पतपुरवठा :-** ग्रामीण विकासामध्ये सुदृढ ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेचे अनन्य साधारण महत्व आहे. स्वातंत्र्यानंतर उद्योग व सेवा क्षेत्रात वाढ झाली असली तरी ग्रामीण क्षेत्रातील बहुसंख्य लोक आपला उदरनिर्वाह शेतीवर करतात. म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे लक्ष पूरविणे आवश्यक आहे. मागील वर्षात ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेकडे राष्ट्रीय व राज्यपातळीवर लक्ष केद्रींत करण्यात आले आहे. १९५४ साली रिझर्व्ह बँकेद्वारा ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समितीने दिलेल्या अहवाला नुसार ग्रामीण पतपूरवठयाच्या तीन टक्के भाग अधिकोषणा मार्फत दिला जातो तर उर्वरित कर्ज खाजगी बँक/सावकार व दलाल यांचेकडून पुरवीला जातो. [illegible] जागतिकीकरणानंतर व आर्थिक सुधारणेच्या दुसऱ्या टप्प्यात शेतीला कर्जपुरवठा सुलभ व्हावा, व शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दरावर दीर्घ मुदती करीता कर्ज देण्याकरिता किसान कार्ड, पिकांचा विमा, नगद पिकासांठी विशेष ऋण योजना यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय संग्रहणाच्या सोयी वातानुकूलीत संग्रहण गृहे, कृषी मालाचे विपणन इत्यादी मध्ये वाढ घडून आणण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे.

भारतीय कृषीमालाची विदेशी कृषी मालासोबत स्पर्धा दिवसें दिवस वाढत आहे. आशिया खंडातील सर्वच देश भारतीय कृ[illegible]



Scanned by CamScanner

मालासोबत स्पर्धेत उतरत आहे. दक्षिण आशियाई देशातील स्पर्धा दिवसें दिवस वाढत आहे. भारतातील फळफळावळे, आंबा, बासमती, गहू, साखर या कृषी मालाला मोठया स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. एकेकाळी हापूस आंबा व बासमती यांची विदेशी बाजारपेठेत मक्तेदारी होती ती आज जवळपास संपुष्टात आली आहे. आर्थिक सुधारणेनंतर विदेशी व्यापार अधिक सुलभ झाला व त्यांचा लाभ जगातील लहान राष्ट्रे की जे कृषी आधारीत व्यवसायावर निर्भर आहे. त्यांनी कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणल्यामुळे त्याचा परिणाम भारतीय कृषी निर्यात वस्तूवर झाला. व पर्यायाने त्याचे परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेले दिसत आहे. आर्थिक सुधारणा व ग्रामीण नागरी क्षेत्र आर्थिक सुधारणेनंतर समतोल विकास साध्य करण्याचे उद्दिष्टे व त्यासाठीचे प्रयत्न पंचवार्षिक योजनांच्या माध्यामातून करण्याचे निश्चित करण्यात आले. केंद्र सरकार व राज्यसरकारे आर्थिक सुधारणाचा लाभ सर्वांना प्राप्त व्हावा याकरिता वेगवेगळ्या योजना जाहीर करण्यात आल्या. आर्थिक पूर्नरचना कार्यक्रमाबाबत आपल्या देशातील काही समाजस्तर आणि त्या स्तरातील काही विशिष्ट समाज समूह वगळता सर्व साधारण पणे एक नकारात्मक नापसंतीचा अपेक्षाभगांचा सूर ऐकायला येतो. आर्थिक सुधारण्याच्या आजवरच्या फलीतांचे असमान वाटप होय. परंतू असे होण्यामागे कोणती कारणे होती व आहे याचा विचार करावा लागेल. आर्थिक सुधारणा या संकल्पनेचा खासगीकरण हाच व्यवहारातील अर्थ आहे. याशिवाय खाजगी कारण म्हणजे, अर्थकारणाच्या सर्व अंगामधून सरकारने बाहेर पडणे होय. स्वातंत्र्यानंतर जवळपास १९८० पर्यन्त भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दरसाल सरासरी दर साडेतीन ते साडेचार टक्क्याच्या जवळपास होता. आर्थिक पूर्नरचनेनंतर तो सुधारणेच्या पहिल्या टप्पयात ६ टक्के पेक्षा जास्त वाढला २००७-०८ मध्ये, या तीन वर्षात हा ९.७ टक्के पेक्षाही पूढे गेला. आर्थिक उदारीकरणाच्या गेल्या दोन दशकी वाटचाली दरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेसमोर जी आव्हाने उभी राहिली ती आजही महत्वाची आहे. देशाच्या ग्रामीण तसेच शहरी विभागात दरिद्रय रेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणात आपल्याला घट झालेली दिसून येत असली तरीही उत्पन्न, मालमत्ता आणि रोजगार संधी यांच्या उपलब्धते संदर्भातील विषमतेमध्ये आपल्या देशात गेल्या २० वर्षाच्या दरम्यान वाढ घडून आलेली आहे. शहरी विरूद्ध ग्रामीण उदारीकरणाचा लाभ मिळालेली राज्ये आणि उदारीकरणाच्या लाभापासून वंचित राहिलेली राज्ये, संघटीत विरूध्द असंघटीत, मोसमी पिक घेणारे शेतकरी आणि बाजारपेठेतील बदलाच्या कालानुसार पिकपध्दतीमध्ये अनुरूप बदल घडून आणणारे शेतकरी अशा विविध पातळयांवर ही विषमता वाढली आहे. हे केवळ भारतातच घडलेले आहे, असेही समजण्याचे कारण नाही. संपूर्ण जगामध्ये ज्या ज्या अर्थव्यवस्थेमध्ये समाजवादी विचारसरणी प्रधान नियोजित, नियंत्रित अर्थव्यवस्थेकडून खुल्या आणि बाजारपेठ अर्थव्यवस्थेकडे झुकलेले संक्रमण घडवून आले अशा सर्व देशामध्ये विषमता वाढतच गेलेली दिसून येते.

**आर्थिक सुधारणा :-** आर्थिक सुधारणा या प्रक्रिये संदर्भात व्यापक स्तरावर जनप्रबोधन करण्याच्या मागील २० वर्षात कोणतेही प्रयत्न केल्या गेले नाही. उदारीकरणाला प्रारंभ झाल्यानंतर अंश बाजारातील घोटाळे, सरकारी कपंन्यामधील निर्गुतंवणूकी दरम्यान उद्‌भवलेले गैरव्यवहार, विजेचे वाटप व वितरण व्यवस्थेमध्ये खासगीकरण घडून आणण्याच्या प्रयत्नामधील अनियमितता, स्पेक्ट्रम घोटाळा हे सर्व घडून आले. आर्थिक सुधारणा म्हणजे घोटाळयांची मालिका अशा प्रकारचे समीकरण ग्रामीण नागरी जनतेच्या मनात पक्के झाले. याचा परिणाम असा झाला की, आर्थिक बदलांना निकोप, वस्तूनिष्ठ प्रतिसाद, सामान्य स्तरातील घटकाकडून मिळणे दूरापास्त झाले. सुधारणेच्या व पूनर्रचनेच्या कोणत्याही नवीन प्रस्तावाकडे जनसामान्यांनी संशयाने बघायला सुरूवात केली. देशात आर्थिक विषमता गेल्या २० वर्षात वाढ घडून आली. सुधारणांच्या लाभापासून वंचित राहिलेल्या घटकांच्या मनात उपेक्षाच नशिबी आली. आर्थिक पूनर्रचना म्हणजे काय ? त्या का आवश्यक आहे. त्याचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ कोणते? त्यातून होणाऱ्या फेरबदलापासून कोणत्या अपेक्षा ठेवाव्यात आणि कोणत्या ठेवू नयेत अशा अनेक बाबतीत व्यापक स्तरावर जनप्रबोधन करणारे एकही तटस्थ व्यासपीठ आपल्या देशात गेल्या २० वर्षात स्थापन व सक्रिय झालेले नाही.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाबाबत आपल्या देशातील काही समाजस्तर आणि त्या स्तरातील काही विशिष्ट समाज समूह वगळता सर्वसाधारणपणे, एक नकारात्मक नापसंतीचा तसेच अपेक्षाभंगाचा सूर ऐकावयास येतो. आर्थिक सुधारणाच्या आजवरच्या फलिताचे असमान वाटप हा त्या नाराजी मागील



Scanned by CamScanner

मुख्य मुद्दा होय. कारण ग्रामीण अर्थव्यवस्थेत आर्थिक सुधारणांचा परिणाम अल्प झाला पंरतू शहरी व महानगरातील राहणाऱ्या लोकांची क्रीयाशक्ती वाढली. श्रीमंत वाढीचा दर वेगाने वाढला पंरतू विषमता कमी होण्याचा दर टप्प्याटप्प्याने कमी होत आहे. गरिबाचे प्रमाण घटले पंरतू ते पूर्णतः संपलेले नाही. ग्रामीण व नागरी या भागात सुधारणांचे परिणामही विषमतेच्या स्वरूपात दिसत आहे. ग्रामीण क्षेत्रातील बहुसंख्येने नागरीक मोठया शहराकडे धाव घेत आहे. श्रमिकांचे मोठया प्रमाणात स्थलांतर घडून येताना दिसते. तर नागरी क्षेत्रातील व महानगरातील नागरिक विदेशातील दूतावासा समोर परदेशात जाण्याकरिता (VISA) परवानगी मागत आहेत. एकीकडे बेकारीचे दृश्य तर दूसरीकडे ग्रामीण शेतीत पाहिजे तेव्हा (On Demand) काम करण्यास श्रमिक मिळत नाही. अशी द्विधा अवस्था व विचार करायला लावणारी स्थिती देशात दिसत आहेत. हे आर्थिक सुधारणेचे परिणाम दिसून येत आहेत. जागतिकीकरणानंतर संतूलीत विकास, ग्रामीण समुध्दता नागरी क्षेत्रातील सोयी व सूविधामध्ये वाढ व सर्व जनसामान्यांचा विकासाचा दिलासा अशीच पार्श्वभूमी ठेऊन आर्थिक सुधारणा कार्यक्रम लागू केला गेला.

आर्थिक सुधारणांचा काही सकारात्मक प्रभाव ग्रामीण भागात झालेला दिसून येतो. तो म्हणजे विविध व एकेकाळी दुर्मीळ असलेला वस्तूचा पूरवठा होय. शिवाय पॅकबंद डब्यातून होणार वस्तूंचा पूरवठा व नियमित पणे मिळणारी सेवा होय. एकेकाळी Shampoo ही केवळ श्रीमंताची गरज होती पंरतू आज Hindustan Liver Ltd. या कपंनीने आपला व्यवसाय वाढविण्याकरिता किमान किमंतीत पाऊचमध्ये ग्रामीण नागरीकांना Shampoo उपलब्ध करून दिला आहे. अनेक कंपन्या आपले विक्रीचे क्षेत्र शहराऐवजी ग्रामीण क्षेत्राची निवड करीत आहे. आजही ६० टक्के जनता ग्रामीण क्षेत्रात राहात आहे. म्हणजे ६० टक्के बाजार मोठया कंपन्यांना ग्रामीण क्षेत्रात प्राप्त होत आहे. ITC, Macdonald, ACC, L&T, Gillete, MRF, CEAT, या कंपन्या द्वारे ग्रामीण क्षेत्रात एजंन्सी द्वारे व्यवसायाचे बस्तांन बसवितांना दिसत आहे. देशातील महाराष्ट्र, पंजाब, चेन्नई, कर्नाटक या राज्यात मोठया कंपन्यानी ग्रामीण क्षेत्र मोठया प्रमाणावर काबीज केले आहे. यातून खेडयापाडयात मोठया प्रमाणात रोजगार निर्माण झाला आहे. बाराव्या पंचवार्षिक योजने अतंर्गत सर्व खेडी दूरसंदेशवहनने जोडल्या जावी अशी व्यवस्था करण्यात येत आहे. त्याशिवाय देशातील निवडक जिल्हयातील काही खेडयामध्ये Inter-net ची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. दूरचित्रवाहिणीवर ग्रामीण क्षेत्रातील कृषकांना विविध धान्यांचे रोजचे दर, विपणन, संग्रहन, कर्जपूरवठा, मशागत, बि-बियाणे, किटकनाशके यावर आधारित कार्यक्रम दाखविले जात आहे.

नागरीक्षेत्र व महानगर यांचा विकास होत आहे. Metro, Mono Rail, High-over, Hybrid Postal Service, खाजगी व अन्य बँका यांच्यातील वाढ त्याद्वारे होणारा स्पर्धात्मक कर्जपूरवठा वैयक्तिक कर्ज, शाळातील वाढ, महाविद्यालये, खाजगी रूग्णालये व सर्वात अधिक महत्वाचे म्हणजे किफायतशरी किमतींना बाहेरून येणाऱ्या नागरीकांना सुलभ प्राप्त होणार अन्न व अन्य सोयी यामुळे महानगरातील लोक विदेशात जात आहे. अशाप्रकाराने जनतेत मोठया प्रमाणावर स्थलांतर देखील घडून येत आहे.

कधीही नव्हे इतकी संपत्ती २१ व्या शतकात ७ अब्ज लोकांनी निर्माण केली. १९५१ मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न ३५००/- रूपयापेक्षा जास्त नव्हते आज भारताचे दरडोई उत्पन्न ८५,०००/- रूपयापेक्षाही जास्त आहे. देशातील ८४ कोटी लोकांकडे भ्रमणध्वनी आहेत. कैंद्र व राज्य पूरस्कृत विविध योजनेच्या माध्यमातून नजिकच्या काळात सर्व झोपडपट्टीधारकांना व ग्रामीण भागातील लोकांना घरे बांधून देण्याची योजना राबविली जाणार आहे. कृषी व उद्योगाच्या आधूनिकीकरणामुळे सक्षम व प्रशिक्षण धारकांना अल्प वेतनांवर का होईना रोजगार प्राप्त होत आहे. अर्थातच एकूणच साचलेल्या समस्या आपण एका रात्रीतून सोडवू शकणार नाही. त्या टप्याटप्याने सोडविल्या जातील. याकरिता नागरी व ग्रामीण क्षेत्रातील नागरीकांनी सचोटीची भूमिका पार पाडणे आवश्यक आहे.

**सदंर्भ ग्रंथ :-**


१. महाराष्ट्र, वार्षिकी २०१२ संपादक, तुकाराम जाधव
२. जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण - डॉ. पद्माकर दुभाषी
३. समाजवादाच्या पहाटखुणा - डॉ. श्रीनिवास खादेंवाले
४. भारतीय अर्थव्यवस्था - एल.एन. कोली, बृजेश, रावत





Scanned by CamScanner



प्रा. नंदकिशोर एम. मेनेवार
आ.कृ. बोमनवार कनिष्ठ महा.,
चामोर्शी, जि. गडचिरोली

# आर्थिक सुधारणेनंतर भारतातील ग्रामीण व नागरी क्षेत्रातील आर्थिक व सामाजिक परिवर्तन

प्रस्तावना :-

आर्थिक सुधारणा ही अखंड प्रक्रिया आहे. आर्थिक प्रक्रिया सुलभतेने पार पडाव्यात, आंतरराष्ट्रीय पातळीवरचे देवाण-घेवाण व्यवहार, मालमत्ता हस्तांतराचे व्यवहार सुलभ व्हावेत, या दृष्टीने संख्यात्मक, धोरणात्मक अशा स्वरुपाचे करण्यात आलेले बदल म्हणजे आर्थिक सुधारणा होय.

आर्थिक सुधारणेची आवश्यकता या पार्श्वभुमीवर आर्थिक सुधारणा व सामाजिक परिवर्तनाची दिशा जाणून घेणे महत्वाचे आहे. प्रस्तृत शोध निबंध यादृष्टीने करण्यात आलेला एक प्रयत्न म्हणून महत्वाचा ठरतो.

१) **गृहीतके:-**

**प्रस्तुत निबंधाची गृहितके पुढील प्रमाणे आहे.**

१) आर्थिक सुधारणा बाबत सरकारची भुमिका महत्वपूर्ण आहे.

२) आर्थिक सुधारणेतून सामाजिक परिवर्तन संभवतो.

३) नविन आर्थिक सुधारणामुळे ग्रामीण नागरी क्षेत्रातील परिवर्तन होत आहे.

२) **अभ्यासाची उद्दिष्टे:-**

**प्रस्तृत शोध निबंधाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.**

१) इ.स. १९९१ नंतर आर्थिक व सामाजिक स्थित्यंतराची भारतातील दिशा अभ्यासणे.

२) आर्थिक सुधारणेबाबत सरकाचे योगदान अभ्यासणे.

३) आर्थिक सुधारणेबाबत वास्तविकता समजावुन घेणे.

३) **तथ्यसंकलन व संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंध प्रामुख्याने दुय्यम तथ्यावर आधारित आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी आवश्यक माहिती व तथ्ये भारत सरकारने प्रसिध्द केलेल्या साधनांमधून गोळा केलेली आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतात मिश्र अर्थव्यवस्था लागु करण्यात आली. भाडंवलशाहीचे अस्तित्व आणि सोबत सरकारी हस्तक्षेप अशा स्वरुपाची ही मिश्र व्यवस्था होती. शासकीय तसेच खाजगी उद्योगाचे सहअस्तित्व या मिश्र अर्थव्यवस्थेत मान्य करण्यात आले होते. भांडवलशाहीने उत्पादीत करावयाच्या वस्तु तसेच गुंतवणूक याबाबतीत शासनाकडुन परवाना 'यावयाचा होता. याला काही अर्थत-ा 'लायसन्स राज' (License Regime) असे म्हणतात.

नियोजन आयोगाने या लायसन्स राजमध्ये केंद्रीय भूमिका बजावली. पहिल्या सहा पंचवार्षिक योजनामध्ये आदेशात्मक नियोजन राबविण्यात आले. भारतिय अर्थव्यवस्था काहीशी बंदिस्त अर्थव्यवस्था होती. भारतीय रुपया अपरिवर्तनीय होता.परकीय गुतंवणुक व आयातीवर खुप बंधने होती. भारतातील औद्योगिक धोरणे MRTP कायदा अशा नियोजनाचे निदर्शक होते.

१९९१ नंतर उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणात सुरुवात -ाली. पूर्वीची आदेशात्मक पध्दती सोडून सुचकात्मक नियोजन वापरण्यातयेऊ लागले. MRTP कायद्याऐवजी Competition कायदा आला. नवीन औद्योगिक धोरणे जाहीर करण्यात आले. खाजगीकरण स्विकारण्यात आले. व्यापारासाठी बाजारपेठ मुक्त करण्यात आली. परकीय



Scanned by CamScanner

गंतवणुकीसाठी हळुहळु बरेचसे मार्ग खुले करण्यात आले. रुपया चालु खात्यावर पूर्ण परिवर्तनीय करण्यात आला.

एकुण हा मार्ग भारतीय अर्थव्यवस्थेला मुक्त अर्थव्यवस्थेकडे घेवून जात आहे. जागतिक बँकेचा जागतिक विकास अहवाल २०१० (Theme Development &Climate Change) मध्ये भारताचे दरडोई जी. एन. पी. उत्पन्न २००८ मध्ये १०७०डॉलर होते. या वर्गीकरणानुसार भारत कमी मध्यम उत्पन्न अर्थव्यवस्था या गटात मोडतो.

भारतात राष्ट्रीय उत्पन्नातुन गुतवणुकीसाठी जे भांडवल तयार होते ते सतत कमी असते.२००९-२०१०मध्ये ढोबळ भांडवलाचे जीडीपीशी फक्त २६.५ प्रमाण होते.

जागतिक बँक ने २०११ मध्ये जीडीपीच्या आधारे सर्व देशांचा क्रम लावलातेव्हा भारताचा नववा क्रंमाक लागतो. भारताचा जीडीपी १८५९ बिलीयन डॉलर इतका २०११ मध्ये जागतिक बँकेने निर्धारीत केला आहे.

मात्र जागतीक बँकेने २०११ मध्ये जेव्हा जीडीपी क्रयशक्तीच्या आधारे देशांचा क्रम लावला तेव्हा भारत जगातली ३ री अर्थव्यवस्था म्हणून पुढे आलेली आहे. क्रयशक्तीच्या आधारे भारताचा जीडीपी २०११ मध्ये जागतीक बँकेने ४३०१ मिलीयन डॉलर निर्धारीत केलेला आहे.

| देश | युएसए | चिन | जपान | जर्मनी | फ्रान्स |
|---|---|---|---|---|---|
| जिडिपी बिलियन डॉलर | १५०९४ | ७२९८ | ५८६७ | ३५७० | २७७३ |
| | ब्राझील | युके | इटली | भारत | |
| | २४७६ | २४३१ | २१९४ | १८५९ | |

GDP (Billion Dollars )- स्त्रोत २०११ जागतिक बैंक

| देश | युएसए | चिन | भारत | जपान | |
|---|---|---|---|---|---|
| GDP | १४५८६ | १०१६.९ | ४३०१ | ४१९४ | |

GDP -ppp (billion dollars ) स्त्रोत - २०११ जागतिक बैंक

**कृषी क्षेत्रः-**

भारतात राष्ट्रीय उत्पन्नात (GDP मध्ये)१३.९% वाटा असणारे कृषी क्षेत्र ६४% रोजगार पुरविते तर ५९% वाटा असणारे सेवाक्षेत्र २०% रोजगार पुरविते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताला अन्नधान्याची भरपुर आयात करावी लागे. १९६०-६१ मध्ये एकुण आयातीत या गटाचा वाटा १९.१% होता हीरतक्रांतीमुळे देश आत्मनिर्भर झाला आणि या गटातील वस्तुची आयात जवळपास थाबंलीच २००० नंतर आपण अन्नधाण्याची आयात पुर्णपणे बंद केली . २०१०-२०११ मध्ये अन्नधान्य गटाचा वाटा २.९% आहे.

१९६०-६१मध्ये कृषी संलग्न उत्पादनांचा वाटा निर्यातीत ४४.२ होता.तो कमी होऊन २०१०-२०११ मध्ये फक्त ९.९ राहिलेला आहे. सुरवातीच्या काळातील निर्यातीत ज्युटची सर्वा जास्त निर्यात २१% होत असे. दुसरी महत्वाची वस्तु चहा होती सध्या चहा ची निर्यात होत असली तरी मत्स्य उत्पादनाची तादंळाची निर्यात वाढलेली आहे.

| वर्ष | १९६० -६१ | १९७० -७१ | १९८० -८१ | १९९० -९१ | २००५ -०६ | २०१० -११ |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्पादन टक्के मध्ये | ४४.२% | ३१.७% | ३०.६% | १९.४% | १०.२% | ९.९% |

२०००साली भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन कृ धोरणात खाजगी क्षेत्राचा कृषी उत्पादकता वाढवीण्यासाठी वा किंवा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला होता. त्यातु कॉन्टॅक्ट फर्मिंग आणि लिजिंग फार्मिंग या संकल्पना उदया आल्या. कार्पोरेट शेतीमध्ये एखाद्या शेतकऱ्याची जमीन विशि काळासाठी एखाद्या उद्योजकाद्वारे भाडेतत्वावर घेतली जा आणि त्याला योग्य त्या आदानांचा पुरवठा करुन बाजार पेठे गरजेनुसार उत्पादन घेतले जाते. सध्या यामध्ये तेलबीया, का आणि फलोत्पादन यावर भर दिला जात आहे. कार्पोरेट शेतीम एखाद्या शेतकऱ्याने त्याच्या शेतीत त्याच्या मर्जीनुसार पी उत्पादन घेणे ऐवजी शास्त्रोक्त पद्धतीने बाजारात मागणीनुस आवश्यक ते कृषी उत्पादन किफायतरशीरपणे काढण्यावर भ दिला जातो.



Scanned by CamScanner

### पेट्रोलियम उत्पादन( पेट्रोलियम,खनिजतेल ) :-

पेट्रोलियम उत्पादनाच्या निर्यातीत बरीच वाढ झालेली आहे. पेट्रोलियम उत्पादनाच्या किमती वाढणे तसेच भारताची तेलशुद्धीकरणाची क्षमता वाढणे या दोन कारणामुळे या गटाचा वाटा वाढत राहीला. सन २०००- २००१ ते २००९-२०१० या दहा वर्षांत ११.८% नी या गटाची वाढ झालेली आहे.

| वर्ष | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २००५-०६ | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्पादन टक्केवारी मध्ये | ११% | ०.८% | ०.४% | ३.९% | ११.५% | १६.०८% |

देशात १८ तेलशुद्धीकरण प्रकल्प कार्यरत आहेत (१७ सार्वजनिक व १ खाजगी) २००९ मध्ये या प्रकल्पाची एकुण शुद्धीकरण क्षमता वार्षीक १७७.९७ मिलीयन टन होती. देशात २०१०-११ वर्षात ३८ मिलीयन टन कच्चे तेलाचे उत्पादन झाले. तर ५४ बिलीयन क्युबीक मिटर नैसर्गिक गॅस चे उत्पादन घेण्यात आले. देशात सध्या १०५१४ कि.मी. लांबीच्या चोवीस पाईपलाईन आहेत, ज्या ६३ मिलीयन मेट्रीक टन पेट्रोलिअम वाहून नेऊ शकतात. २१९७ कि.मी लांबीच्या ३ एल. पी. जी. पाईप लाईन आहेत ज्यांची क्षमता ४.५ मिलीयन मेट्रीक टन आहे. ५७९५ कि.मी. लांबीच्या ६ कच्च्या तेलाच्या पाईप लाईन आहेत, ज्यांची क्षमता ५२.७५ मिलीयन मेट्रीक टन ची आहे.

१९९९ पासून नवीन पेट्रोलिअमच्या खाणी शोधुन त्यातून उत्पादन वाढविण्यासाठी शासनाने (NELF New Exploration Policy) जाहिर केली. या अंतर्गत तेल सापडू शकणाऱ्या विभांगाचे ब्लॉक मध्ये विभाजन करुन हे ब्लॉक लिलावात काढले जातात. अलिकडे NELF अंतर्गत २०१० मध्ये ३४ ब्लॉक लिलावात विक्रीस काढण्यात आले. त्यापैकी ८ खोल समुद्रातील, ७ उथळ समुद्रातील, ११ जमिनीवरील व ८ इतर जमिनीवरील ब्लॉक होते.

### खनिज :-

देशातील खनिज संपत्ती देशातील मोठा आर्थिक स्त्रोत असतो. भारत ८६ खनिजांचे उत्पादन मिळवतो, ज्यात ४ इंधने, १० धातु, ४६ अधातु, ३ अनुखनिजे, आणि २३ लघुखनिजे आहेत. खनिज (विकास व नियमन) अधिनियम १९५७ अंतर्गत देशातील खनिज पदार्थाचे उत्खनन, उत्पादन व विकास नियमित केले जातात. ५ मार्च १९९३ रोजी भारत सरकारने नविन खनिज धोरण (New Minral Policy) जाहिर केली. खनिज उद्योगात खाजगी क्षेत्राला परवानगी देण्यात आली. तसेच परकिय कंपन्याना ५०% पर्यंत थेट गुंतवणुकीस मान्यता देण्यात आली. पर्यावरण संवर्धनाला महत्व देण्यात आले. तसेच खनिज संशोधन व उत्खननासाठी परकीय मदत घेण्याचे या धोरणात ठरविण्यात आले. वरील धोरणाचे परिक्षण करण्यासाठी नियोजन आयोगातर्फे हुंडा समिती ची स्थापना करण्यात आली होती. या समितीच्या परिक्षणावरुन २००८ मध्ये पुन्हा नविन खनिज उद्योग धोरण जाहिर करण्यात आले. खनिज उद्योगात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी तसेच गुंतवणूकीस चालणा देण्यासाठी आवश्यक फेरफार करण्याचे निर्णय या धोरणात घेण्यात आले.

विकासासाठी आवश्यक गुंतवणूक निधी आणि साधन सामुग्री भारतात पुरेशी आहे. भारतातील अवैध व्यवहारातील पैसा, सोन्याचे साठे, यात मोठ्या प्रमाणावर संपत्ती अडकली आहे. योग्य प्रमाणात कर रचना, सार्वजनिक बचत योजना, शेयर बाजार याव्दारे निधी उभारुन सेवा सुविधा यात वाढ करुन भारताला विकसित राष्ट्र बनविता येईल.

### संदर्भग्रंथ :-


१) आर्थिक पाहणी २०११-१२

२) वर्तमानपत्र - लोकमत, लोकसत्ता



विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर
८ वे चर्चासत्र २०१४ ला हार्दिक शुभेच्छा !



Dr. S.M. Marwadkar





Scanned by CamScanner

प्रा.पी.एन. सोनकुसरे
डॉ.बी.आर. आंबेडकर कनिष्ठ
महा. हिंगणघाट

# आर्थिक सुधारणा व ग्रामीण, नागरी क्षेत्रातील आर्थिक व सामाजिक परिवर्तन

**आर्थिक सुधारणांचे मुख्य कारण :-** १९९१ चे आर्थिक संकट व्यवहार तेलाचे संकट सोडविण्यासाठी त्यावेळच चंद्रशेखर सरकारने जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीकडे सुमारे ७ अब्ज डॉलर्सच कर्जाची मागणी केली तसेच सरकारी सोने बँक ऑफ इंग्लंड व बँक ऑफ स्वित्झरलँड कडे गहाण ठेवावे लागले. कर्ज देताना IBRD व IMF या संस्थानी भारत सरकारकडे पुढील अटी टाकल्या.

१) खाजगी क्षेत्रावरील बंधने कमी करणे २) अर्थव्यवस्था खुली करुन तिचे उदारीकरण करणे, ३) सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी करणे, ४) व्यापारातील बंधने दूर करणे इत्यादी

भारत सरकारने वरील अटी मान्य केल्या. २१ जुन १९९१ मध्ये सत्तेवर आलेल्या नरसिंहराव सरकारने आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठी जुलै १९९१ मध्ये विविध सुधारणात्मक निर्णय घेतले त्यांनाच 'नविन आर्थिक सुधारणा' किंवा 'नविन आर्थिक धोरण' असे म्हणतात.

१९९१ च आर्थिक सुधारणांची खालील दोन मुख्य उद्दिष्टे होती.

१) अर्थव्यवस्थेस स्थैर्य प्राप्त करुन देणे.

२) अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणणे.

संरचनात्मक बदलासाठी खालील कार्यक्रम हाती घेण्यात आले.

अ) उदारीकरण ब) खाजगीकरण क) जागतिकीकरण

आर्थिक सुधारणांची प्रमुख क्षेत्रे :

१) राजकोषी धोरण २) चलनविषक धोरण

३) नविन औद्योगिक धोरण ४) वित्ती क्षेत्र सुधारणा

आर्थिक सुधारणांमुळे किंवा जागतिकीकरणामुळे भारतातील सामाजिक बदल किंवा स्थित्यंतराची दिशा.

जागतिकीकरणामुळे मानवी समाज जिवनातील जाती, कुटूंब, धर्म, विवाह, शिक्षण यासारख्या सामाजिक सांस्कृतिक संस्थाही प्रभावित होताना दिसत आहेत. त्यामुळे सामाजिक स्थित्यंतर घडून येत आहे.

जागतिकीरणामुळे जातीची तटवंदी हळूहळू सैल होताना दिसून येत आहे. जुन चालीरिती परंपरा, धार्मिक निर्बंध नष्ट होत असून नवची प्रतिष्ठापना होत आहे. जागतिकीकरणामुळे जाती चळवळी त्या त्या जातीतील लोकांना आपल्या चळवळी वाटतात. व त्यांच्यात जवळचा संबंध निर्माण होत आहे.

जागतिकीकरणाच प्रक्रियेत धर्माचा प्रभाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. जगातील असंख्य लोक देवावर विश्वास ठेवणारे असून अनेक धार्मिक संघटनेशी संबंधित आहेत. प्रसारमाध्यमे ही जागतिकीकरणाच जीवन वाहिन्या आहेत. ही प्रसारमाध्यमे धार्मिक संदेश किंवा धार्मिक विचारसरणी प्रस्तुत करीत असतात. जागतिकीकरणाच प्रभावतही धार्मिक विचारांचा प्रभाव वाढत आहे. सर्वच धर्माच्या बाबतीत सन, उत्सव, समारंभ साजरे करण्याची स्पर्धा दिसून येते. थोडक्यात जागतिकीकरणाची प्रक्रिया जितकी गतीमान होत आहे. तितकेच धर्माचे स्वरुप ताठर बनत चालले आहे. आणि धर्माला जागतिक स्वरुप प्राप्त होत असल्याचे दिसून येत आहे.

जागतिकीकरणामूळे संयुक्त कुटूंबाची जागा, विभक्त कुटूंब पध्दतीने घेतली आहे. कुटूंबातील सदस्य फक्त स्वतःचा विचार करु लागले. व याचा परिणाम म्हणून पती-पत्नी मधील दरी वाढतांना दिसून येत आहे. लहान सहान गोष्टीवरुन वाद निर्माण होऊन घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे.

Scanned by CamScanner

जागतिकीकरणामुळे विवाह जुळवून देणार संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. ज्यांना आपण वर-वधू सुचक केंद्र म्हणतो. त्यांच्यातच व्यावसायीक दृष्टीकोनाचा शिरकाव झालचे दिसून येत आहे. विविध वर्तमानपत्रात, मासीकात वधू-वर यांच्या परिचयाची जाहिरात दिसून येते. संगणकावर इंटरनेटच्या माध्यमातून विवाह तसेच वधू-वर परिचय मेळावा इतदीच माध्यमातून विवाह जुळवून देण्याचे प्रयत्न केले जात आहे. हे सर्व जागतिकीकरणामुळे घडत आहे.

जागतिकीकरणामूळे पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव भारतीय संस्कृतीवर पडत आहे. व्यसनाधिनता, स्वार्थीपणा, पालक व मुले यांच्यात निकोप संबंध नसणे, आपुलकी नसणे इ. दुष्परिणाम जागतिकीकरणामूळे दिसून येत आहे. मनोरंजन, खेळ, प्रवास या माध्यमातून संस्कृतीची देवाण घेवाण होत असते. पाश्चात्य चित्रपटामध्ये चित्रपट भारतात बनविल्या जात आहे. या चित्रपटासारखे कलाकार उत्तांग प्रदर्शन करताना दिसत आहे. व याचेच अनुकरण आपला प्रेक्षक वर्ग करीत आहे. तसेच विविध वस्तूंची जाहीरात करताना स्त्री पुरुष विचित्र पध्दतीचे हावभाव करताना दिसून येत आहे. त्यामुळे लैंगीकता व व्यभिचार वाढत आहे.

जागतिकीकरणामुळे सामाजिक व सांस्कृतिक बदल झालेला आहे. रुढी, परंपरा, चालिरीती मूल्ये यात बदल झालेला आहे. विदेशी पोषाख, राहणीमान, खानपान याचे अनुकरण होत आहे. थोडात चंगळवाद किंवा भोगवादी संस्कृती वाढत आहे.

जागतिकीकरणामुळे ग्रामीण व्यवसाय संरचनेवर प्रभाव पडला आहे. जाती व्यवस्थेवर आधारित जे व्यवसाय होते ते बंद पडून नविन ज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित व्यवसा किंवा उद्योगधंदे वाढीस लागलेले आहे. परिणामतः जाती व्यवस्था नष्ट होवून व्यावसायीक गतिशिलता वाढत आहे.

पाश्चिमात्य संस्कृतिच प्रभावामूळे कुटूंबातील व समाजातील लोकांचे परस्पर संबंध संपुष्टात येत आहे. त्याचा परिणा'म म्हणून आत्महत्या, अत्याचार, बलात्कार, लैंगिक स्वैराचार याचे प्रमाण वाढत आहे.

जागितिकररणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या वाढत आहे. त्यात युवक-युवती एकत्रित काम करीत आहे. त्यातून विवाहबाह्य व विवाहपूर्व संबंधाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे विवाह संस्थेचे पावित्र्य धोक्यात येऊ लागले आहे.

## आर्थिक सुधारणांचा शिक्षणावर झालेला परिणाम :

अन्न, वस्त्र, निवारा आरोग्य व शिक्षण ह्या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. त्यापैकी शिक्षण या घटकावर जागतिकीकरणाचा मोठा प्रभाव पडलेला आहे. २००१ मध्ये थ.ढ.ज. ची दोहा येथे जी चौथी परिषद झाली त्यात मोठ्या श्रीमंत (बड्या) राष्ट्रांनी शिक्षणावरील अनुदान जोर्पंत संपविल्या जात नाही. तोर्पंत मदत दिली जाणार नाही अशी भूमिका घेतली व त्याचा परिणाम म्हणून भारताच शैक्षणिक प्रक्रियेत बदल घडून येत असल्याचे दिसत आहे. सन १९९२ मध्ये भारत सरकारने श्री बिर्ला यांच्या नेतृत्वात पाचव्या राष्ट्रीय शैक्षणिक आयोगाची स्थापना केली. भारतात मोठ्या प्रम'णात पदवीधारकांची संख्या वाढत असल्याने या शिक्षण प्रणालित बदल घडवून आणण्याची शिफारस या आयोगाने केली. या आयोगाच्या शिफारसी थ.ढ.ज. च्या धोरणाला अनुसरुन होत. यात शिक्षणाचे खाजगीकरण करणे, स्वायत्त संस्थांची व विद्यापीठाची निर्मिती करणे, शिष्यवृत बंद करणे व शिक्षणावरील सरकारचा खर्च शुन्यावर आणणे इत्यादी शिफारशी होत्या. व याचा परिणाम म्हणून खाजगी शैक्षणिक संस्थांची संख्या वाढत आहे व कॉन्व्हेंट संस्कृती फोफावत आहे. मराठी माध्यमाच्या शाळा ओस पडत आहेत व तेथील शिक्षक अतिरीक्त होत आहे. या शिक्षण प्रणालीमुळे एकीकडे खाजगी व सरकारी मराठी माध्यमच्या शाळांना विद्यार्थी मिळत नाही तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमच्या शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. अशी परिस्थिती आहे. जागतिकीकरणामुळे पालकांमध्ये स्वतःच्या मुलांना नामांकित शाळेत प्रवेश घेण्याची स्पर्धा आहे. व याकरीता ते कितीही डोनेशन देण्यात तयार असतात व हे फक्त श्रीमंत पालकच करु शकतात. दारिद्र्य रेषेखालील गरीब व सामान्य व्यक्ती या नामांकित शाळेत आपल्या मुलाला प्रवेश देवू शकत नाही. त्यामुळे गरीबांची मुले आपोआपच स्पर्धेतून बाहेर केली जातात. त्यांना पैशाच्या अभावी चांगल्या प्रकारचे उच्च शिक्षण मिळत नाही. यातूनच उच्च शिक्षणाच्या बाबतीत श्रीमंताची मक्तेदारी निर्माण होत आहे. विदेशी कंपनप्रमाणेच विदेशी शिक्षण संस्थांनी आपल्या देशात प्रवेश केला आहे. या विदेशी शिक्षण संस्था मोठ्या प्रमाणात फी आकारुन भारतीय जनतेची लूट करीत

Scanned by CamScanner

आहेत. २००७ मध्ये जिनेव्हा येथे झालेल्या सातव्या परिषदेत विकसनशिल देशांना अनुदानाच्या बाबतीत इशारा देण्यात आला. भारताच्या दृष्टीने ही एक चिंतात्मक बाब आहे.

भारतात देण्यात येणारे शिक्षण हे पुस्तकी ज्ञान स्वरुपाचे आहे. ते त्याला स्वतःच्या पायावर उभे करु शकत नाही. त्यामुळे बेकारीचे प्रमाण वाढत आहे. हे रिकामे हात कोणतेही विघातक कृत्य करायला मागे पूढे पाहत नाही म्हणून आपल्या देशात चोरी, लुटमारी, फसवेगिरी, खून, जाळपोळ, बलात्कार इत्यादीचे प्रमाण वाढत आहे. म्हणून यावर उपाय म्हणजे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच व्यावसायीक शिक्षण किंवा रोजगारभिमूख शिक्षण दिल्यास तो स्वतःच्या गरजा पूर्ण करायला जेवढे पैसे लागतात तेवढे तरी पैसे कमवील व समाजस्वास्थ्य बिघडणार नाही.

**आरोग्य सेवांवर झालेला परिणाम :**

ज्या पाच मुलभूत गरजा आहेत त्यापैकी आरोग्य ही एक मुलभूत गरज आहे. या आरोग्य क्षेत्रावर सुध्दा जागतिकीकरणाचा प्रभाव पडलेला आहे. वैद्यकीय क्षेत्रात नविन-नविन संशोधन होत आहे नविन लसी व औषधी शोधून काढल्या जात आहेत. तरी जुने रोग जावून नविन रोगांची निर्मिती होत आहे. व हे वैद्यकीय क्षेत्राला एक आव्हान आहे. ज्या रोगाचे नाव आपण ऐकले नसेल त्या रोगाचे नाव आपल्याला ऐकाला मिळत आहे. त्यातीलच इबोला हा एक आजार जगामध्ये आपले पाय पसरवित आहे. युनो तर्फे या आजारावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे जागतिकीकरणामुळेच शक्य होत आहे. जागतिकीकरणामुळे वैद्यकीय मदत लवकरात लवकर उपलब्ध होत आहे. परंतु ह्या वैद्यकीय सुविधा सामान्य व्यक्तीला न परवडणार आहेत. आपल्या देशात डेंगू, मलेरिया, स्वाईन फ्लू, एडस् इत्यादी रोगांची लागन होताना दिसत आहे. परंतु या रोगावर नियंत्रण ठेवणारी वैद्यकीय यंत्रणा पुरेशी नसल्यामुळे आपल्या देशात आरोग्य क्षेत्राची धावपळ होताना दिसत आहे. अमेरिकेत १०० व्यक्तीमागे १ वैद्यकीय अधिकारी असल्यामुळे तिथे वैद्यकीय सेवा महाग आहे. तर भारतात १५००० व्यक्तीमागे १ वैद्यकीय अधिकारी असल्यामुळे अनेकांना उपचाराअभावी प्राण गमवावे लागते. ग्रामीण भागात १०० मागे १० व्यक्तींना उपचाराअभावी व अपुर साधनाअभावी प्राण गमवावे लागते.

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात आरोग्य विभागाला अनुशेष निर्मूलनासाठी देण्यात आलेल्या निधीपैकी पुरेसा निधी खर्च करता आला नाही. आणि सरकारनेही अनुदानाच्या वाटपात हात आखुडता घेतल्याचे दिसून येत आहे. राज्यपालांनी सुध्दा आरोग्य क्षेत्रात निधी शिल्लक असल्याबद्दल चिंता व्यक्त केली.

आरोग्य क्षेत्राचे जागतिकीकरण झाल्यामुळे आजाराचेही जागतिकीकरण झाले आहे. 'मलेरिया, डेंगू, एड्स, स्वाईन फ्लू, कॅन्सर, टी.बी. इत्यादी आजारावरील औषधाचे पेटंट चार कंपन्याकडेच आहे. या रोगाच्या प्रतिबंधात्मक लसी व औषधासाठी या कंपन्यावरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे या कंपन्याची मक्तेदारी निर्माण झाली आहे. व ह्या कंपन्या जास्त किंमत आकारुन जनतेची पिळवणूक करीत आहेत. पृथ्वीवरील ६९२ कोटी लोकांचे आरोग्या कंपन्याच्या हातात आहे.

भारताचे जगातले स्थान कसे उंचावत आहे याबद्दल अभिमानाने बोलले जाते. पण आरोग्य, शिक्षण आणि राहणीमान या मानवी जगण्यातील महत्वाच बाबींमध्ये भारत कोठे आहे हे मानव विकास अहवाल दरवर्षी दाखवून देतो. २०१३ या वर्षात व्यापक सर्वेक्षण आणि अभ्यासाच्या आधारे २३ जुलै २०१४ रोजी जागतिक विकास अहवाल २०१४ प्रसिद्ध झाला. त्यात भारत मध्य मानव विकास गटात समाविष्ट आहे. जागतिक क्रमवारीत भारत ०.५८६ निर्देशांकासह १३५ व स्थानी आहे. म्हणजेच शेवटून ५२ व क्रमांकांवर आहे. जगाचा सरासरी मानव विकास निर्देशांक ०.७०२ आहे. त्यापेक्षा भारताचा निर्देशांक (०.५८६) लक्षणी खालावलेला असून तो दक्षिण आशियाई प्रदेशाच सरासरी ०.५८८ निर्देशांकापेक्षाही खालावलेला आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, भारतात आरोग्य, शिक्षण व राहणीमान यामध्ये मंद गतीने वाढ होत आहे. म्हणजे भारताचा सरासरी वार्षिक वृध्दी दर निराशाजनक आहे. नविन आर्थिक धोरणात शिक्षण व आरोग्या क्षेत्रात विशेष असा सकारात्मक बदल घडून आलेला नाही.

भांडवल प्रवाहाचे ग्रामीण व नागरी क्षेत्रातील वितरण व रोजगार निर्मिती :

**ग्रामीण विकास व शहरी विकास :**

२०११ च्या जनगणनेनुसार १२१.०२ कोटी

Scanned by CamScanner

लोकसंख्येमध्ये ग्रामीण लोकसंख्या ८३.३१ कोटी (६८.८४) तर शहरी लोकसंख्या ३७.७१ कोटी (३१.१६) इतकी होती. या ग्रामीण व शहरी लोकसंख्याचा आर्थिक विकास करण्याकरीता दारिद्र्य, बेरोजगारी व आर्थिक विषमता दूर करण्याकरीता सरकारने विविध कार्यक्रम व योजना सुरु केल्या आहेत.

१) इंदिरा आवास योजना

ही योजना १९८५-८६ मध्ये सुरु करण्यात आली. एप्रिल १९८९ पासून तीची अंमलबजावणी जवाहर रोजगार योजनेचा एक भाग म्हणून करण्यास सुरुवात झाली. १ जानेवारी १९९६ पासून भारत सरकरने तिला स्वतंत्र दर्जा दिला आहे.

२) भारत निर्माण कार्यक्रम :

भारत निर्माण कार्यक्रम १६ डिसेंबर २००५ रोजी सुरु करण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण, पेयजल, दुरसंचार, रस्ते, विद्युतीकरण व जलसिंचन या पायाभूत सुविधांचा विकास केला जातो.

**पेयजल :**

भारत निर्माण कार्यक्रमाअंतर्गत २.१७ लाख गुणवत्ता प्रभावित वस्त्यांना सहभागी करणचे लक्ष होते. भारत निर्माण च्या पहिल्या टप्प्यात २००५ ते २००९ मध्ये ५०१६८ वस्त्या सामिल करण्यात आल्या. शिल्लक वस्त्यांना दुसऱ्या टप्प्यात समाविष्ट करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. २००९ ते २०११ पर्यंत ५९२३६ वस्त्या सामिल करण्याचे निश्चित करण्यात आले. १ एप्रिल २०११ पर्यंत गुणवत्ता प्रभावित १२१०४६ वस्त्यामध्ये शुद्ध पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणे आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :**

केंद्र संरकारने ७ सप्टेंबर, २००५ ला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा तयार केला. त्यानुसार राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली. २ फेब्रुवारी २००६ ला लागू झालेल्या या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात २०० जिल्हे समाविष्ट करण्यात आले. व २००७-०८ मध्ये यात पुन्हा १३० अतिरिक्त जिल्हे समाविष्ट करण्यात आले. शिल्लक राहीलेले जिल्हे एप्रिल २००८ मध्ये अधिसुचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

**आर्थिक सुधारणांचा कृषी वरील परिणाम :**

१ जानेवारी १९९५ रोजी 'शेतीविषक जागतिक व्यापार करार' अस्तित्वात आला. या करारात शेतमालाचा व्यापार खुला करण्यासाठी आयात शुल्क, सबसिडी, निर्यात सहाय्य या तिनही बाबीमध्ये कपात करण्याचे सदस्य देशांनी मान्य केले. १९९५ पासून सुरु होणारी कपातीची कालमर्यादा विकसित देशाकरीता ६ वर्षे व विकसनशील देशांकरीता १० वर्षापर्यंत निश्चित करण्यात आली.

**देशांतर्गत उत्पादनात शेतीचा हिस्सा व निर्यात**

देशांतर्गत उत्पादनात शेती व संबंधित क्षेत्राचा हिस्सा १९८०-८१ मध्ये ३६.१ टक्के होता. व ९१-९२ ला २८.६ टक्के तर २०१२-१३ (पी) ला १३.७ पर्यंत कमी झाला. देशांर्तगत उत्पादनात शेती व संबंधीत क्षेत्राचा वृद्धि दर सरासरी वार्षिक ९२-९३ पासून १९९७-९८ पर्यंत ३.६ होता. तो २०१२-१३ (पी) ला १.९ टक्के पर्यंत कमी झाला. एकूण निर्यातीपैकी शेती व संबंधीत क्षेत्राची र्निात १९९६-९७ मध्ये १७.९६ टक्के, २००२-०३ मध्ये १२.८ होती. ती २०१०-११ मध्य ९.९ टक्के पर्यंत कमी झाली. देशांतर्गत उत्पादनात शेतीचा हिस्सा, वृद्धि दर व निर्यातीचा विचार करता आर्थिक सुधारणा चा कृषी क्षेत्रावर प्रतिकुल परिणाम झाला.

**महाराष्ट्र राज्याची फळ, भाजीपाला व फुलांच्या उत्पादनातील स्थिती :**

कृषी विभागाच्या ताज्या अहवालानुसार फलोत्पादनात क्रमांक १ वर असलेल्या महाराष्ट्राची दुसऱ्या स्थानावर घसरण झाली असून हे स्थान आंध्रप्रदेश ने पटकाविले आहे. १ वर्षात सुमारे १ कोटी टन उत्पादन घेणार महाराष्ट्रात २०१२-१३ या वर्षात केवळ ९७ लाख ८५ हजार टन फळांचे उत्पादन झाले. राज्यात हापूस, आंबा, संत्री, केळी व डाळींबाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. या फळांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याकरीता आघाडी सरकारने शेवटच काळात प्रयत्न केले. परंतु युरोपी देशांनी आपल्या फळांवर किड व रसानाचा परिणाम झालेला आहे. असे कारण सांगून आयात बंद केली. १९९० नंतर राज्य सरकारने रोजगार हमी योजने अंतर्गत फळझाड लागवड कार्यक्रम राबविला. २००५ नंतर फलोत्पादन अभियान राबविण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून १८ लाख हेक्टरवर

Scanned by CamScanner

फळ झाडांची लागवड झाली आहे. ठिंबक व तुषार सिंचनाचा वापर वाढला आहे. तरी सुध्दा फलोत्पादनात महाराष्ट्र मागे का पडला याची कारणे शोधावी लागतील. २०१२-१३ मध्ये आंध्रप्रदेशचा फळ उत्पादनातील वाटा १७.१ टक्के होता. तर महाराष्ट्राचा वाटा १२.०० होता. २०१२-१३ मधील भाजीपाला उत्पादन ८० लाख टक्के टन असून देशांतर्गत उत्पादनातील महाराष्ट्राचा वाटा केवळ ४.९ टक्के आहे. भाजीपाल्याच उत्पादनात पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, गुजरात, उडीसा ही राज्ये अव्वल असून महाराष्ट्राची ८ व स्थानावर घसरण झाली आहे. फुलांच उत्पादनातही महाराष्ट्र सातव्या स्थानी आहे. पहिले स्थान तामिळनाडूचे आहे. त्या खालोखाल आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश आहे. फुलाच्या उत्पादनात तामिलनाडूचा वाटा १८ टक्के असून महाराष्ट्राचा वाटा केवळ ६.८८ टक्के आहे. संत्री उत्पादनात अव्वल असलेला महाराष्ट्र दिवसेंदिवस मागे पडत असून पंजाब ने प्रथम स्थान प्राप्त केले आहे. संत्रांची झाडे वाळत असल्यामुळे व पीक बरोबर नसल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी इतर पिकाकडे वळलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) लोकसत्ता दैनिक

२) भारत २०१४- सूचना व प्रसारण मंत्रालय

३) 'जागतिकीकरण व भारतातील ग्रामीण समुदार विषावरील चर्चासत्रातील स्मरणिका भिवापूर महावि भिवापूर जाने. २०१०.



विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ

८ वे चर्चासत्र २०१४ ला हार्दिक शुभेच्छा !



**प्रा. सुरेश नरहरी रोकडे**

श्री साईनाथ कनिष्ठ महाविद्यालय

मालेवाडा, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली


Scanned by CamScanner



प्रा. विजय ल. बालपांडे
एस.एम.वडे कनिष्ठ महा.
मेंहदीबाग रोड, नागपूर-२.

# आर्थिक सुधारणाएँ एवं ग्रामीण नागरी आर्थिक और सामाजिक परिवर्तन

**प्रस्तावना** - वास्तविकता तो यह है की, उदारीकरण और वैश्विकरण का दौर शुरु होने के बाद हमारे देश में विषमता बढी है। अमीरों की संख्या बढ रही है। गरीब एवं निर्धनता का स्वरूप परिवर्तीत हो रहा है। रोजगार के अवसर ना शहरी क्षेत्र में विकसीत हो रहे ना ग्रामीण क्षेत्र में। भारत के राज्यों की तुलना दुनिया के घोर त्ररिणी और तेजी से विकसीत हो रही है। निहार और और की स्थिती धाना और मालदीव से खराब है। भारत के कही अन्य राज्य जैसे भी है। जिसमें पंजाब और हरियाणा जिन्होने ब्राझील और मेक्सीको पीछे छोड दिया है। आजादी के समय देश के सकल घरेलू उत्पाद में कृषी का योगदान ६० प्रतिशत था जो अब घट कर १०% रहा है। परंतू रोजगार के संसाधन ग्रामीण अर्थव्यवस्था में हीं कृषी ही ६५ प्रतिशत से ज्यादा रोजगार के अवसर इस से प्राप्त होते है। तिन चौथाई किसानों की आमदानी तीन हजार रूपये प्रतिमाह से कम है।

रिझर्व बँक ऑफ इंडिया की वर्ष २००४-०५ की जो वार्षिक रिपोर्ट प्रकाशित की गई उसमें स्पष्ट किया गया था की, आर्थिक विकास से आम जनता उतना अधिक लाभान्वित नही हो रहा है। बढे उद्योग के बढते लाभ पर संतोष जताया गया है। लेकिन आम आदमी के लिये महत्वपूर्ण मुद्दों पर स्थिती बिगड रही है। फोवर्स द्वारा पहली बार अरबपतीयों की सूची छापी गई तब उसमें केवल १४० अरबपतीयों के साथ थे। वर्ष २००३ में यह संस्था ४७६ हुई और २०१५ में ६९० , ०६ में ७९२ हुई, इन अरबपतीयों की कुल सम्पति २.६ लाख खरब डॉलर इतनी हुई। अरबपतीयों की सूची में सत्ताईस भारतीय है। और वे सभी नागरी क्षेत्र से है, ग्रामीण क्षेत्र नागरी क्षेत्र की पहचान है। अरबपतीयों की, सूची में भारतीयों की बढती संख्या को देखकर यह निष्कर्ष निकालना सर्वथा गलत होगा कि आम भारतीय समृद्धी के रास्ते पर आगे बढ रहे हैं।

**विकास और बदलता समाज** - पिढीयों के बीच फर्क हमेशा रहा है तेजी से हो रहे आधारभूत बदलाव को इस परम्परागत सोच में बाधा नही जा सकता खुली अर्थव्यवस्था जिस तरह का समाज बना रही है उसमें सुनियोजीत तरीके से मानवी मूल्य और सामाजिक सरकारी के लिये कोई जगह नही रखी जा रही है। भारतीय समाज आज जिस तरह अपराध और सामाजिक गिरफ्त में फँसता जा रहा है पारम्पारिक नेतृत्व को एक सीमा से ज्यादा देखने में असफल रहे है। ऐसा लगता है की सारे और समाल को बाजार के साथ-साथ अब उन विचारों और मूल्यों को भी अतीत की चीज बनाने का प्रयास ले रहा है। एक और जब करोड़ो गरीब अपने को बेघर, बेरोजगार, बीमार, और भूखे परिदृश्य में पाएंगे तथा दूसरी और वे वैभव और ऐशो आराम का परिदृश्य देखेंगे तो उनका असंतोष और आक्रोश उन्हे अपराध आतंक और उग्रवाद की दुनिया में धकेल देगा।

**विकास का असमान वितरण** - भारत आज सर्वाधिक विकास दर वाले देशों में उचे स्थान पर है। आने वाले समय में उसकी आर्थिक शक्ती अधिक बढेगी देश में विकास स्तर व गति को, निरपेक्ष रूप से देखा जाए वह हमारे लिए गर्व की बात है। लेकिन सोचने की बात यह भी है की, जिस विकास का लाभ अधिकांश व आमजन को नहीं मिले ग्रामीण क्षेत्र के अंतर्गत आज़ादी के बाद की समस्या आज भी दिखाई देती है। शिक्षा, स्वास्थ, यातायात, संदेशवहन जैसी सुविधाओंमें बदलाव धीरे गति से आ रहा है। ग्रामीण क्षेत्र नवयुवक रोजगार पाने हेतू नागरी क्षेत्र के और चल पडते है। इसका परिणाम ग्रामीण क्षेत्र में मनुष्य शक्ती अभाव होता है। सभी राज्यों के सभी ग्रामीण स्थानों पर स्थलांतर का प्रमाण सभी राज्यों के सभी ग्रामीण स्थानों पर स्थलांतर का प्रमाण बहुत ज्यादा बढा है। इसका विपरीत परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्था पर दिखाई दे रहा है। कृषी में प्रौद्योगिक क्रांती संपूर्ण स्वरूप में होगा जरूरी सिंचन क्षमता का अभाव महंगी तकनिक,



Scanned by CamScanner

महंगे बीज और बुआई और प्रकृतीका साथ होगा। यह भारतीय किसानों के लिये बडी चुनौती है। परिणामतः ग्रामीण क्षेत्र के अंतर्गत जो रोजगार के अवसर कृषी से निर्माण होते है उसमें बाधाये उत्पन्न होती है। भारतीय बाजार अभी भी अपूर्ण होने के कारण किसानों के कृषी आधारीत वस्तूओं को अच्छे दाम मिलना असंभव होना है। भारत का हर कोई किसान कॅश-क्रॅप लेने में असहाय है। परंपरागत वस्तुओंका निर्माण और माँग यह निरंतर असंतुलीत रहा प्रश्न है। इसका सीधा प्रभाव ग्रामीण समाज जीवन पर होता है। आय कम प्राप्त होने से, खर्चे भी कम होते हैं। और ग्रामीण जनता निम्न स्तर पर अपना गुजारा करती है, और इस परिणामकारक नागरी ग्रामीण आर्थिक और सामाजिक विषमता उग्र होती है। निर्माण का कार्यक्रम शहरी और ग्रामीण भारत के बीच बढते फासले को कम करने के लिये शुरू किया गया है। ताकि ग्रामीण आबादी का शहरी शहरों की हो रहा पलायन रोका जा सके। एक अनुमान के अनुसार अगले २० सालों में पचास प्रतिशत आबादी शहरों में रहने लगे है। भारत के बडे नगरो में मुम्बई, कोलकाता, दिल्ली, अधिकांश शहरों में ३५ से ४० प्रतिशत आबादी झुग्गी झोपडी में रहती है। झोपडियों में गंदगी की वजह से बिमारीयाँ महामारी का रूप धारण कर लेती हूँ। १९४७ में भारत की आबादी ३१ करोड थी और अब यह १.२ मिलियन इतनी हुई है। भारतीय गावों में रोजगार के नये अवसर और नागरीक सुविधाएँ स्कूल और कॉलेज, अस्पताल, सडके पीने का पानी बिजली आदी प्रदान किए जाएँ तो शहरों की और पलायन कम हो सकता है।

**ग्रामीण स्वास्थ -** भारत में इस समय सात लाख से भी अधिक डॉक्टर पंजिकृत चिकित्सक है। लेकिन १० प्रतिशत से, भी कम डॉक्टर सामुदायिक स्वास्थ सेवाओं में से प्रत्यक्षतः सम्बद्ध है। गाँवों ओर शहरों में चिकित्सा सेवाओं में जो असमानता है। इस सिलसिले में वर्ष २००४ में विश्व स्वास्थ्य संगठन ने अपनी एक रिपोर्ट में यह तथ्य उजागर कियां था कि, भारत में सार्वजनिक चिकित्सा सुविधाओं पर खर्च होने वाले धन का करीब ६० प्रतिशत शहरी और उच्च वर्ग के लोगों के हिस्सों में चला जाता है। लिहाजा गाँवों में रहने वाले ज्यादातर लोग बुनियादी स्वाथ्स्य सेवाओं से वंचित रह जाते है। शहरों में तो चप्पे चप्पे पर विशेषज्ञ डॉक्टर और क्लिनिक मिल जाते है और गाँवों में चिकित्सा की न्यूनतम सुविधाएँ भी मयस्सर नही होती। सरकार गरीब के लिये वास्तव में ही कुछ करना चाहती है, तो उसे कैंसर, ह्रदयरोग, लकवा, मस्तिष्क रोग जैसी शाही बिमारीयों के इलाज के लिए करोंडो की लागत से बनने वाले अस्पताल के स्थान पर आयुर्वेदिक, युनानी, होमियोपैथी, या प्राकृतिक पद्धतीयाँ वाले चिकित्सालयों को साहयता मैं वरीयता देनी होगी। अनेक पंचवार्षिक योजनाओं में असिमित खर्च स्वास्थ पर होता रहा है लेकिन ग्रामीण क्षेत्र में स्वास्थ का अभाव है जब की नागरी क्षेत्र में डॉक्टरों का और मरीजों का तुफान आया दिखाई देता है।

**पेयजल की सुविधा -** वर्तमान स्थिती में प्रत्येक राज्य में पेयजल की किमते जिस तरह से बढाई जा रही है इसका कारण उपरी तौर पर तो आपूर्ती व्यव में वृद्धी को ही माना जा रहा है। लेकिन वास्तविकता यह है कि यह सब कुछ नियंत्रण व्यवस्था से हो रहा है। आर्थिक सिद्धान्तों के अनुसार किसी भी समस्या के निदान में हम इसी वास्तविकता को नही समझ पा रहे है। अधिकांश बडे शहरों में पेयजल समस्या का मूल कारण जलपूर्ति का कम होना नही बल्की अन्य अनावश्यक साधनों में उसका किया जा रहा उपयोग है। आज भी राज्यों के ग्रामीण क्षेत्र के अंतर्गत नदीयाँ सूख जाने से धूप में पेयजल बहोत कम होता है। और ग्रामीण क्षेत्र के महिलाएँ और बच्चियों को आझादी के बाद भी ०५ से ०७ कि.मी. के अंतराल से दो गागर पानी सर पे चढाकर लाना पडता है यह बात की वास्तविकता हमारे माजी अर्थमंत्री चिदंबरम साहब ने भी उनके अंदाजपत्रक सांसद में पेश करते वक्त दोहरायी थी। ग्रामीण क्षेत्र में पेयजल की आपूर्ती का प्रश्न दिन प्रतिदिन विषमताओं के तरफ बढ रहा है। नागरी क्षेत्र में झुग्गी झोपडीयों में भी पेयजल की समस्या महत्वपूर्ण है।

**शिक्षा का योगदान -** शिक्षा के क्षेत्र में शिक्षण एवं प्रशिक्षण सुविधाओं और शोध कार्यो को बढाने की आवश्यकता है। वर्तमान में दिशा की जो परिस्थितियाँ है तो उससे तो नही लगता कि हम आंतराष्ट्रीय माँग के अनुसार आवश्यक शिक्षित लोग उपलब्ध करवा पाएंगे। क्योंकि राष्ट्रीय शिक्षा योजना और प्रशासन द्वारा एक सर्वोत्तम के अनुसार देश में १३.५ करोड बच्चे (६ से १४ वर्ष) ने स्कूल का दरवाजा तक नही देखा लगभग बयाशी हजार स्कूलों में ब्लैक बोर्ड नही है। अनुसंधान के अनुसार ५३% बच्चे प्राथमिक स्तर पर ही स्कूल छोड देते है। देश के १० प्रतिशत स्कूल खुले आसमान के निचे चलते है। और ३२ प्रतिशत स्कुल अपनों में बच्चो का पढाना जाना जोखीम में डालने जैसा है। देश में जनसंख्या जिस तेजी से बढ रही है। उसी कारण से देश में


Scanned by CamScanner

शिक्षा का स्तर नही सुधार पा रहे है।

